
डिसेंबर २०१५ / पाने ६० / किंमत ₹१०

# लोकराज्य


## महामानवाचे विश्वस्मारक














# विठ्ठला... दुष्काळापासून मुक्ती दे..





कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांनी सपत्नीक केली. यावेळी त्यांनी सतत पडत असलेला दुष्काळ तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे होणारी हानी या संकटापासून राज्याला मुक्त कर, राज्यातील जनता सुखी समाधानी होऊ दे असे विठ्ठल चरणी साकडे घातले. महसूल मंत्री खडसे यांच्यासमवेत महापूजा करण्याचा बहुमान नाशिक जिल्ह्यातील जादुवाडी येथील वारकरी दामोदर सोमासे आणि त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई सोमासे यांना मिळाला.

वर्ष ६७ वे | अंक ६ | डिसेंबर २०१५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक — चंद्रशेखर ओक
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण — अश्विनी पुजारी
- साहाय्य — संतोष सुतार

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in




### महामानवाचे विश्वस्मारक

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे काही काळ वास्तव्य असलेले लंडन येथील घर शासनाने विकत घेतले असून त्याचे लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले आहे. तेथे प्रेरणादायी स्मारक उभारण्याचे शासनाने ठरवले आहे.

### पंचतीर्थे - गौरव देशाचा

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीप्रीत्यर्थ केंद्र सरकार आणि राज्य शासन विविध प्रकल्पांचा विकास करणार आहे. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारच्या या कार्याचा गौरव करणे हे भारतीय नागरिकांचे इतिकर्तव्य ठरावे. शासनाच्या वतीने बाबासाहेबांना दिलेला हा सन्मानच आहे.




### स्वच्छतेचा सोलापूर पॅटर्न


स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत नागरिकांना स्वच्छतागृहांची सवय लागावी व त्यातून मागणी वाढावी यासाठी सोलापूर जिल्ह्यातील नगरपालिकांमध्ये विशेष मोहीम राबवण्यात आली. नगरातील सार्वजनिक स्वच्छतागृहे दुरुस्त करण्यात आली. उघड्यावर शौचास जाणाऱ्यांचा गांधीगिरी पद्धतीने सन्मान' करण्यात आला. काही ठिकाणी हलगी वाजवून तर काही ठिकाणी गुलाबपुष्प देऊन भल्या पहाटे सन्मान करण्यात आला. स्वच्छतेचा हा सोलापूर पॅटर्न यशस्वी झाला आहे.

२०

### न्याय नागपूर कराराला

महाराष्ट्राचा विकास व्हायचा असेल तर प्रादेशिक असमतोल दूर झाला पाहिजे हे ओळखून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदाचा कारभार स्वीकारल्यापासून त्याला प्राधान्य दिले. त्याचमुळे गेल्या वर्षभरात विदर्भात अनेक विकास कामे सुरू झाली. महाराष्ट्र निर्मितीवेळी झालेल्या नागपूर कराराला एकप्रकारे न्याय देण्याचे काम मुख्यमंत्र्यांनी केले आहे.




### जलयुक्त शिवारला सोनेरी किनार

शेतात पडणाऱ्या पाण्याचे जतन करून त्याचा योग्य वापर करण्यावर, जलयुक्त शिवार योजनेत भर देण्यात आला आहे. या योजनेच्या यशस्वितेसाठी साठवलेले पाणी वाहून जाऊ नये आणि बंधाऱ्याची, मातीची धूप होऊ नये यासाठी बांबू लागवड अतिशय उपयुक्त ठरते.


सिंहावलोकन २०१५ | संस्कृती | निरामय | प्रेरणा

सप्रेम नमस्कार

### विकासाचा साक्षीदार

'पहिले पाऊल वचनपूर्तीचे' या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेला लोकराज्यचा नोव्हेंबर महिन्याचा अंक युती सरकारने टाकलेल्या धोरणात्मक पावलांचा मागोवा घेणारा आहे. विविध मंत्रिमहोदयांनी विभागाच्या कामगिरीची ओळख करून देणारे स्वत: लिहिलेले लेख आवडले. गतिमान परिवर्तन हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा लेख राज्याची विकासरेषा दर्शवणारा आहे. राज्य शासनाच्या वर्षभरातील आश्वासक, सकारात्मक आणि धोरणात्मक वाटचालीचा लोकराज्यचा नोव्हेंबर अंक साक्षीदार आहे.

**– शिवनाथ नागवे, खामखेडा, जालना**




### सर्वोत्कृष्ट


लोकराज्य चा प्रत्येक अंक हा सर्वांगसुंदर असतो. मुखपृष्ठ पाहताच अंक कसा असेल, याची कल्पना आल्याशिवाय राहत नाही. मी लोकराज्य येण्याची चातकाप्रमाणे आतुर होऊन वाट पाहत असतो. अंक असाच सर्वोत्कृष्ट काढावा ही लोकराज्यच्या संपादकांना विनंती. तसेच लोकराज्यचे वाचक अधिक वाढावेत ही अपेक्षा.

**– विवेक भगवान आंभोरे, मु.पो. मंगरूळ नवघरे, ता.चिखली,जि.बुलढाणा.**

### महत्त्वपूर्ण माहिती

लोकराज्य नोव्हेंबर २०१५ चा विशेष अंक मनापासून आवडला. शासन, प्रशासन आणि राज्यकर्ते यांच्यातील संवाद थेट जनतेसमोर अगदी व्यवस्थितरीत्या मांडण्यात आला. माननीय मुख्यमंत्री व सर्वच मंत्रिमहोदय बदल घडवून आणणार, यावर आम्हा जनसामान्यांचा विश्वास आहे. लोकराज्य मासिकातून नेहमीच महत्त्वपूर्ण माहिती प्रसिद्ध होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धापरीक्षांची तयारी करता येते. यापुढेही अशाच दर्जेदार मासिकांची निर्मिती कराल, अशी माझी खात्री आहे.

**सौ. बेबीताई गायकवाड, अध्यक्ष, क्रांतिज्योत महिला मंडळ, सावेडी, अहमदनगर.**







### वाचनीय

लोकराज्य सप्टेंबर २०१५ चा अंक अतिशय वाचनीय आहे. 'ध्येयासक्तीला परिश्रमाचे बळ' हा लेख आवडला. अभिजित शेवाळे यांचे परिश्रम वाखाणण्याजोगे आहेत. आयएएस होण्यासाठी कशी तयारी करावी याविषयी महत्त्वपूर्ण माहिती प्रेरणा या सदरात मिळते. तसेच महाउद्योग राष्ट्र, नवीन ओळख मुंबई प्रदेशाची हे लेख आवडले.

**– स्वाती कदम**

### माहितीचा खजिना


लोकराज्य मासिक म्हणजे महाराष्ट्रातील जनतेसाठी ज्ञानाचा खजिना आहे. मासिकामध्ये महाराष्ट्रातील सर्व मंत्र्यांचे कामकाज, शासनाचे निर्णय, चालू घडामोडी, ग्रामीण विकास, राजकारण, समाजकारण, भविष्याचा वेध आदी विषयावर लिखाण असल्यामुळे हे मासिक संग्रही ठेवण्याजोगे असते.

**– दमयंती मोगल, सरपंच, चांगेफळ, ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा**

### ज्ञानाचे साधन

मी लोकराज्यचा नियमित वाचक असून जुलै २०१५ चा अंक विशेष आवडला. स्पर्धा परीक्षेकरिता लोकराज्यचे सर्वच अंक उपयुक्त आहेत. जलयुक्त शिवार योजनेच्या विशेष माहितीबद्दल धन्यवाद. नेमके व अचूक अशी ओळख ठरलेले लोकराज्य माझ्यासाठी खूप महत्त्वाचे ज्ञानाचे साधन बनले आहे.

**– रतन कोंडुगिर गिरी, सावरखेडा, ता. जाफ्राबाद, जि. जालना.**




### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई–४०० ०३२**

## वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी** http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

अतिथी संपादकीय



# गौरव महामानवाचा

नोव्हेंबर महिना देशासाठी व महाराष्ट्रासाठी अतिशय महत्त्वाचा ठरला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लंडन येथे वास्तव्य केलेल्या घराची खरेदी महाराष्ट्र शासनाने ऑगस्ट महिन्यात केली. या वास्तूचे लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतेच लंडन येथे केले. या वास्तूचे आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे स्मारक करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. परदेशात उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थी व इतरांसाठी ही इमारत यापुढे नवी प्रेरणा आणि ऊर्जा देत राहील. डॉ. आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या पाच ठिकाणांचा विकास पंचतीर्थ म्हणून करण्याची घोषणा प्रधानमंत्र्यांनी इंदू मिल येथील बाबासाहेबांच्या स्मारकाच्या भूमिपूजन प्रसंगी केली होती. अशा पंचतीर्थांबद्दल विस्तृत लेख या अंकात आम्ही समाविष्ट केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विशेष लेखही आम्ही या अंकात दिला आहे.

या महिन्यात नागपूर येथे हिवाळी अधिवेशन होत आहे. विदर्भाच्या दृष्टीने हे अधिवेशन महत्त्वाचे असते. गेल्या वर्षभरात विदर्भ विकासासाठी शासनाने घेतलेल्या विविध निर्णयांचा लेखाजोखा या अंकात समाविष्ट केला आहे.

महाराष्ट्राच्या शहरी भागात स्वच्छता अभियानाने चांगलीच गती पकडली असून सोलापूर व नागपूर जिल्ह्यात या अभियानात झालेल्या उत्कृष्ट कामांची दखल आम्ही या अंकात घेतली आहे. ही दखल इतर जिल्ह्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.

२०१५ वर्ष हे विविध घटना, घडामोडी यांनी संस्मरणीय ठरले, याचे सिंहावलोकन सरत्या वर्षभरातील स्मृती जागृत करतील आणि पुन:प्रत्ययाचा आनंद देतील.

जलयुक्त शिवार योजनेच्या यशस्वितेसाठी बांबूचा उत्तम उपयोग कसा होऊ शकतो, याचे सविस्तर विवेचन करणारा व बांबूच्या विविध पैलूंची माहिती देणारा लेख हे या अंकाचे विशेष वैशिष्ट्य आहे.

नोव्हेंबर महिन्यात शासनाच्या वर्षपूर्तीनिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या सर्व माध्यमांनी विविध उपक्रम राबवले. लोकराज्य (मराठी/उर्दू), महाराष्ट्र अहेड या नियतकालिकांचे विशेषांक, पहिले पाऊल वचनपूर्तीचे ही पुस्तिका, सर्व जिल्ह्यांच्या माहिती व घडीपुस्तिका, चित्ररथ, आकाशवाणी (दिलखुलास), दूरचित्रवाणी (जय महाराष्ट्र) वरील कार्यक्रम आदींचा यात समावेश आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत २०१४ चा उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा हा आनंदाचा उत्सव ठरला. मुख्यमंत्र्यांनी या सोहळ्यात ज्येष्ठ पत्रकार पद्मश्री डॉ. मुजफ्फर हुसेन यांचा, 'लोकमान्य टिळक जीवनगौरव' पुरस्कार आणि इतर १७ पत्रकारांचा उत्कृष्ट पत्रकार म्हणून गौरव केला. स्वच्छता अभियानाच्या प्रसिद्धीसाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पत्रकारास पुरस्कार देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी या वेळी केली.

हा अंक इतर अंकाप्रमाणेच आमच्या वाचकांना आवडेल अशी आशा आहे.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
**सचिव**
**(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)**




# महामानवाचे विश्वस्मारक

**लंडनमध्ये येणारे जगभरातील विद्यार्थी, राजकीय नेते, समाजशास्त्राचे अभ्यासक आणि पर्यटकांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची ओळख होण्यासाठी तेथे स्मारक उभारण्याचे शासनाने ठरवले आहे. त्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे काही काळ वास्तव्य असलेले लंडन येथील घर शासनाने विकत घेतले असून त्याचे लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले आहे.**

**हेमराज बागूल**

१४ नोव्हेंबर २०१५ या दिवसाचा प्रारंभ करणारी ती सकाळ खरोखरच रोमांचित झालेली... तसे या दिवसांमध्ये थोडीफार रिमझिम आणि साचणाऱ्या दवबिंदूनी लंडन ओले होत असले तरी या शहरातील किंग हेन्री मार्ग आणि या मार्गावरील ती ऐतिहासिक वास्तू दाटलेल्या भावनांनी जरा जास्त चिंब झालेली... आणि का होऊ नये? भीमराव रामजी आंबेडकर नावाचा एक असामान्य विद्यार्थी ९४ वर्षांपूर्वी याच रस्त्यावरून ये-जा करत असे आणि याच वास्तूत त्याचा ज्ञानयज्ञ अहोरात्र धगधगत असे. त्याच्या घनघोर ज्ञानसाधनेसह आपल्या समाजबांधवांच्या जीवनात परिवर्तन घडवण्याच्या निर्धारी निष्ठेचा हा मार्ग आणि त्यावरील ही व्रतस्थ वास्तू जिवाभावाची साक्षीदार होती. साधारणत: शतकानंतर याच असामान्य विद्यार्थ्याच्या नावाने त्याच्या असंख्य अनुयायांकडून मोठ्या अभिमानाने होणारा 'जय भीम... जय भीम' चा जयघोष ऐकताना हा सारा परिसर रोमांचित झाला होता. भीमराव नावाच्या विद्यार्थ्याचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या महामानवापर्यंतच्या प्रवासातला एक महत्त्वाचा टप्पा अनुभवणारी ही वास्तू या महामानवाच्या स्मारकात रूपांतरित होताना विलक्षण कृतकृत्य झाली होती!

या अतिशय भावपूर्ण आणि तितक्याच ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह शेकडो कार्यकर्ते. प्रधानमंत्र्यांनी या स्मारकाचे लोकार्पण करून भारतमातेच्या या थोर सुपुत्राला वैश्विक मानवंदना दिली.

बाबासाहेबांच्या जीवनक्रमात लंडन येथील वास्तव्य महत्त्वपूर्ण ठरले

आहे. याच वास्तव्यादरम्यान बाबासाहेबांचा प्रॉव्हिन्शियल डिसेंट्रलायझेशन ऑफ इम्पिरियल फायनान्स हा प्रबंध लंडन विद्यापीठाने स्वीकारून जून १९२१ मध्ये त्यांना एम.एस्सी. पदवी बहाल केली. त्यानंतर पुढच्या वर्षी १९२२ दि प्रॉब्लेम ऑफ दी रुपी हा प्रबंध त्यांनी लंडन विद्यापीठाला सादर केला. पुढे त्यात त्यांनी स्वत:च काही दुरुस्त्या केल्यानंतर विद्यापीठाने त्यांना १९२३ सालच्या नोव्हेंबरमध्ये डॉक्टर ऑफ सायन्स ही प्रतिष्ठेची पदवी बहाल केली. इंग्लडमधल्या प्रकाशकांनी या प्रबंधाचे समकालीन मूल्य जाणून तो 'इव्हॅल्युशन ऑफ प्रॉव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया' या शीर्षकाने ग्रंथरूपात प्रसिद्ध केला. या अतिशय मोलाच्या संशोधनकार्यामुळे आणि ग्रंथलेखनामुळे अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या दोन्ही ज्ञानशाखांमधले अधिकारी व्यक्ती म्हणून बाबासाहेबांची प्रतिमा निर्माण झाली. 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स' या संस्थेत उभारण्यात आलेला त्यांचा अर्धपुतळा, हा जणू बाबासाहेबांच्या गुणवत्तेने सातासमुद्रापार बजावलेल्या कर्तबगारीची साक्ष ठरला आहे. असा गौरव वाट्यास आलेले ते एकमेव भारतीय प्रज्ञावंत!

लंडन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तव्य केलेल्या निवासस्थानाचे हे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन, महाराष्ट्र सरकारने ते विकत घेण्याचा आणि त्याचे एका आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकात रूपांतर करण्याचा निर्णय घेतला. त्या दृष्टीने लंडन येथे झालेला हा कार्यक्रम वैशिष्ट्यपूर्ण ठरला. या कार्यक्रमाला प्रधानमंत्री आणि मुख्यमंत्र्यांसह सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले, खासदार रामदास आठवले, माजी मंत्री सुलेखा कुंभारे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

लंडनमधील किंग हेन्री मार्गावरील या ऐतिहासिक वास्तूत प्रधानमंत्र्यांचे आगमन होताच 'जयभीम'च्या जयघोषांनी हा परिसर दुमदुमून गेला. प्रधानमंत्र्यांनी या वास्तूतील दुर्मीळ छायाचित्रे आणि अन्य संस्मरणीय वस्तूंची माहिती आस्थेने जाणून घेतली. भारावलेल्या मनाने बाबासाहेबांना भावपूर्ण अभिवादन केल्यानंतर प्रधानमंत्री व मुख्यमंत्र्यांनी बाहेर येऊन स्मारकासमोर मोठ्या संख्येने जमलेल्या नागरिकांना हात उंचावून अभिवादन केले.

बाबासाहेबांच्या या स्मारकामुळे समानता आणि सामाजिक न्यायाचा संदेश कायम जगाला प्रेरणा देत राहील, अशा भावना प्रधानमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केल्या. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भावना व्हिजिटर बुकमध्ये नोंदविल्या. त्यात त्यांनी लिहिले, 'एक ऐतिहासिक दिवस! भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तव्य केलेले घर, जेथे राहून त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये शिक्षण ग्रहण केले, ते घर आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींच्या हस्ते स्मारकरूपाने जनतेकरिता खुले झाले आहे. समता आणि बंधुता या आधारावर समाज आणि देश प्रगती करू शकतो, हे आपल्या संविधानाच्या माध्यमातून मा. बाबासाहेबांनी अधोरेखित केले आहे. भारतमातेच्या या सच्च्या सुपुत्राला माझी वंदना. जय भीम, जय भारत, जय महाराष्ट्र!'

इंदू मिलच्या जागेवर उभारण्यात येत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या भूमिपूजनासाठी प्रधानमंत्री मुंबईत आले असताना, मुख्यमंत्र्यांनी या ऐतिहासिक निवासस्थानाला भेट देण्याची त्यांना विनंती केली होती. प्रधानमंत्र्यांनी हे निमंत्रण सहर्ष स्वीकारून त्यानुसार आपल्या लंडन दौऱ्यात या कार्यक्रमाचा समावेश केला आणि हा ऐतिहासिक सोहळा प्रत्यक्षात साकारला.

### लंडनमध्ये बाबासाहेबांच्या नावाने अध्यासन

फेडरेशन ऑफ आंबेडकर आणि बुद्धिस्ट ऑर्गनायझेशन्स (फॅबो–युनायटेड किंगडम) या संस्थेतर्फे लंडनमध्येच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना या विषयावर आयोजित कार्यशाळेत मुख्यमंत्री सहभागी झाले. या कार्यशाळेस सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले, खासदार रामदास आठवले, संस्थेचे अध्यक्ष संतोष दास यांच्यासह ग्रेट ब्रिटनमध्ये कार्यरत असलेले आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बाबासाहेब जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञही होते. ब्रिटिश पौंड आणि डॉलरशी स्पर्धा करू शकण्यासाठी भारतीय रुपयाच्या परिवर्तनशीलतेच्या धोरणासारख्या उपाययोजना त्यांनीच सुचवल्या. अर्थतज्ज्ञ बाबासाहेब हा एक दुर्लक्षित पैलू असून तो जगासमोर ठळकपणे मांडण्याची गरज आहे. लंडनमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने सुरू होणाऱ्या प्रस्तावित अध्यासनाचा अभ्यासक–संशोधकांनी लाभ घ्यावा. महाराष्ट्र सरकार त्यासाठी आवश्यक ते पाठबळ देईल, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.



लंडनमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य असलेली वास्तू ताब्यात घेऊन तिचे स्मारकात रूपांतर करण्याचे दीर्घकाळापासूनचे स्वप्न प्रत्यक्षात साकारल्याबद्दल संस्थेतर्फे मुख्यमंत्र्यांचे या कार्यक्रमात विशेष आभार मानण्यात आले. ज्या साम्राज्यावरचा सूर्य कधीही मावळत नाही अशी कधीकाळी ख्याती असणाऱ्या भूमीत महान प्रज्ञासूर्याच्या गौरवाने पुलकित झालेला मुख्यमंत्र्यांचा लंडन दौरा आगळावेगळा ठरला.

**(लेखक हे मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०८१०८९७०४०४**

# प्रेरणा आणि चैतन्य

**विसाव्या शतकातील एक महान क्रांतिकारक नेते आणि तत्त्ववेते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण होऊन अर्धे शतक लोटले. त्यांच्या महापरिनिर्वाणास पुढील वर्षी ६० वर्ष होणार आहेत. त्यांच्या महापरिनिर्वाणास ५९ वर्ष झाल्यानंतर देखील त्यांच्या विचार आणि कार्याचे महत्त्व कमी झाले नाही. उलट त्यांच्या विचारांचे महत्त्व दिवसागणिक वाढत आहे.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजात मूलभूत परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न केले आहेत. त्यांनी भारतीय समाजाला नवीन दृष्टी दिली. समाजातील दलित, शोषित, पीडित समाजाला जागृत करण्यासाठी त्यांनी तत्त्वज्ञान दिले. डॉ. आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य नव्या भारताच्या जडणघडणीसाठी वाहून घेतले होते. इंग्रजांच्या दीडशे वर्षांच्या गुलामीतून भारत स्वतंत्र व्हावा, असे त्यांना वाटत होते. पण त्याचबरोबर शेकडो वर्षांपासून सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामीमध्ये खितपत पडलेला दलित, शोषित, पीडित समाजसुद्धा स्वतंत्र झाला पाहिजे, ही त्यांची इच्छा होती. म्हणून त्यांनी देशातील सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामीविरुद्ध बंड पुकारले होते. त्यांचे हे सामाजिक सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामीविरुद्धचे स्वातंत्र्ययुद्ध इंग्रजांच्या राजकीय गुलामीपेक्षा अधिक महत्त्वाचे होते. इंग्रजांच्या राजकीय पारतंत्र्यामध्ये असलेल्या भारतीय लोकांना राजकीय गुलामीची जाणीव होती. परंतु सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामीमध्ये असलेल्या लोकांना आपल्या गुलामीची जाणीव नव्हती. उलट आपण धर्माचे पालन करतो. दलित, आदिवासी आणि इतर मागासलेल्या लोकांनी आहे त्याच परिस्थितीत राहणे, हाच त्यांचा धर्म आहे, असे त्यांना वाटत होते म्हणून देशातील सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामीच्या संदर्भात फारसे बंड कुणी केले नव्हते.



**डॉ. प्रदीप आगलावे**

## गुलामीविरुद्ध लढा

डॉ. आंबेडकरांनी स्वत: अस्पृश्यतेच्या दाहक गुलामीचे चटके सहन केले होते म्हणून त्यांना जातिव्यवस्थेच्या गुलामीची जाणीव होती आणि त्यांनी त्या गुलामीविरुद्ध शोषित लोकांमध्ये जाणीव निर्माण करण्यासाठी सामाजिक गुलामीविरुद्ध लढा पुकारला. शेकडो वर्षांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामीविरुद्ध संघर्ष करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महानायक होते.

डॉ. आंबेडकरांनी केवळ राजकीय नव्हे, तर सर्वंकष गुलामीच्या विरुद्ध संघर्ष केला होता. ही बाब प्रत्येक भारतीयाने लक्षात घेतली पाहिजे.

## राज्यघटनेचे शिल्पकार

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वोत्कृष्ट अशी भारतीय राज्यघटना लिहिली. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. आंबेडकरांचा गौरव केला जातो. असे असले तरी डॉ. आंबेडकर भारतीय संविधान सभेमध्ये निवडून जाऊ नयेत म्हणून खूप प्रयत्न करण्यात आले होते. शेवटी बंगाल प्रांतातील जस्सौर व खुलना भागातून डॉ. आंबेडकर तेथील शेड्युल्ड कास्ट फेडरेशनतर्फे निवडून आले होते.

डॉ. आंबेडकरांचे संविधान सभेतील सदस्यत्व रद्द

व्हावे म्हणून बंगाल प्रांताची फाळणी करण्यात आली. इतकेच नव्हे तर दलितबहुल असलेला जस्सौर, खुलना, बरीसाल, फरीदपूर हा भाग पूर्व पाकिस्तानात (बांगलादेश) समाविष्ट करण्यात आला. त्यामुळे ज्यांनी डॉ. आंबेडकरांना निवडून दिले. त्यांना पाकिस्तानात पाठवण्यात आले. डॉ. आंबेडकरांचे एप्रिल १९४७ मध्ये संविधान सभेचे सदस्यत्व संपुष्टात आले. तेव्हा डॉ. आंबेडकर इग्लंडला गेले. तेथे त्यांनी इंग्रज नेत्यांना ठणकावून सांगितले की, ''भारताला स्वातंत्र्य देताना हिंदू, मुस्लीम आणि दलितांचे मत लक्षात घेतले जाईल, असे वचन दिले आहे. हिंदू आणि मुस्लीम यांचा विचार करण्यात आला. परंतु दलितांना विचारात घेण्यात आले नाही.'' तेव्हा इंग्रजांनी नेहरूंना कळवले की, कोणत्याही परिस्थितीत डॉ. आंबेडकरांना संविधान सभेवर निवडून पाठवा. इंग्रजांच्या दबावामुळे जून १९४७ मध्ये डॉ. आंबेडकरांना मुंबईमधून संविधान सभेवर पाठवण्यात आले.

राज्यघटना लिहिण्याची जबाबदारी डॉ. आंबेडकर यांना त्यांच्या उत्तुंग कर्तृत्वामुळे मिळाली. कुणाच्या तरी सांगण्यावरून नव्हे ही बाब लक्षात ठेवली पाहिजे. डॉ. आंबेडकर हे मसुदा समितीचे सदस्य होते. मसुदा समितीची बैठक २९ ऑगस्ट १९४७ ला झाली होती. त्यावेळी डॉ. आंबेडकर स्वतंत्र भारताचे कायदामंत्री होते. स्वतंत्र भारताचे मंत्रिमंडळ हे सर्वपक्षीय होते.

डॉ. आंबेडकरांप्रमाणेच इतर पक्षाचे लोकदेखील या मंत्रिमंडळात होते. डॉ. आंबेडकर हे कायदामंत्री असल्यामुळे ३० ऑगस्ट १९४७ च्या मसुदा समितीच्या बैठकीत सदस्यांनी समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. आंबेडकरांची निवड केली होती. मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून घटना लिहिण्याचे काम डॉ. आंबेडकरांकडे आले आणि त्यांनी अतिशय परिश्रम घेऊन राज्यघटना लिहीली.

## प्रेरणादायी आंबेडकर विचार

बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांना सर्वसामान्य लोक तर विसरले नाहीत, उलट त्यांच्या विचारांचा सर्वत्र जोमाने प्रचार होत आहे. डॉ. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान हे मानवी मूल्यांवर आधारित आहे. त्यांच्या विचारांमुळे देशातील शोषित पीडित जनता जागृत होत आहे. त्यांचे तत्त्वज्ञान हे कालबाह्य ठरले नाही. त्यांच्या तत्त्वज्ञानातून केवळ देशातीलच शोषित लोकांना प्रेरणा मिळाली नाही, तर इतर देशातील शोषित लोकांना प्रेरणा मिळत आहे. जपानमध्ये' बुराकू' नावाची एक शोषित जमात आहे. या जमातीच्या नेत्यांनी भारतात येऊन डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. आज ते नेते डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा बुराकू जमातीत प्रसार करीत आहे. बुराकू जमात डॉ. आंबेडकरांना आपले प्रेरणास्थान मानते. युरोपातील हंगेरी देशातील 'जिप्सो' लोकांचे नेते जानोस ओरसोस यांच्यावर डॉ. आंबेडकरांच्या क्रांतिकारी विचारांचा प्रभाव पडला. त्यांनी आंबेडकरांचा विचार हंगेरीतील जिप्सो लोकांमध्ये पेरून त्यांच्यात परिवर्तन घडवून आणले.

कार्ल मार्क्सच्या जीवनकाळात त्यांच्या तत्त्वज्ञानावर आधारित क्रांती घडली नाही. परंतु १९१७ मध्ये रशियामध्ये मार्क्सच्या तत्त्वज्ञानाच्या आधारे क्रांती घडून आली. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या क्रांतिकारी तत्त्वज्ञानामुळे देशातील शोषित समाज जागृत होत आहे. आंबेडकरवादाचा सर्वत्र पुरस्कार केला जात आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानावर आधारित फार मोठी क्रांती भारतात होऊ पाहत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाला महत्त्व प्राप्त होत आहे.

डॉ. आंबेडकरांनी भारतात बौद्ध धम्माचे पुनरुज्जीवन केले. ही घटना भारतातील बौद्ध धम्माच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. जगातील बौद्ध देशांनीदेखील डॉ. आंबेडकरांच्या या ऐतिहासिक कार्याची दखल घेतली आहे. इतर बौद्ध राष्ट्रात डॉ. आंबेडकरांचे ग्रंथ मोठ्या प्रमाणात वाचले जात आहेत. तैवान देशात डॉ. आंबेडकरांच्या इंग्रजी आणि हिंदी ग्रंथांच्या लाखो प्रती प्रकाशित करून हे ग्रंथ मोफत वाटले जात आहेत.

डॉ. आंबेडकरांना आदरांजली अर्पण करण्यासाठी मुंबईच्या चैत्यभूमीवर दरवर्षी ६ डिसेंबरला लोक लाखोंच्या संख्येने जातात. त्या दिवशी चैत्यभूमीवर जनतेचा महासागर असतो. नागपूरच्या दीक्षाभूमीवर दरवर्षी देशातील आणि जगातील लोक लाखोंच्या संख्येने येतात.

डॉ. आंबेडकरांच्या विचारांच्या आणि कार्याचा हा केवढा प्रभाव आहे? त्याच्या महापरिनिर्वाणास ५९ वर्ष झाली तरीदेखील लोकांचे प्रेम कमी झाले नाही.

## प्रत्येक भाषेत आंबेडकरवादी

डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेतून देशाच्या प्रत्येक भाषेत आंबेडकरवादी निर्माण झाले आहेत. त्यांच्यावर दरवर्षी अनेक संशोधक आणि साहित्यिक नवनवीन ग्रंथ लिहीत आहेत. विदेशातदेखील आंबेडकरी साहित्याची विशेष चर्चा असून, आंबेडकरी साहित्याचा अनुवाद इंग्रजीत मोठ्या प्रमाणात होत आहे. आज सर्वत्र डॉ. आंबेडकरांच्या ग्रंथांचा आणि आंबेडकरी साहित्याचा प्रचंड खप होतो. दीक्षाभूमी आणि चैत्यभूमीवर दरवर्षी कोट्यवधी रुपयांची पुस्तके विकली जातात. ज्या समाजाला शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले होते, त्या समाजात प्रचंड प्रमाणात ज्ञानार्जनाची वृत्ती निर्माण झाली.

## दडपता न येणारे विचार

डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार सर्वत्र जोमाने होत आहे. याचे कारण म्हणजे त्यांच्या विचारांची आज आवश्यकता आहे. त्यांच्या विचारांवर आधारित नवी क्रांती भारतीय समाजात निर्माण होण्याचे हे संकेत आहेत. लोकांच्या मनात डॉ. आंबेडकरांचा विचार रुजला आहे. देशात जी काही क्रांती होईल. ती फक्त आंबेडकरांच्या विचारांतून होऊ शकेल, असे चित्र आज समाजाच्या मनपटलावर दिसत आहे.

भारतात लोकशाही शासनव्यवस्था आहे. परंतु ही लोकशाही निवडणुकीपुरती मर्यादित आहे. अजूनही देशात आर्थिक आणि सामाजिक लोकशाही निर्माण झाली नाही. यासंदर्भात डॉ. आंबेडकरांनी २६ नोव्हेंबर १९४९ ला संविधान सभेत इशारा दिला होता. परंतु त्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. बुद्धाला अपेक्षित अशी समतामूलक समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी आणि राजकीय लोकशाही सामाजिक लोकशाहीत परिवर्तित करण्यासाठी क्रांतीची आवश्यकता आहे. ही क्रांती डॉ. आंबेडकरांच्या विचारांतून या देशात घडून येईल. डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणाच्या ५९ वर्षानंतरसुद्धा त्यांचे तत्त्वज्ञान आणि कार्य हे भारतीय समाजाला प्रेरणादायक आहे.

**(लेखक हे प्रोफेसर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठांतर्गत येणाऱ्या डॉ. आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख आहेत.)**
**संपर्क : ०९८८१२६२६६०**



इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे संकल्प चित्र.

# पंचतीर्थे - गौरव देशाचा

**भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीप्रीत्यर्थ केंद्र शासनाने आणि महाराष्ट्र शासनाने विविध प्रकल्प कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर शासनाच्या वतीने एवढ्या ताकदीने या योजना आजवर पुढे आलेल्या नाहीत. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारच्या या कार्याचा गौरव करणे हे भारतीय नागरिकांचे इतिकर्तव्य ठरावे. शासनाच्या वतीने बाबासाहेबांना दिलेला हा सन्मानच आहे.**

राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित जी पाच ठिकाणे आहेत, ती पंचतीर्थ म्हणून विकसित करण्यात येणार आहेत. त्यामध्ये महू (मध्यप्रदेश) येथील बाबासाहेबांचे जन्मस्थळ, दिल्ली येथील अलिपूर रस्त्यावरील वास्तू जेथे बाबासाहेबांचे वास्तव्य राहिलेले आहे, रत्नागिरी जिल्ह्यातील आंबडवे, इंदू मिल येथील आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक आणि लंडन येथील बाबासाहेबांचे वास्तव्य असलेले घर या पाच वास्तूंना स्मारकाचा दर्जा दिला जाणार आहे. बाबासाहेबांनी सामान्यातल्या सामान्य माणसाला न्याय दिला. बाबासाहेब हे फक्त दलितांचे नव्हे तर जगातील सर्व शोषितांचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी देशाला संविधान दिले. त्यामुळे त्यांच्या या कार्याची प्रेरणा आणि त्याबाबतची माहिती नव्या पिढीला व्हावी, यासाठी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे.



**बाबासाहेबांनी सामान्यातल्या सामान्य माणसाला न्याय दिला. बाबासाहेब हे फक्त दलितांचे नव्हे तर जगातील सर्व शोषितांचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी देशाला संविधान दिले. त्यामुळे त्यांच्या या कार्याची प्रेरणा आणि त्याबाबतची माहिती नव्या पिढीला व्हावी, यासाठी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित असलेल्या पंचस्थळांचा विकास करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे.**

**- नरेंद्र मोदी, प्रधानमंत्री**

**धनराज दाहट**

राज्य शासनाने आपल्या पहिल्याच वर्षात इंदू मिल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याच्या आश्वासनाची वचनपूर्ती केली. तेथे स्मारकाच्या कामाचे भूमिपूजन झाले आहे. याबरोबरच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षात राज्य शासनाने १२५ कोटी रुपये मागासवर्गीय बांधवांच्या

## रत्नागिरी जिल्ह्यातील आंबडवे # १



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील संस्मरणीय स्थळ म्हणजे आंबडवे. हे गाव रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यात आहे. या गावातच भीमरावाचे 'आंबेडकर' हे नाव झाले. म्हणून या गावाला त्यांच्या जीवनात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे.

ती घटना अशी आहे की, भीमरावांचे नाव सातारा येथील सरकारी माध्यमिक शाळा–सातारा हायस्कूल (आताचे प्रतापसिंह हायस्कूल) या शाळेत सुभेदारांनी नोंदवले. या शाळेत आंबेडकर नावाचे शिक्षक होते. त्यांचे बालभीमावर अलोट प्रेम होते. त्या शिक्षकाचे जीवनच न्यारे होते. त्यांनी बालभीमावर अतिशय प्रेमाचा वर्षाव केला. ते बाल भीमासाठी भाजी–भाकरी देत. त्याच्यावर निरातिशय प्रेम करीत.

भीमाचे नाव शाळेच्या दप्तरात 'आंबावडेकर' आहे, ते आडनिडे असल्यामुळे योग्य नाही असे आंबेडकर गुरूजींना वाटले. म्हणून त्यांनी आपले 'आंबेडकर' हे सुटसुटीत आडनाव लावावे, असे भीमाला सांगितले. लगेच गुरुजींनी शाळेच्या दप्तरात तशी नोंदही करून टाकली. आंबेडकर गुरुजींनी डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या रूपाने आपले आडनाव अजरामर करून टाकले.


आंबेडकर गुरुजींना आपल्या लाडक्या शिष्याचा म्हातारपणीही विसर पडला नाही. गोलमेज परिषदेसाठी जाताना आंबेडकर गुरुजींनी डॉ. आंबेडकरांना अभिनंदनपर पत्र दिले होते. तो एक अमोल ठेवा म्हणून डॉ. आंबेडकरांनी जपून ठेवला होता. हेच आंबेडकर गुरुजी कीर्तिमान झालेल्या
डॉ. आंबेडकरांना मुंबईच्या दामोदर सभागृहात भेटावयास आले असता डॉ. आंबेडकरांनी आपल्या गुरुजींचा येथोचित सन्मान केला आणि गहिवरून यांना नम्रतापूर्वक प्रणाम केला.

हेच ते आंबडवे गाव आहे ज्या गावी भीमरावांना 'आंबेडकर' हे आडनाव प्राप्त झाले, त्यामुळे हे स्थळ इतिहासात अजरामर झाले आहे.

कल्याणासाठी खर्च करण्याचा निर्णय घेतला आहे. इंदू मिलच्या जागेवर उभे राहणारे बाबासाहेबांचे स्मारक हे सर्वांसाठी प्रेरणादायी ठरेल.

बाबासाहेब लंडनमध्ये शिकत असताना ते ज्या घरात राहत होते ते घर राज्य शासनाने खरेदी केले असून त्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत लोकार्पण झाले आहे. येथे एक आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यात येणार आहे. जगभरातील विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकर यांच्या कार्याची माहिती येथून मिळणार आहे.

डॉ.आंबेडकरांच्या जीवनाशी निगडित असणारी ही स्थाने केवळ शोषित समाजासाठी प्रेरणास्थळे नाहीत तर जगभरातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थळे आहेत. विद्यार्जनाच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडवता येते हे संपूर्ण जगाला दाखवणारे द्रष्टे नेते, समाजसुधारक डॉ. आंबेडकर होते. त्यांच्या कार्याची दखल भारतीय समाजालाच नव्हे तर जगभरातील समाजसुधारकांना आणि विद्वानांना पुढची अनेक शतके घ्यावी लागेल. पिचलेल्या समाजाला मूळ प्रवाहात आणताना त्यांच्यात ज्ञानाचे, कर्तृत्वाचे आणि हक्क मागण्याचे स्फुल्लिंग जागविण्याचे महान कार्य डॉ. आंबेडकरांनी केले आहे.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जन्मभूमी असलेल्या महू येथे भव्य स्मारक उभारण्यात आले आहे.**

## महूमधील स्मारक # २

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म तत्कालीन मध्य प्रांतातील महू या ठिकाणी झाला. महू ही लष्करी छावणी होती. त्यालाच 'मिलिटरी हेड




**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिल्लीतील निवासस्थानाचे स्मारकात रूपांतर करून लोकार्पण करताना तत्कालीन प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी.**

## दिल्ली येथील निवासस्थान # ३

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील अंतिम महत्त्वाचे स्थान म्हणजे २६ अलिपूर रोड, दिल्ली येथील निवासस्थान, विधिमंत्री डॉ. आंबेडकरांचे याच निवासस्थानी वास्तव्य होते. 'द बुद्ध अँड हिज धम्म', 'बुद्ध ऑर कार्ल मार्क्स', 'रिव्होल्युशन अँड कांऊटर रिव्होल्युशन' या प्रसिद्ध ग्रंथांचे लेखन याच निवासस्थानी त्यांनी केले. तसेच शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या कार्यकारिणीची बैठक याच निवासस्थानी संपन्न झाली. याच निवासस्थानी त्यांचे रात्री झोपेतच ६ डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण झाले.

दहा वर्षांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की,'जोपर्यंत दलित वर्गाच्या सेवेसाठी माझ्या अस्तित्वाची आवश्यकता आहे तोपर्यंत मला आयुष्य लाभेल' नेमके तसेच घडले. बाबासाहेबांच्या निधनामुळे भारत देशाचे अमोल रत्न आपण गमावले आणि दलित समाज पोरका झाला असेच वाटले. बाबासाहेबांच्या निधनाची वार्ता वाऱ्यासारखी चहूदिशेला पसरली. सर्व चाहते, सरकारी अधिकारी आणि अनुयायी दिल्लीच्या २६ अलिपूर रस्ता येथे धावून आले. तासाभरात बाबासाहेबांच्या अंत्यदर्शनासाठी, निवासस्थानाबाहेर जनतेची प्रचंड गर्दी जमली होती. प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू डॉ.आंबेडकरांच्या निवासस्थानी धावत आले होते. 'आंबेडकर हे भारतीय मंत्रिमंडळातील एक अमोल रत्न आहे' अशी पंडित नेहरू परदेशीय पाहुण्यांना आंबेडकर विधिमंत्री असताना ओळख करून देत असत. पंडित नेहरू डॉ.आंबेडकरांच्या निवासस्थानी येताच त्यांनी अत्यंत सहानुभूतीने डॉ. सविता आंबेडकर यांची विचारपूस केली. डॉ.आंबेडकरांच्या अंत्यदर्शनासाठी गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत, दळणवळणमंत्री जगजीवनराम आणि राज्यसभेचे उपसभापती आले होते.

दुपारी आकाशवाणीवरून ती बातमी लक्षावधी भारतीयांचे हृदय हेलावून गेली होती. हजारो लोकांनी डॉ.आंबेडकरांच्या निवासस्थानाजवळ प्रचंड गर्दी केली होती, नंतर त्यांचे शव दिल्ली विमानतळावर रात्री ९.३० वाजता आले, तेथून एका खास विमानाने मुंबईला आणण्यात आले. अशाप्रकारे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या निवासस्थानी आपला अंतिम श्वास घेतला ते दिल्लीतील २६ अलिपूर रोड हे निवासस्थान आंबेडकरांच्या जीवनाशी संबंधित ऐतिहासिक स्थळ ठरले आहे.

क्वार्टर फॉर वार्स' अर्थात MHOW म्हटले जायचे. भीमराव यांचा सुभेदार रामजी मालोजी सकपाळ व भीमाबाई यांचे पोटी १४ एप्रिल १८९१ रोजी जन्म झाला. ते या दांपत्याचे १४ वे अपत्य होते.

रामजी सकपाळ यांना अठराशे नव्वदपर्यंत १३ अपत्य झाली होती. त्यापैकी बाळाराम, गंगा, रमाबाई, आनंदराव, मंजूळा, तुळसा ही मुले जगली. बाकीची लहानपणीच दगावली. मुलींची लग्ने लष्करी पेशाच्या गृहस्थांशीच झाली. बाळाराम हेही बँडमास्तर म्हणून लष्करात लागले.

रामजी सुभेदारांना पत्नीच्या प्रकृतीविषयी चिंता वाटत होती. त्यात कडक व्रतवैकल्ये, पूजाअर्जा आणि शारीरिक व्याधी यामुळे त्यांची प्रकृती दिवसेंदिवस ढासळत चालली होती. अशातच रामजी सुभेदारांची निरनिराळ्या लष्करी छावण्यात बदली होत होती. नंतर ते मध्य भारतातील महू येथील लष्करी छावणीत स्थिरावले होते.

रामजी सुभेदार पुण्यातील पंतोजी शाळेतील परीक्षा उत्तीर्ण होऊन शिक्षक झाले होते. हळूहळू लष्करी छावणीतील शाळेत ते मुख्य शिक्षक झाले. मुख्याध्यापकाचे काम त्यांनी जवळ जवळ चौदा वर्षे केले. त्यांच्या या सेवेचे चीज होऊन शेवटी त्यांना सुभेदार-मेजर पदापर्यंत बढती मिळाली. त्यांची शिकवण्याची हातोटी वाखाणण्यासारखी होती. त्यांची इच्छा अस्पृश्यांच्या उद्धारास्तव आपल्याला पुत्ररत्न व्हावे, अशी होती. अठराशे एक्याण्णवच्या चौदा एप्रिलला रामजी सुभेदाराची ती इच्छा पूर्ण झाली आणि महू येथे तपोनिष्ठ भीमाबाईंना पुत्ररत्न झाले. त्यामुळे या चौदाव्या रत्नाचे नाव सुभेदारांनी 'भीम' असे ठेवले. हाच भीम पुढे अस्पृश्यांचा उद्धारकर्ता आणि देशाचासुद्धा उद्धारक झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महू ही जन्मभूमी भारतीयांसाठी श्रद्धास्थान झाली आहे. या ठिकाणी लाखो जनता १४ एप्रिल रोजी आदरांजली व्यक्त करण्यासाठी भारताच्या काऱ्याकोपऱ्यातून येत असते. आता तिथे एक स्मारक उभे झाले आहे. भारतीय जनतेसाठी ते एक तीर्थस्थळ झाले आहे.

## लंडन येथील निवासस्थान # ४

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील एक महत्त्वाचे स्थळ म्हणजे लंडन येथील त्यांचे निवासस्थान. बाबासाहेब ५ जुलै १९२० रोजी आपला अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी लंडनला रवाना झाले होते. ३० सप्टेंबर १९२० रोजी त्यांना 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स' या संस्थेत एम.एस्सी. साठी प्रवेश मिळाला तसेच ग्रेज-इन या संस्थेत नाव दाखल करून त्यांनी बॅरिस्टरचा अभ्यास सुरू केला. लंडन विद्यापीठाने २० जून १९२१ रोजी आंबेडकरांना एम.एस्सी. ही पदवी बहाल केली आणि १९२२ मध्ये डॉक्टर ऑफ सायन्स या पदवीकरिता 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी' हा प्रबंध लंडन विद्यापीठात सादर केला. त्यानंतर त्यांनी जर्मनच्या बॉन विद्यापीठात अर्थशास्त्रावर पदवी प्राप्त करण्यासाठी प्रवेश घेतला, परंतु त्यांचे शिक्षक एडवीन कॅनन यांच्या



पत्रानुसार ते पुन्हा लंडनला परतले. डॉ. आंबेडकर १९२१-२२ अशी दोन वर्षे 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या संस्थेत शिक्षण घेत असताना किंग हेन्री मार्गावरील ज्या घरात राहत होते, ते घर आज ऐतिहासिक वास्तू झालेली आहे. याच वास्तूत डॉ. आंबेडकरांनी रात्रभर जागून, अर्धपोटी उपाशी राहून अभ्यास केला होता.

इंग्लंडच्या ज्या घरी डॉ. आंबेडकर राहायचे ती वास्तू तीन मजली असून २०५० चौरस फूट आहे. ती वास्तू महाराष्ट्र शासनाने ३५ कोटी रुपयांत खरेदी केली. आता त्या वास्तूवर 'सामाजिक न्यायाचे भारतीय शिलेदार डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (१८९१-१९५६), यांनी १९२१-२२ मध्ये वास्तव्य केले,' अशी अक्षरे कोरलेली आहेत.

## पंचतीर्थ

**मुंबईचे इंदू मिल # ५**

मुंबईमधील दादर हा भाग डॉ. आंबेडकर यांच्या वास्तव्याने पुनीत झालेला आहे. त्यांचे निवासस्थान 'राजगृह' हे दादरच्या हिंदू कॉलनीत आहे. त्यामुळे बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांचे पार्थिव विशेष विमानाने दिल्लीहून मुंबईला सांताक्रुझ विमानतळावर पहाटे तीन वाजता आणले गेले. तेथे जमलेल्या हजारो लोकांनी या थोर नेत्याचे पार्थिव दादर येथील बाबासाहेबांच्या 'राजगृह' या निवासस्थानी नेले.

७ डिसेंबरच्या दुपारी १.३० वाजता अंत्ययात्रेस प्रारंभ झाला. त्यानंतर ही अंत्ययात्रा दादरच्या हिंदू स्मशानात आली. आंबेडकरपुत्र यशवंतराव यांनी संध्याकाळी ७.३० वा. चिता पेटवताच जनसमुदाय शोकसागरात बुडून गेला. मुंबई नगरीच्या पोलिसांनी बाबासाहेबांना शेवटची मानवंदना दिली. अशा तऱ्हेचा सन्मान बिगरशासकीय व्यक्तीला मुंबईत प्रथमच देण्यात आला. ज्या दिवशी सांची येथे आठ दिवसांचा २५०० वा बुद्धजयंतीचा कार्यक्रम संपन्न झाला त्याच ७ डिसेंबर १९५६ ला बाबासाहेबांचा देह दृष्टिआड व्हावा, ही घटनाच विलक्षण आहे.

ज्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चितेला अग्नी देण्यात आला, त्याच ठिकाणी चैत्य बांधण्यात आले आहे. त्यालाच आज चैत्यभूमी म्हणतात. त्या ठिकाणी दरवर्षी आंबेडकरी जनता ६ डिसेंबरला देशाच्या कान्याकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने येते. आपली आदरांजली व्यक्त करीत असते. हा परिसर अतिशय लहान असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने इंदू मिलच्या १२ एकर जमिनीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक उभारण्याचा संकल्प केला आहे. या स्मारकामध्ये स्मृतिस्तूप, सभागृह, प्रेक्षकगृह, वस्तुसंग्रहालय, ग्रंथालय, शोभिवंत बगिचे, वाहनतळ इत्यादी निर्माण करण्याचे प्रयोजन आहे. या जागतिक दर्जाच्या नियोजित स्मारकाची पायाभरणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव आणि मुख्य अतिथी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. अशा प्रकारे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त ही पाचही स्थळे 'पंचतीर्थ' म्हणून विकसित करण्याचा संकल्प प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केला आहे. बाबासाहेबांना शासनाच्या वतीने या कार्यक्रमाच्या माध्यमातून ही राष्ट्रीय सलामीच ठरणार आहे.




**(लेखक हे आंबेडकरी विचारांचे ज्येष्ठ अभ्यासक आहेत.)**
**संपर्क : ०९८२२६९७०४८**



# आपले संविधान, आपली अस्मिता

नागपूर येथे एक लाख २५ हजार विद्यार्थ्यांनी खचाखच भरलेल्या यशवंत स्टेडियममध्ये, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुदायिक वाचन केले. विद्यार्थी व उपस्थित पाहुण्यांनी बुलंद आवाजात प्रास्ताविक वाचून परिसर दणाणून सोडला. या वेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळा आनंद ओसंडून वाहत होता. भारतीय संविधान हा एक पवित्र ग्रंथ आहे, या भावनेने ते भारावून गेले होते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला जगातले एक उत्तम संविधान दिले. या संविधानाने भारतातल्या प्रत्येक नागरिकाला जगण्याचा हक्क दिला. आज भारत विविध क्षेत्रात जी प्रगती करीत आहे, त्यामागे भारतीय संविधान आहे हे विसरून चालणार नाही, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीचे औचित्य साधून संविधानातील प्रास्ताविक वाचण्याचा उपक्रम सामाजिक न्याय विभागाने आयोजित केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी त्यांचे कौतुक केले.

व्यासपीठावर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले, राज्यमंत्री दिलीप कांबळे, सिने अभिनेते सिद्धार्थ जाधव, भारत गणेशपुरे, प्राजक्ता माळी, श्रीमती निशा परुळेकर, महापौर प्रवीण दटके आदी उपस्थित होते.

**भारतीय संविधानाबाबत जनजागृती आणि सर्व नागरिकांना संविधानाची ओळख व्हावी याकरिता देशभरात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. दरम्यान संविधानाच्या अधीन राहून महाराष्ट्राला अधिकाधिक प्रगतिशील राज्य बनविण्याचा प्रयत्न करीन, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे केले.**

प्रास्ताविक भाषणात सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले म्हणाले की, डॉ. बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून देशाला मोठे योगदान दिले आहे. संविधानामुळे गोरगरीब, आदिवासी, तसेच सामान्य माणसाला जगण्याचा मार्ग दाखवला असून प्रत्येकाला अभिमान वाटेल असे काम संविधानाच्या माध्यमातून होत आहे. संविधानाच्या माध्यमातून लोकशाही प्रगल्भ होत आहे. देशात समता, स्वातंत्र्य व बंधुत्व या तत्वांद्वारे देशाची वाटचाल सुरू असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटेल असे इंदू मिल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक उभारणीस मान्यता व लंडनमधील डॉ. आंबेडकरांचे घर खरेदी करुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे नाव संपूर्ण जगात नेले, याची नोंद इतिहासात नक्की होईल, असे त्यांनी या वेळी सांगितले.



सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे आभार मानताना म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून देशातील गोरगरीब आदिवासी, सर्वसामान्य माणसाला जगण्याची उमेद दिली. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव उज्वल उके, समाज कल्याण आयुक्त पियुष सिंह यांचेही समयोचित भाषण झाले.

### मंत्रालयात संविधान प्रास्ताविकेचे वाचन

सर्वसामान्यांना संविधानाची ओळख व्हावी या उद्देशाने मंत्रालयात गृह व संसदीय कार्य राज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील यांच्या उपस्थितीत भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. याप्रसंगी जलसंपदा राज्यमंत्री विजय शिवतारे, अपर मुख्य सचिव डॉ. पी. एस. मीना, अपर मुख्य सचिव (सेवा) डॉ. भगवान सहाय, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. नितीन करीर, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक चंद्रशेखर ओक, सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव राजेंद्र जाधव, अवर सचिव र. ग. पांचाळ आदी उपस्थित होते.

### संविधानाच्या माध्यमातून सामाजिक न्यायाची प्रतिष्ठापना

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगाला मार्गदर्शन करण्याची शक्ती संविधानाच्या निर्मितीतून देशाला दिली. या संविधानाच्या माध्यमातून राज्य शासन सामाजिक न्यायाची प्रतिष्ठापना करत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लॉर्ड बुद्धा चॅनेलच्या पाचव्या वर्धापन दिन व संविधान दिनानिमित्त विक्रोळीतील संभाजी मैदान येथे आयोजित कार्यक्रमात केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील टीव्ही मालिकेला शासन मदत करेल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या वेळी चॅनेलच्या 'भारत का संविधान' या महा मालिकेचे लोकार्पणही त्यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी गृहनिर्माण मंत्री प्रकाश महेता, आमदार गणपत गायकवाड, भदन्त आनंद महाथेरो, चॅनेलचे संस्थापक भैयाजी खैरकर आदी उपस्थित होते. संविधान दिनाच्या शुभेच्छा देऊन मुख्यमंत्री म्हणाले की, जाती, धर्म, भाषा, लिंग यापलीकडे जाऊन व्यक्तीला व्यक्ती म्हणून जीवन जगण्याचा व आपला विकास करण्याचा हक्क डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून दिला. जगातील सर्वोत्तम राज्यघटना म्हणून संविधानाचे स्थान आहे. संविधानाचे हे महत्त्व लक्षात घेऊनच प्रधानमंत्र्यांनी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. नागपूरमध्ये सामाजिक न्याय विभागाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात सुमारे सव्वा लाख विद्यार्थ्यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून जागतिक विक्रम केला आहे. या माध्यमातून संविधानाची माहिती सर्व लोकांपर्यंत पोहोचवण्याचे आणि डॉ. बाबासाहेबांनी दाखवलेल्या मार्गावर चालण्याचे काम शासन करत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फक्त घटनेचे शिल्पकारच नव्हे तर मोठे अर्थशास्त्रज्ञ व अर्थवेत्ते होते. त्यांचा हा पैलू जगासमोर येण्याची गरज आहे. लंडन येथील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या संचालकांनी त्यांचा हा पैलू समोर येण्यासाठी तेथे अध्यासन किंवा फेलोशीप देण्यास राज्य शासनास परवानगी दिली आहे, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले की, डॉ. आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित शासन करणार आहे. त्याद्वारे त्यांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. लंडन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य असलेल्या घरात शासनाने त्यांची फोटोबायोग्राफी तयार केली आहे. यामध्ये डॉ. आंबेडकर यांचे दुर्मीळ पत्र मिळाले असून ते जर्मन भाषेत आहे. विविध भाषांवरील त्यांचे प्रभुत्व यातून दिसून येते.

## समता व सामाजिक न्याय वर्ष

**यंदाचे वर्ष हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष आहे. मागास समाजाला दिशा देणाऱ्या या महामानवाचे यानिमित्ताने स्मरण व्हावे, यासाठी राज्य शासनामार्फत हे वर्ष 'समता व सामाजिक न्याय वर्ष' म्हणून साजरे होत आहे. त्यासाठी १२५ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.**



# वीज स्वयंपूर्णतेकडे वाटचाल

**विजेचा आता आवश्यक सेवांमध्ये समावेश झाला आहे. दररोजच्या जीवनात, प्रगतीसाठी आणि औद्योगिक विकासासाठी विजेशिवाय पर्याय नाही. राज्यात आणि देशातही विजेचे महत्त्व खूप आहे. हवा आणि पाण्याशिवाय मनुष्य जसा जिवंत राहू शकत नाही, तसेच विजेशिवायही जीवन जगणे कठीण आहे. दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या, वाढणारे औद्योगिक क्षेत्र पाहता विजेची मागणी पूर्ण करणे ही तारेवरची कसरत झाली आहे. त्यासाठी आपण गेले वर्षभर आटोकाट प्रयत्न करत आहोत. सांगताहेत नवीन व नवीकरणीय ऊर्जामंत्री**

**चंद्रशेखर बावनकुळे.**



**विवेक जोशी**

**महाराष्ट्रासारख्या उद्योगात पुढे असलेल्या राज्यात ऊर्जामंत्रिपदाचा कार्यभार आपण स्वीकारला याबाबत तुम्हाला काय वाटते?**

वास्तविक ऊर्जा खाते म्हणजे शिवधनुष्य पेलण्याचाच प्रकार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याप्रमाणेच केंद्रीय ऊर्जामंत्री पियुष गोयल आणि केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिलेल्या हिमतीमुळेच आपण या खात्याचे काम यशस्वीपणे पार पाडत आहोत. हे शिवधनुष्य आपण उचलू शकू की नाही, याबद्दल सुरुवातीला मन साशंक होते. पण पक्षाचे नेते आणि मुख्यमंत्र्यांनी सांगितलेल्या कोणत्याही जबाबदारीला नाही म्हणायचे नाही, असे ठरवल्यामुळे आणि जगदंबेच्या आशीर्वादाने व मुख्यमंत्र्यांनीच दिलेल्या ताकदीमुळे आपण हे शिवधनुष्य उचलले आहे.

या खात्याची जबाबदारी स्वीकारताना सुरुवातीला प्रचंड भीती वाटत होती. पण मंत्रिमंडळातील सहकारी, मित्र आणि वीज कंपन्यांमधील अधिकारी मित्रांच्या मदतीने पारदर्शकपणे कामे सुरू केली. त्यामुळे जबाबदारी सांभाळणे सोपे झाले. आता या खात्यातील काम संपूर्णपणे माहीत झाले आहे. राज्याच्या मंत्रिमंडळातील अत्यंत महत्त्वाचे असे हे खाते आहे. राज्यातील सुमारे बारा कोटी जनतेशी संपर्क या खात्यामुळे होतो आहे. सर्वांच्याच अपेक्षा या खात्याकडून वाढल्या आहेत. त्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. त्यातल्या त्यात शेतकरी, सर्वसामान्य ग्राहक आणि उद्योजक यांना अधिक न्याय देण्यास आपण प्राधान्य दिले आहे.

वर्षभराच्या काळात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. कार्यभार स्वीकारल्यानंतर सर्वप्रथम सर्वसामान्य ग्राहकांसाठी विजेचे दर कमी कसे करता येतील, यासाठी आपण प्रयत्न केले. ३५ पैसे प्रतियुनिट प्रमाणे दर कमी करण्यात आपण यशस्वी ठरलो. मुळातच वीजनिर्मितीसाठी लागणाऱ्या खर्चात कपात झाल्यामुळे जनतेला आम्ही हा दिलासा देऊ शकलो. आजपर्यंत असे प्रयत्न झाले नाहीत. तसेच कोळसा वाहतुकीच्या पद्धतीत बदल केल्यामुळे कोट्यवधी रुपयांची बचत झाली. त्यामुळेही वीजनिर्मितीचा खर्च कमी झाला आणि सर्वसामान्य जनतेला त्याचा फायदा देणे शक्य झाले.

सध्या कोळसा उपलब्ध नसल्यामुळे निर्मिती बंद आहे, अशी स्थिती नाही. केंद्रीय ऊर्जामंत्री पियुष गोयल यांच्या प्रयत्नांमुळे वेकोलि (वेस्टर्न कोल फिल्ड)कडून पुरेशा प्रमाणात कोळसा उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रत्येक वीजनिर्मिती केंद्राकडे १५ दिवसांचा कोळशाचा साठा आहे. अशी स्थिती महाराष्ट्रात यापूर्वी कधी नव्हती. आज वीजनिर्मितीसाठी कोळशाची टंचाई अजिबात नाही. पण वीजनिर्मितीचे संच जुने झाले आहेत. त्यातून मिळणारी वीज ही महागडी

आहे. या संचांच्या दुरुस्तीसाठी कोट्यवधींचा खर्च आहे. तो करणे परवडणारे नाही. म्हणून महानिर्मितीच्या ज्या संचातून पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती होत आहे, ते संच सुरू आहेत. याशिवाय खाजगी वीजनिर्मिती कंपन्यांनी कोट्यवधींचे भांडवल वीजनिर्मिती प्रकल्पांसाठी खर्च केले, ते प्रकल्प बंद पडले आहेत. या प्रकल्पांमध्ये शासनाचे भागभांडवल गुंतवून हे प्रकल्प सुरू करणे व त्यातून मिळणारी वीज सर्वांना पुरवणे असा निर्णय घेण्यात येत आहे. यामुळे कमी खर्चात नवीन ऊर्जानिर्मिती केंद्रे उपलब्ध होतील. गॅसची उपलब्धता कमी आहे, ही बाब खरी आहे. पण हा विषय केंद्र शासनाशी संबंधित आहे. या संदर्भात केंद्रीय ऊर्जामंत्र्यांशी चर्चा सुरू आहे. लवकरच त्यावर निर्णय होणार आहे. त्यानंतर गॅसच्या वीजनिर्मितीसाठी अडचणी निर्माण होणार नाही.

### राज्यातील भारनियमनाबाबत काय सांगाल?

राज्यात भारनियमन अजिबात नाही असा आपला दावा नाही. पण कोणाच्या घरात भारनियमनामुळे अंधार आहे अशी स्थिती कुठेही नाही. तांत्रिक बिघाडामुळे, देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी किंवा बिल भरले नसेल अशाच वेळी वीज मिळत नाही. अन्यथा घरगुती वापरासाठी २४ तास राज्यात वीज उपलब्ध आहे. केवळ कृषिपंपासाठी ८ तास वीज पुरवठा करता येतो. त्यासाठी शासनाने कायदा केला आहे. ८ तासांपेक्षा अधिक वीज देता येत नाही. कारण जमिनीतील पाणी उपसण्यावर बंधने आली आहेत. त्यामुळे कृषिपंपांना आठ तास वीजपुरवठा हे खाते देणार आहे. भारनियमन आहे असे म्हणणे हास्यास्पद ठरणार आहे. भारनियमनमुक्त राज्य हे स्वप्न नव्हे, तर प्रत्यक्षात साकार झालेले स्वप्न ठरले आहे.



**जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना योग्य मोबदला शासनाने दिला आणि मच्छीमारांच्या मनातील भीतीही बऱ्याच प्रमाणात दूर झाली आहे. या प्रकल्पामुळे त्यांच्या व्यवसायावर कोणतीही गदा येणार नाही. पण प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांनी वेगळेच चित्र निर्माण केले आहे. हा तिढाही सोडवण्यात लवकरच यश येईल.**

### 'मेक इन महाराष्ट्र' प्रकल्पासाठी ऊर्जाखात्याकडून कशी साथ मिळते आहे?

'मेक इन महाराष्ट्र' हा फक्त मुख्यमंत्र्यांचाच अजेंडा नाही, तर मंत्रिमंडळातील सर्वच मंत्र्यांसाठी अत्यंत प्राधान्याचा आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. मुख्यमंत्र्यांनी केलेली ही घोषणा प्रत्यक्षात आणण्यासाठी आपण कसून प्रयत्न करत आहोत. राज्यात १९९९ नंतर प्रथमच वीजदरात ५.८२ टक्के कपात झाली आहे. आता तर शून्य ते ३०० युनिटपर्यंतचा वापर करणाऱ्या ग्राहकाला या दराचा लाभ मिळणार आहे. सर्वसामान्य ग्राहक दर महिन्याला ३०० युनिट वीज वापरत नाही. उद्योगांना कमी वीज दर असावे म्हणून एक समिती गठित झाली आहे. या समितीचा अभ्यास सुरू आहे. लवकरच या समितीचा अहवाल शासनाला सादर होणार आहे. त्यावर मुख्यमंत्री आणि ऊर्जाखाते विचार करून उद्योगांना कमी दरात वीज उपलब्ध करून दिली जाईल, याबद्दल मला शंका नाही. तसेच वीज गळती आणि नुकसान रोखण्यासाठी फिडर फ्रँच्याईझी ही संकल्पना आणली आहे.

### अपारंपरिक ऊर्जास्रोतांकडे तुम्ही कसे बघता?

अपारंपरिक ऊर्जास्रोत ही आता काळाजी गरज झाली आहे. अगदी या खात्याचा कारभार स्वीकारल्याच्या दिवसापासून आपण सौर ऊर्जेबाबत जनजागृती सुरू केली आहे. सौरऊर्जेच्या क्षेत्रात परदेशातील कंपन्याही गुंतवणूक करण्यास तयार आहेत. त्यासाठी आवश्यक असलेले धोरण शासन जाहीर करणार आहे. सौरऊर्जेच्या क्षेत्रात महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण या शासनाच्या तांत्रिक संस्थेचे काम जोमाने सुरू झाले आहे. सौरऊर्जेवर आधारित राज्यातील ५ लाख शेतकऱ्यांना कृषिपंप देण्याचा आपला प्रयत्न आहे. नवीन व नवीकरणीय ऊर्जास्रोतांपासून वीजनिर्मितीचे सुमारे १५ हजार मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प उभारणीचे उद्दिष्ट आहे. यासोबतच पवनऊर्जा, ऊसाच्या चिपाडांपासून वीजनिर्मिती, कृषी अवशेषांपासून निर्मिती, लघुजल वीज निर्मिती, औद्योगिक कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यात येत आहेत. याशिवाय पारेषणविरहित वीजनिर्मितीचे एकत्रित धोरण तयार करण्याचा संकल्प आहे. तो लवकरच प्रत्यक्षात येणार आहे.

### नागपूरचे पालकमंत्री म्हणून काय सांगाल?

पालकमंत्री म्हणून कोराडी तीर्थस्थळाचा विकास करण्यासाठी ४३१ कोटींचा प्रकल्प मंजूर करवून घेतला आहे. अनेक वर्षांपासून या कामासाठी पाठपुरावा सुरू होता. मिहानच्या पुनर्वसनासाठी १५०८ कोटींना शासनाने मान्यता दिली आहे. तसेच नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, एम्स रुग्णालय, आयआयएम, आयआयआयटी या संस्थांसाठी शासनाकडे प्रयत्न करून जागा मंजूर करून आणल्या आहेत. गेल्या ऑगस्टमध्ये झालेल्या अतिवृष्टीग्रस्तांना शासनातर्फे तत्काळ मदत मिळवून दिली गेली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सुरू व्हावी, यासाठी प्रयत्न करून दिल्लीपर्यंत धाव घेतली. आता ही बँक सुरू होत आहे. डीपीसीअंतर्गत ३०० कोटींच्या शहर आणि जिल्ह्यातील विकासकामांना मंजुरी दिली आहे. आदिवासींसाठी ६५ कोटी आणि अनुसूचित जातीच्या उपयोजनांसाठी १३२ कोटींना मंजुरी दिली आहे. जलयुक्त शिवार योजनेत २०१८ पर्यंत संपूर्ण जिल्हा टँकरमुक्त करण्याचे आपले धोरण आहे. नागपूर शहरातील सर्वच विद्युतवाहिन्या भूमिगत करण्याचा निर्णय घेतला आहे. सौर ऊर्जेस प्राधान्य देण्यात येत आहे. विद्युत निरीक्षक हा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ऊर्जा विभागाकडे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. कोराडी आणि चंद्रपूर येथील नवीन औष्णिक वीजनिर्मिती संचाचे काम पूर्णत्वास गेले असून मार्च-२०१६ अखेर २००० मेगावॅटपेक्षा जास्त वीज राज्याला उपलब्ध होणार आहेत. महापारेषणचे अतिरिक्त वीजपुरवठा करण्यासाठी नवीन प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. सर्व जिल्ह्यांच्या ऊर्जा विभागाच्या आढावा बैठका वर्षभरात पूर्ण केल्या आहेत. तसेच मार्च-२०१६ पर्यंत सर्व कृषिपंपाच्या प्रलंबित वीजजोडण्या पूर्ण झालेल्या असतील. दररोज १६ ते १८ तास काम मी करत आहे. पुढील काळात होणाऱ्या प्रगतीत ऊर्जा खात्याचे सर्वात जास्त योगदान राहील, याची ग्वाही मी महाराष्ट्राच्या जनतेस देत आहे.

**(लेखक हे नागपूर येथील दै. तरुण भारतचे बिझिनेस एडिटर आहेत.)**
**संपर्क : ०९७६३७१३४०१**

## एक दिवस मंत्र्यांसोबत



**सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री राजकुमार बडोले हे मितभाषी, सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेला लोकप्रिय नेता म्हणून ओळखले जातात. कामाच्या आणि कार्यक्रमांच्या अत्यंत व्यस्ततेतूनसुद्धा कामानिमित्त त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येक माणसाशी त्यांचा संवाद असतो. येणाऱ्या व्यक्तीचे समाधान होईल हीच त्यांच्या कामाची पद्धत आहे. नुकताच त्यांच्यासोबत जिल्ह्यात विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने एक दिवस घालवला. सर्वसामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक व्हावी, जिल्ह्यातील विविध विकास कामे पूर्ण करून जिल्ह्याचा मानवी विकास निर्देशांक कसा वाढेल, याबाबतची त्यांची तळमळ दिसून आली.**

# सुसंवाद आणि समन्वय

गोंदिया हा राज्याच्या पूर्वेकडचा जिल्हा. मुंबई या राज्याच्या राजधानीपासून राज्याच्या शेवटच्या टोकावर असलेला गोंदिया. या जिल्ह्याला तब्बल १५ वर्षानंतर राज्य मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व मिळाले आणि पालकमंत्र्याची जबाबदारीसुद्धा १५ वर्षानंतरच मिळाली. जिल्ह्याच्या विकासाबाबतचा पालकमंत्री राजकुमार बडोले यांचा ध्यास त्यांच्या दर आठवड्यात जिल्ह्यातील विविध कार्यक्रमाच्या उपस्थितीतून दिसून येतो.

सडक/अर्जुनी येथे पंचायत समितीजवळ पालकमंत्री राजकुमार बडोले यांचे निवासस्थान. त्यांचे स्वीय साहाय्यक समीर बनसोडे यांचेशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून पालकमंत्री ६ नोव्हेंबर रोजी येणार असल्याची खात्री करून घेतली. सरकारच्या वर्षपूर्तीनिमित्त केलेल्या कामाच्या प्रसिद्धीचा शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यासाठी ६ नोव्हेंबर रोजी सकाळी त्यांचे घर गाठले. देवरी, गोंदिया व मतदारसंघातील नागरिकांनी त्यांच्या विविध प्रकारच्या कामाच्या निमित्त गर्दी केली होती. माझ्याकडे त्यांचे लक्ष जाताच त्यांनी हसत विचारले, 'बोला कसे आहात तुम्ही, आज काही विशेष!' अगदी सकाळीच आलात. वर्षपूर्तीनिमित्ताने चित्ररथाला हिरवी झेंडी दाखवायची असल्याचे, पहिले पाऊल वचनपूर्तीचे यानिमित्ताने काढलेल्या घडीपुस्तिकेचे व एक वर्षपूर्ती निमित्ताने काढलेल्या लोकराज्य मासिकाच्या अंकाचे विमोचन करावयाचे असल्याचे त्यांना सांगताच त्यांनी तत्काळ होकार दिला. 'चला आपण चित्ररथ बघू या' म्हणून घरातून बाहेर आले. घरी आलेल्या सर्व कार्यकर्त्यांना व कामानिमित्ताने आलेल्या नागरिकांना या कार्यक्रमात त्यांनी सहभागी करून घेतले. एक वर्षपूर्तीनिमित्त जिल्ह्यात केलेल्या भरीव कामगिरीची सचित्र माहिती असलेला चित्ररथ पाहून विविध योजनांचे जिंगल्स ऐकून तसेच यानिमित्ताने काढलेल्या घडीपुस्तिकेचे त्यांनी कौतुक केले. या वेळी त्यांनी केलेल्या मार्गदर्शनातून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाबाबतची त्यांची तळमळ दिसून आली. त्यानंतर त्यांच्या गाड्यांचा ताफा गोंदियाकडे रवाना झाला.

**विवेक खडसे**



गोंदिया येथे पालकमंत्र्यांनी जिल्ह्यातील विविध भागातील कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांचे प्रश्न तातडीने मार्गी लावता यावे, यासाठी जनसंपर्क कार्यालय सुरू केले आहे. या कार्यालयातून जिल्ह्यातील अनेक गावातून येणाऱ्या नागरिकांची कामे तातडीने होण्यास मदत होत आहे. तेथे येणाऱ्यांची आस्थेवाईकपणे विचारपूस करून त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यावर त्यांचा भर असल्याचे दिसून आले.

नवीन क्रीडासंकुलात स्थानांतरित झालेल्या जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे उद्‌घाटन केल्यानंतर त्यांनी क्रीडासंकुलाचा फेरफटका मारला. अपूर्णावस्थेतील कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देऊन राज्यात गोंदियाचे क्रीडासंकुल हे आदर्श कसे होईल, यासाठी शासनाकडून निधीची कमतरता पडू देणार नसल्याची ग्वाही त्यांनी दिली. या क्रीडासंकुलातून जिल्ह्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळाडू निर्माण झाले पाहिजेत, यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले. यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात राज्य सरकारच्या एक वर्षपूर्तीनिमित्त त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

राज्य सरकारने एक वर्षाच्या कार्यकाळात घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांची आणि जिल्ह्यात प्रभावीपणे राबवलेल्या योजनांची माहिती दिली.





जलयुक्त शिवार अभियान, २५० रुपये प्रति क्विंटल धानाला बोनस, दुष्काळमुक्तीचा संकल्प, शेतकऱ्यांची सावकारी कर्जमुक्ती, महाराजस्व अभियान, कृषिपंपाचा अनुशेष दूर करणे, बार्टीचा मेळावा याबाबतची माहिती तर दिलीच याव्यतिरिक्त राज्याचा सामाजिक न्यायमंत्री म्हणून केलेल्या कामाचा लेखाजोखासुद्धा त्यांनी मांडला. या खात्याचा मंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२१-२२ या कालावधीमध्ये लंडन येथील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये शिक्षण घेत असताना वास्तव्य केलेले घर खरेदी केल्याचा व मुंबई येथील इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाचे भूमिपूजन प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते झाल्याचा, सार्थ अभिमान त्यांच्या बोलण्यातून दिसून येत होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी तसेच कायमस्वरूपी बांधकामे करण्यासाठी रुपये १२५ कोटींची तरतूद केल्याचेही त्यांनी सांगितले.

पालकमंत्र्यांचा मतदारसंघ अर्जुनी /मोरगाव. या मतदारसंघात सडक/अर्जुनी आणि अर्जुनी/मोरगांव तालुक्यांचा समावेश आहे. या तिन्ही तालुक्यातील काही गावे नक्षलप्रभावित आहेत. या गावांचा विकास झाला पाहिजे, यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून जास्तीत जास्त निधी मिळण्यासाठी त्यांची धडपड सुरू आहे. धान उत्पादकांचा जिल्हा तसेच धानाचे कोठार म्हणून ओळख असलेल्या आपल्या जिल्ह्यातील शेतकरी बांधवांची सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी आता पीक पद्धतीत बदल व्हावा, यासाठी ते आग्रही असतात. धान उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचा दिलासा त्यांनी दिला. २०१४-१५ च्या खरीप हंगामात अवकाळी पाऊस व नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल २५० रु. अतिरिक्त मदत देऊन, जी त्यांच्या पुढाकारामुळे मिळाली. पूर्व विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांना त्यामुळे मोठा दिलासा मिळाला. जिल्ह्यातील ३६ हजार ७६० शेतकऱ्यांना ३३ कोटी १० लक्ष रुपयांची मदत त्यांच्यामुळे मिळाली. बडोले साहेब आमदार होण्यापूर्वी देवरी येथील पंचायत समितीच्या लघु पाटबंधारे विभागात शाखा अभियंता म्हणून शासकीय सेवेत होते. लोकांचा प्रतिनिधी होऊन लोकांच्या समस्या आपण चांगल्याप्रकारे सोडवू शकतो, यासाठी त्यांनी शाखा अभियंता पदाचा राजीनामा दिला. राजकारणातून समाजसेवा करण्याचा निर्णय घेतला. मतदारांनी त्यांना अर्जुनी/मोरगांव विधानसभा मतदारसंघातून दुसऱ्यांदा निवडून दिले.

**(लेखक गोंदियाचे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९४२३४३४३०८**

**स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत नागरिकांना स्वच्छतागृहांची सवय लागावी व त्यातून मागणी वाढावी यासाठी त्या त्या नगरातील सार्वजनिक स्वच्छतागृहे दुरुस्त करण्यात आली. उघड्यावर शौचास जाणाऱ्यांचा गांधीगिरी पद्धतीने सन्मान करण्यात आला. काही ठिकाणी हलगी वाजवून तर काही ठिकाणी गुलाबपुष्प देऊन भल्या पहाटे हा सन्मान करण्यात आला. या सन्मानानेही मानसिकता बदलली नाही त्या ठिकाणी, उघड्यावर शौचास जाणाऱ्या व्यक्तिंचे फोटो फलकावर झळकवण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मदतीने बालवीर पथकाची स्थापना करून आपण कोठे शौचास जाता? अशी विचारणा करण्यात आली. जिल्हाधिकारी तुकाराम मुंढे यांच्या या सर्व संकल्पना नगरविकास शाखेचे प्रशासन अधिकारी त्रिंबक ढेंगळे-पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी या जिल्ह्यात अमलात आणल्या. त्यामुळे कमी कालावधीत हे अभियान सोलापूर जिल्ह्यात यशस्वी ठरले. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तुकाराम मुंढे यांच्याशी केलेली बातचीत....**



# स्वच्छतेचा सोलापूर पॅटर्न

**विजयकुमार सोनवणे**

### हागणदारीमुक्त गाव प्रत्यक्षात आणण्यासाठी केलेल्या उपाय योजना कोणत्या?

गाव हागणदारीमुक्त करायचे असेल तर पहिल्यांदा स्वच्छतागृहांची सुविधा करणे आवश्यक होते. सार्वजनिक स्वच्छतागृहे नसतील तर, ही संकल्पना यशस्वी होणे शक्यच नव्हते. त्यामुळे वैयक्तिक स्वच्छतागृहे घेण्यावर भर दिला. शासन किती देणार यापेक्षा नागरिकांची मागणी किती याला प्राधान्य दिले. नागरिकांनी उघड्यावर शौचास बसू नये म्हणून हलगी वाजवणे, गांधीगिरी मार्गाने नागरिकांना फूल देणे, त्यांची मिरवणूक काढणे, शहरात मोक्याच्या ठिकाणी उघड्यावर बसणाऱ्या नागरिकांची छायाचित्रे लावणे, शौचालय बांधकाम करण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करणे इ. गोष्टी केल्या. रात्रीच्या वेळी मैदान घाण केले जाऊ नये यासाठी फ्लड लाईट्स'ला लावले. सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा केली. बार्शी व पंढरपूर सोडले तर उर्वरित सात नगरपरिषदा शंभरटक्के हागणदारीमुक्त झाल्या आहेत. त्यामध्ये जिल्ह्यातील कुर्डुवाडी, करमाळा, अक्कलकोट, दुधनी, मैंदर्गी, मंगळवेढा व सांगोला या नगरपरिषदांचा समावेश आहे. या नगरपरिषदांची आता राज्यस्तरीय समितीकडून तपासणी होणार आहे.

### घनकचरा व्यवस्थापनाचे नियोजन व त्यास कितपत यश मिळाले?

घरोघरी जाऊन कचरा गोळा केला. १५ जानेवारी २०१५ पासून त्याची सुरुवात केली. घंटागाडीचे मार्ग निश्चित केले. त्याचे वेळापत्रक चौका-चौकात लावले. घंटागाडीतच कचरा टाकायचा आहे याची जाणीव नागरिकांना करून दिली. वेळापत्रक माहिती असल्याने नागरिकांनीही त्यास प्रतिसाद दिला आणि घंटागाडीची वेळेत वाट पाहिली आणि कचरा गाडीतच टाकला. परिसरातील सर्व कचराकुंड्या काढून टाकल्या. शहरात कुठेही अशा कुंड्या न ठेवण्याची सक्त सूचना केली. त्यामुळे जवळपास रोज ९५ टक्के कचऱ्याचे संकलन करणे शक्य झाले.

जिल्ह्यात २२ फेब्रुवारी २०१५ रोजी रविवार या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी विशेष मोहीम राबवली. या मोहिमेत माझ्यासह महापौर, लोकप्रतिनिधी, जिल्ह्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी मिळून जवळपास ३६ हजार जणांचे हात या स्वच्छतेच्या कामात गुंतले होते. ६/७ तासांत प्रत्येक कार्यालय, कार्यालयाच्या परिसराची मोहिमेच्या माध्यमातून स्वच्छता करण्यात आली. याद्वारे दिवसभरात सुमारे ६०८ टन कचरा उचलण्यात आला. जिल्ह्यातील स्वच्छतेची ही मोहीम यशस्वी झाल्यानंतर १२ एप्रिल रोजी पंढरपूर शहर स्वच्छतेसाठी विशेष मोहीम राबवली. जिल्ह्यातील सर्व शासकीय विभागाचे अधिकारी, कर्मचारी मिळून ११ हजार जण स्वच्छतेच्या कामात सक्रियपणे सहभागी झाले. या विशेष मोहिमेतून पंढरपूर शहरातील १४५ मेट्रिक टन कचरा उचलला.

### आषाढी यात्रेचे नियोजन कसे केले?

दरवर्षी यात्रा येते. यंदा त्यासाठी इव्हेंट मॅनेजमेंट केले. आषाढी पालखी सोहळा निर्विघ्नपणे पार पडावा यासाठी प्रथमच आपत्ती व्यवस्थापनांतर्गत हॅम रेडिओ आणि हॉटलाइनचा वापर केला. पालखी सोहळ्यातील दररोजची माहिती मुख्यमंत्र्यांच्या मुंबईतील नियंत्रण कक्षाला दिली. आषाढी यात्रेमध्ये यंदा प्रथमच आपत्ती प्रतिसाद कृती प्रणालीचा (आयआरएस) वापर केला. यामध्ये एकूण ५२ विभागांचा सहभाग घेण्यात आला. या प्रणालींतर्गत मंदिर

## स्वच्छतेचा दूधनी पॅटर्न

**अक्कलकोट तालुक्यातील दूधनी गावात नगरपरिषदेच्यावतीने दहा बालवीर पथकांची स्थापना करण्यात आली. चौदा वयोगटाखालील मुलांचा या पथकात समावेश करून गावातील महिलांकडे विचारणा करण्यात येऊ लागली. 'आमची आई स्वच्छतागृहाचा वापर करते, तुम्ही शौचास कुठे जाता? उघड्यावर की स्वच्छतागृहात' अशी विचारणा बालवीर पथकांमधील बालकांकडून रोजच होऊ लागल्याने आपसूकच महिलांमध्ये स्वच्छतागृहांबद्दल आस्था व जागृती निर्माण झाली. या मुलांना नगरपरिषदेच्यावतीने टी शर्ट देण्यात आले. त्यामुळे या बालवीर पथकाचा गावामध्ये वेगळाच रुबाब तयार झाला. बालवीर असे प्रश्न विचारत असल्याने लोकांनी सकारात्मक प्रतिसाद द्यायला सुरुवात केली. आणि त्याचे आज दृश्य परिणाम दिसू लागले आहेत.**



परिसराबरोबर शहरातील जुनीपेठ, नवीपेठ, संतपेठ व बसस्थानक या पाच ठिकाणी प्रमुख विभाग केले. शहरातील सर्व घटना आणि घडामोडींची नोंद या ठिकाणी झाली. यात्रा काळात मोबाइल रेंजची समस्या मोठी असते. अशा वेळी अधिकाऱ्यांच्या संपर्कात बाधा येऊ नये म्हणून यात्रेत प्रथमच हॉटलाइन या विशेष सेवेचा उपयोग केला. हॅम रेडिओ या आधुनिक संवाद माध्यमाचादेखील प्रथमच यात्रेमध्ये वापर केला. हॅम रेडिओ या प्रणालीचा पंढरपूर शहरापासून शंभर किलोमीटर परिघामध्ये उपयोग झाला. त्याचे प्रमुख केंद्र शिंगणापूर येथे होते. यात्राकाळात वारकऱ्यांना कोणताही त्रास न होता जास्तीत जास्त भाविकांना श्री विठ्ठलाचे दर्शन घेता यावे यासाठी प्रशासनाने प्रयत्न केले. यात्रा विनाविघ्न पार पडावी यासाठी सूक्ष्म आराखडा करून त्याचे तंतोतंत पालन केले.

### यात्रेच्या कालावधीतील नियोजन कसे केले ?

ज्या ठिकाणी पालखी मुक्कामाला येणार आहे, त्या परिसरात अगोदरापासूनच स्वच्छता केली. वीजेची सोय केली. पालखी पुढच्या मुक्कामाला निघाल्यावर तीन तासांत पूर्वीचा परिसर स्वच्छ केला. पालखी मार्गावरील सर्व रस्ते खड्डेमुक्त केले. पिण्याचे पाणी, कूपनलिकांची सोय केली. आपत्कालीन स्थितीत संपर्कासाठी टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून दिला. पंढरपूरमधील ६५ एकरच्या परिसरात तात्पुरत्या स्वच्छतागृहांची सुविधा केली. त्यामुळे वारकऱ्यांनी नदीपात्राचा वापर केला नाही. परिणामी अनारोग्याच्या तक्रारी आल्या नाहीत. कचऱ्यासाठीही कुंड्या ठेवल्या. स्नान करण्यासाठी पाण्याची गरज असते. त्यामुळे फक्त ९० दिवसांत बंधारा बांधला. उघड्यावर प्रातर्विधी करण्यास बंदी घातली. निरीक्षणासाठी पथके नियुक्त केली. त्यामुळे यंदा वारकरी व भाविकांना पहिल्यांदाच नदीपात्राच्या परिसरातून जाताना नाका-तोंडाला रुमाल लावून जावे लागले नाही.

### सोलापूरकरांना आपण काय संदेश द्याल?

आपण एकविसाव्या शतकात आहोत. माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात आहोत. स्मार्ट टीव्ही, स्मार्ट मोबाइल वापरताना स्वच्छतेच्या बाबतीत घाण राहणे शोभणारे नाही. स्मार्ट मोबाइल, स्मार्ट घरांसाठी प्रत्येक घरी वैयक्तिक स्वच्छतागृह असणे आवश्यक आहे. त्यामाध्यमातून आरोग्य जपता येईल. या माध्यमातून स्मार्ट तालुका, स्मार्ट शहर, स्मार्ट व स्वच्छ भारत संकल्पना प्रत्यक्षात साकार होईल.

**(लेखक हे सकाळ वृत्तपत्र समूहात सोलापूर येथे वरिष्ठ पत्रकार म्हणून कार्यरत आहेत.)**
**संपर्क : ०९८८११३३१०१**

## काय आहे सोलापूर पॅटर्न

- **गाव हागणदारीमुक्त करायचे असेल तर पहिल्यांदा स्वच्छतागृहांची सुविधा करणे आवश्यक होते. सार्वजनिक स्वच्छतागृहे नसतील तर, ही संकल्पना यशस्वी होणे शक्यच नव्हते. त्यामुळे वैयक्तिक स्वच्छतागृहे घेण्यावर भर दिला.**
- **शासनाचे अनुदान हा एक घटक झाला. पण लोकांना शौचालय वापरास उद्युक्त केल्यावर शासन किती देणार यापेक्षा नागरिकांची मागणी किती याला महत्त्व आले.**
- **उघड्यावर शौचास जाणाऱ्यांचा गांधीगिरी पद्धतीने सन्मान' करण्यात आला. काही ठिकाणी हलगी वाजवून तर काही ठिकाणी गुलाबपुष्प देऊन भल्या पहाटे हा सन्मान करण्यात आला. या सन्मानानेही मानसिकता बदलली नाही त्या ठिकाणी उघड्यावर शौचास जाणाऱ्या व्यक्तींचे फोटो फलकावर झळकविण्यात आले.**
- **स्वच्छता अभियानात लोकसहभाग महत्त्वाचा होता. लोकांच्यात सातत्याने जागरूकता निर्माण केल्यानंतर तो मिळाला. मिळालेल्या लोकसहभागाला योग्य दिशा दिली. त्यामुळे परिणामात त्याचे रूपांतर झाले.**



- **लोकांच्या मनात संकोच निर्माण झाल्यास ते शौचालय वापरायला सुरुवात करतात.**

# स्वच्छतेची लोकचळवळ

मोवाड नगरपरिषद ही विदर्भातील पहिली हागणदारीमुक्त नगरपरिषद ठरली. १ ऑक्टोबर २०१५ रोजी पदाधिकारी व मुख्याधिकारी यांचा मुख्यमंत्र्यांनी गौरव केला. मोवाड नगरपरिषद ही १८६७ ला स्थापन झाली. हे शहर पूर्वी ५२ हेक्टर परिसरात वसले होते. ३० जुलै १९९१ ला महापूर आल्यामुळे २०४ लोकांना जलसमाधी मिळाली होती. आता या नगराचे ६६५ हेक्टर क्षेत्रात पुनर्वसन करण्यात आले आहे. या नगरात शेतीचा व्यवसाय करणारे नागरिक मोठ्या प्रमाणात आहेत. या गावाची लोकसंख्या ८ हजार ७७७ आहे. यात पुरुष ४४४४ तर स्त्रिया ४३३३ आहेत. येथे प्राथमिक,



केले. या आवाहनाला लोकांनीही खूप चांगला प्रतिसाद दिला. अस्वच्छता लोकांना नको असते, पण पैशाची अनुपलब्धता तर कधी योग्य मार्गदर्शनाचा अभाव यामुळे लोक शौचालयांचा वापर करत नाहीत, त्यामुळे जनजागृती करणे आवश्यक बनले. लोकांना केलेल्या आवाहनानंतर लोक शौचालय बांधण्यासाठी उद्युक्त झाले. त्यांनी शौचालय बांधण्यासाठी अर्ज केले. ज्या नागरिकांनी ऑनलाइन अर्ज केले त्या नागरिकांची स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची सविस्तर माहिती देण्यासाठी जाहीर सभा घेण्यात आली. या सभेत ज्यांच्याकडे शौचालय नाही त्यांना शौचालय बांधण्यासाठी निधी देण्यात आला.

**राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील स्वच्छ भारताची संकल्पना साकार करण्यास व व्यापक जनचळवळ उभी करण्यासाठी नागपुरात १२ जून २०१५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत, चिटणवीस सेंटर येथे झालेल्या नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्या कार्यशाळेनंतर सुरुवात झाली. नागपूर जिल्ह्यात १२ नगरपालिका व महादुला आणि मौदा या नव्याने झालेल्या नगरपंचायतीमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. या मोहिमेला चांगले यश आले आहे. मोवाड आणि उमरेड नगरपरिषदेने या कामात आघाडी घेतली आहे. इतरही नगरपरिषदांमध्ये स्वच्छतेची कामे जोमाने सुरू आहेत, याबाबत सांगताहेत नागपूरचे जिल्हाधिकारी सचिन कुर्वे**

माध्यमिक व महाविद्यालयापर्यंतचे शिक्षण नगरपरिषद व्यवस्थापनाच्या अंतर्गत आहे. मोवाड नगरपरिषदेत शासनामार्फत विविध योजना राबवण्यात आल्या आहेत. यामध्ये कमी खर्चाची स्वच्छता योजनांतर्गत ३०७, एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत २७१ व अनुसूचित जाती व नवबौद्धासाठी घरकूल योजनेंतर्गत ६८ रमाई आवास असे एकूण ६४६ घरांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

### आवाहनाला प्रतिसाद

स्वच्छ महाराष्ट्र अभियानासाठी जुलै व ऑगस्ट या महिन्यात प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले. या वेळी लोकांना शौचालय बांधकाम करण्यास प्रवृत्त करण्यात आले. सोबतच जाहीर सूचना देऊन लोकांनी शौचालयाचा वापर करावा, उघड्यावर जाऊ नये, यासाठी घरोघरी जाऊन आवाहन

यासोबतच सप्टेंबर ते ऑक्टोबर २०१५ यादरम्यान राष्ट्रीय स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यासाठी माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी विशेष प्रयत्न केले. निबंध स्पर्धा घेण्यात आली. सोबत नगरपरिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी स्वत: शेणाचे उकिरडे उचलण्यास सुरुवात केल्यामुळे नागरिकांचा त्यात सहभाग वाढला. लोकांच्या सहकार्यामुळे मोवाड नगरपरिषद स्वच्छ होऊ शकली.

### प्लास्टिक वापरावरही बंदी

स्वच्छतेची सवय लागणे महत्त्वाचे असते. शहरात अस्वच्छता येण्यामागे प्लास्टिक पिशव्यांचा अनिर्बंध वापर हे एक कारण होते. केवळ स्वच्छताच नव्हे तर निसर्ग रक्षणासाठी प्लास्टिकवर बंदी आणणे आवश्यक होते. त्यामुळे मोवाड नगरपरिषदमध्ये प्लास्टिक वापरावर बंदी घालण्यात आली. यासाठी व्यापारी व व्यावसायिकांची सभा घेण्यात येऊन प्लास्टिक वापरावर बंदी आणण्याचे आवाहन केले. त्या आवाहनाला व्यापाऱ्यांनी प्रतिसाद दिला. सार्वजनिक ठिकाणी आठवडी बाजारात नवरात्र उत्सवात, प्लास्टिकमुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामाचे संगणकीय सादरीकरण करण्यात आले. त्यामुळेच मोवाड नगरपरिषदेला हे यश प्राप्त होऊ शकले.




**शब्दांकन : अनिल ठाकरे**

**(लेखक हे नागपूरचे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**

**संपर्क: ०९४२२८६८७२४**

## स्वच्छ महाराष्ट्र अभियानासाठी स्वतंत्र कोष

**राज्यात राबवण्यात येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियानासाठी स्वच्छ महाराष्ट्र कोष स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत राज्यातील ग्रामीण आणि नागरी भागात राबवण्यात येणाऱ्या योजनांसाठी हा कोष वापरण्यात येणार आहे.**

**मुख्यमंत्री या कोषाचे अध्यक्ष असतील. तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री, नगरविकास राज्यमंत्री, मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव (वित्त), प्रधान सचिव (नगर विकास-१), प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता), सचिव (नगर विकास-२) यांचा सदस्य म्हणून समावेश असून स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचे राज्य संचालक हे कोषाध्यक्ष असतील. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाची राज्यात अंमलबजावणी सुरू झाली आहे. या अभियानांतर्गत राज्यातील सर्व शहरे आणि गावे हागणदारीमुक्त करून स्वच्छ करायची आहेत. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी वैयक्तिक शौचालये, सामुदायिक शौचालये आणि घनकचरा व्यवस्थापन यासाठी येणाऱ्या खर्चाच्या प्रमाणात प्राप्त होणारे केंद्र व राज्य शासनाचे अनुदान पुरेसे नाही. तसेच सार्वजनिक शौचालयांसाठी केंद्र व राज्यशासनाचे अनुदान उपलब्ध होणार नाही. त्यामुळे या दोनही शासनाच्या निधीव्यतिरिक्त इतर स्रोतांमधून निधी उपलब्ध करण्याची गरज भासू लागली होती. त्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला.**




### विद्यार्थी स्वच्छतादूत

थंड हवेसाठी प्रसिद्ध असलेल्या लोणावळा नगरपरिषद स्वच्छता अभियान जोरदाररीत्या राबवत आहे. निसर्गसौंदर्याने नटलेल्या लोणावळ्याला स्वच्छ करण्यासाठी नगरपरिषदेने कंबर कसली आहे. स्वच्छतेच्या मोहिमेत लोणावळा नगरपरिषदेने विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले आहे. विद्यार्थ्यांनी स्वच्छतेविषयी जागृती निर्माण केली तर त्याचा पालकांवर आणि पर्यायाने समाजावर लवकर परिणाम होतो. यासाठी एका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. नेहमीच्या स्पर्धेपेक्षा ही स्पर्धा वेगळी आहे. ५ ते ९ वी पर्यंतचे विद्यार्थी वर्गनिहाय स्पर्धेत सहभागी झाले आहेत. हे विद्यार्थी लोकांना स्वच्छतेबाबत माहिती देतात उदा. कचरा करू नये, सार्वजनिक जागांवर थुंकू नये, प्लास्टिकचा वापर टाळावा अशा प्रकारचे आवाहन हे विद्यार्थी करत आहेत. याबरोबरच घराच्या आजुबाजूच्या परिसरातील सुका कचरा गोळा करून तो वर्गशिक्षकांकडे जमा करत आहेत. या स्पर्धेतील प्रत्येक विद्यार्थ्याला एक पासबूक दिले आहे. त्यावर विद्यार्थ्याला गुण दिले जातात. ज्या विद्यार्थ्याचे सर्वाधिक गुण होतील त्याला बक्षीस दिले जाणार आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान
सप्तपदी स्वच्छतेची

## सांगलीच्या स्वच्छतादूत...

आमच्या वस्तीवर ३० उंबरं हायत.. प्रत्येकाच्या घरात संडास हाय. पर मी आणि माझी चुलतजाऊ आम्ही दोघींच्याच घरात नव्हता. आमची कच्चीबच्ची उघड्यावर जायची, लय कसंसच व्हायचं... ग्रामसेवक आला आन् म्हटला तुम्ही का बरं माग रायला... आमच्या जिव्हारी लागलं. काय बी करून आपल्या बी



घरात संडास पायजे.. असं वाटू लागलं. मग काय केलं धाडस. गळ्यातली सर ठिवली सोनाराकडे.. सुशीला भीमराव दुधाळ सांगत होत्या.

सुशीला भीमराव दुधाळ.. शिक्षण सातवी.. राहणार अग्रण धुळगा-वजवळची दुधाळ वस्ती. पती हयात नाहीत. शेतमजुरी करून दोन मुलं आणि एका मुलीसह संसाराचा रहाटगाडा पुढे नेताहेत. त्यांचीच चुलतजाऊ म्हणजे रुक्मिणी तुकाराम दुधाळ. शिक्षण पाचवी. पती शेतमजुरी करतात. पदरी दोन छोटी मुलं... या दोघींच्याच घरात शौचालय नसल्याचा डंख त्यांच्या मनाला डसत होता. आपली मुलं उघड्यावर शौचास जातात, ही सल मनाला बोचत होती. त्यामुळे दोघींनीही गळ्यातील सर गहाण ठेवण्याचे धाडस केले. आज त्यांच्या घरात शौचालय बांधकाम सुरू आहे, याचा अभिमान त्यांच्या बोलण्यातून जाणवत होता. वाशिमपाठोपाठ आता सांगली जिल्ह्यात स्वच्छतेचे महत्त्व जाणून स्वतःचे दागिने गहाण ठेवून शौचालय बांधण्यासाठी पुढे आलेल्या सुशीला भीमराव दुधाळ आणि रुक्मिणी तुकाराम दुधाळ या दोघी तुमच्या आमच्यासारख्याच... पण आज हे उदाहरण समाजापुढे ठेवून त्यांनी आपले वेगळेपण दाखवून दिले आहे. आता या दुधाळ भगिनी सांगली जिल्ह्याच्या स्वच्छतेच्या ब्रँड अँबेसेडर म्हणजेच स्वच्छतादूत बनल्या आहेत. ही त्यांची नवी ओळख. आरोग्याविषयी त्यांनी दाखवलेली जागरूकता दखल घेण्याजोगी आहे. स्वच्छ भारत अभियानाबरोबरच स्वच्छ महाराष्ट्र हे अभियान राज्यात सुरू आहे. त्याला ग्रामीण भागातून मिळणारा हा प्रतिसाद वाखाणण्याजोगा आहे.

**शब्दांकन : संप्रदा बीडकर**
**(लेखिका या सांगली जिल्ह्याच्या माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क: ०९४२२८६८७२४**



# न्याय नागपूर कराराला

**महाराष्ट्राचा विकास व्हायचा असेल तर प्रादेशिक असमतोल दूर झाला पाहिजे हे ओळखून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदाचा कारभार स्वीकारल्यापासून याला प्राधान्य दिले. त्याचमुळे गेल्या वर्षभरात विदर्भात अनेक विकास कामे सुरू झाली. महाराष्ट्र निर्मितीवेळी झालेल्या नागपूर करारालाच एक प्रकारे न्याय देण्याचे काम मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले आहे.**

**सुधीर पाठक**

नागपूर करार २८ सप्टेंबर १९५३ ला झाला. या करारावर रा.कृ.पाटील, पी.के. देशमुख, रामराव देशमुख, गोपाळराव खेडकर, शेषराव वानखेडे, पंढरीनाथ पाटील या वैदर्भीयांची तर यशवंतराव चव्हाण, भाऊसाहेब हिरे, लक्ष्मणराव भटकर आणि देवकीनंदन यांच्या सह्या आहेत. राज्यांची पुनर्रचना व्हावी व काही राज्यांचे नव्याने गट तयार व्हावेत ही मागणी दृष्टिक्षेपात आल्यावर आणि उच्चस्तरीय समिती नेमण्यात आल्यावर मराठी भाषकांचे एक राज्य व्हावे यासाठी हा करार होता. याच करारात मुंबई ही या मराठी राज्याची राजधानी राहील हे स्पष्ट करण्यात आले होते. पण नागपूर शहर हे अनेक वर्षापासून राजधानीचे शहर होते. त्यामुळे या शहरात दरवर्षी विधिमंडळाचे अधिवेशन घेतले जाईल व सरकार काही काळ नागपुरात राहील याची ग्वाही देण्यात आली. पण नागपूर कराराच्या या १० व्या कलमाची अंमलबजावणी त्याची मूळ भावना व शब्द याप्रमाणे झाली नाही. हे अधिवेशन उरकण्याचा एक उपचार तेवढा उरला होता पण देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात युतीचे सरकार सत्तेवर आले आणि खऱ्या अर्थाने या कराराची अंमलबजावणी सुरू झाली.

वास्तविक मागील वर्षी ऑक्टोबर अखेर हे सरकार सत्तेवर आले. सरकारने मुंबईला पहिले अधिवेशन होऊन विश्वासदर्शक ठराव पारित केला होता. त्यामुळे हे सरकार पुन्हा नागपूर अधिवेशनाला समोरे गेले नसते तर फारसा कुणी त्यांना दोषही दिला नसता पण मुख्यमंत्र्यांनी मागील शासनापेक्षा एक दिवस जास्त अधिवेशन नागपूरला घेतले. या वर्षीदेखील डिसेंबर महिन्यात ७ तारखेला नागपूरला अधिवेशन सुरू होत असून ते तीन आठवडे सुरू राहणार आहे. सध्याच्या



वेळापत्रकाप्रमाणे हे अधिवेशन २३ डिसेंबरपर्यंत चालणार आहे. आतापावेतो काही वैदर्भीय नेते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झालेत. कै. वसंतराव नाईक हे तब्बल ११ वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. पण महाराष्ट्राचे कृषी विद्यापीठ पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात राहुरीला द्यावे लागले होते. पुढे विदर्भात आंदोलन झाल्यावर त्यांना ४ भागात ४ ठिकाणी कृषी विद्यापीठे स्थापन करावी लागली. विदर्भात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोल्यात झाले तर मराठवाड्याचे कृषी विद्यापीठ परभणीत तर कोकणाचे कृषी विद्यापीठ दापोलीला झाले. चंद्रपूरचे मारोतराव कन्नमवार महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री होते पण त्यांची कारकिर्द ३६६ दिवसांचीच राहिली. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सरकार स्थापन झाल्यावर त्यांनी या नागपूर कराराची भावना व शब्दनिहाय (Letter and Spirit) अंमलबजावणी सुरू केली आहे.

या नागपूर करारातील ७ वे कलम सांगते की, राज्याचे उच्च न्यायालय हे मुंबईला राहील आणि त्याचे दुसरे पीठ नागपूरला असेल. या ठिकाणी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नेमताना योग्य प्रमाणात सर्व विभागांना संधी दिली जाईल. देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षभराच्या काळात न्यायमूर्तींच्या नेमणुका झाल्या नाहीत (नॅशनल ज्युडिशियल कमिशन की कॉलेजियम) या वादात त्या राहिल्या असतील पण उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनंतर महत्त्वाचे पद राज्याच्या महाअधिवक्त्याचे राहते. त्या जागी पहिले सुनील मनोहर यांची व त्यांनी राजीनामा दिल्यावर श्रीहरी अणे यांची नेमणूक करण्यात आली. या नेमणुका करताना महाराष्ट्रातील अन्य भागावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घेण्यात आली.

या सरकारचे आणखी एक वैशिष्ट्य जाणवते ते म्हणजे या सरकारला राजकीय पक्षांची फूटपट्टी लावून निकाल व नेमणुका होत नाहीत. विदर्भ विकास मंडळावर बॅकलॉग या विषयातील तज्ज्ञ मधुकरराव किम्मतकर यांची नेमणूक झाली. किंमतकर हे काँग्रेसी नेते आहेत व माजी मंत्रीही आहेत. पण त्यांच्या ज्ञान व अनुभवापुढे राजकीय पक्ष आडवा आला नाही. याशिवाय मंडळावर नेमणूक करताना तरुण रक्ताला वाव देण्यात आला आहे. राज्यात साहित्य संस्कृती मंडळ, विश्वकोश मंडळ व भाषा विकास मंडळ ही तीन महत्त्वाची मंडळे आहेत. एकही अध्यक्षपद विदर्भाला देण्यात आले नाही. उलट त्या ठिकाणी अन्य विभागांना प्रतिनिधित्व देण्यात आले. मात्र विभागातील मुख्यमंत्री आहे हे जाणवण्यासारखे काही निर्णय या सरकारने प्रारंभीच घेतले. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी या संस्थेला वारंगा येथे १०० एकर जमीन देण्यात आली. केंद्रीय विद्युत अनुसंधान संस्थेला मौजा घुटी येथे १२१ एकर जागा देण्यात आली.

## विदर्भासाठी घेतलेले महत्त्वाचे निर्णय

- **नागपूर, वर्धा, बुलढाणा जिल्हा बँकांना ३८० कोटी शासकीय अर्थसाहाय्य मंजूर**
- **कापूस पणन महासंघास सीसीआयचा उपअभिकर्ता म्हणून मान्यता. रुपये ६९९.९६ कोटींची कापूस खरेदी.**
- **विदर्भातील वर्धा, अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा, अकोला जिल्ह्यांसाठी अन्नसुरक्षा**
- **नागपूर मेट्रोसाठी जेट्रोचे सहकार्य**
- **नागपूर आणि सिस्को यांच्यात नागपूर स्मार्ट सिटीसाठी करार.**
- **मेळघाटमधील हरिसाल येथे डिजिटल व्हिलेज**
- **नागपुरात सिएट टायर्सचा प्रकल्प, १००० कोटींची गुंतवणूक**
- **पहिली मोबाइल सोशल मीडिया लॅब चंद्रपुरात**
- **राज्यातील पहिल्या ई-चालान सुविधेचा प्रारंभ नागपूर ग्रामीण पोलीस कार्यालयातून**
- **विदर्भ आणि मराठवाड्यातील कृषिपंपाचा संपूर्ण अनुशेष दूर करण्यासाठी रुपये ८१९ कोटींची तरतूद**
- **नागपूर-मुंबई हा ८०० किमीचा नवा दळणवळण द्रुतगती मार्ग (कम्युनिकेशन्स सुपर एक्सप्रेस वे) ३० हजार कोटी रुपये खर्च करून २०१९ पर्यंत पूर्ण करणार**
- **वडसा-देसाईगंज-गडचिरोली व वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे प्रकल्पांना मान्यता**
- **नागपुरात इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंटची स्थापना, व्हिएनआयटीमध्ये पहिली बॅच सुरू.**
- **नागपूर येथे इंडियन इन्स्टिट्युट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी ही संस्था स्थापन करण्यास मंजुरी**

**अमरावतीमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे टेक्सटाईल पार्क, नांदगावपेठ एमआयडीसीत ५०० हेक्टर जागा संपादित, ८ उद्योग सुरू, २००० कोटींची गुंतवणूक**



नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीला मौजा कालडोंगरी येथे ६० एकर जागा देण्यात आली. नागपूर मिहान येथील मौजा दहेगाव सेक्टर २० मधील जागा इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम)ला देण्यात आली आहे. ही जागा २० एकर आहे.नागपूर आय.आय.एम.चे काम प्राथमिक स्तरावर व्हीएनआयटीला सुरू झाले आहे. प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम सुरू झाला आहे. याशिवाय ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सला मौजा दहेगांव येथील २०० एकर जागा शासनाने मंजूर केली आहे.

## राष्ट्रीय संस्थांची स्थापना

आतापावेतो अनेक संस्था नागपूर विदर्भाच्या दिशेने वाटचाल सुरू जरूर करायच्या नंतर मात्र, त्या अन्यत्र जात. या वेळी पहिल्यांदा असे झाले की, एक दोन नव्हे तर ५ राष्ट्रीय स्तरावरील संस्था नागपूरला सुरू होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे. याशिवाय नागपूर-विदर्भाचा चेहरामोहरा बदलून टाकणारा मिहान प्रकल्प गतिमान झाला आहे. त्या ठिकाणी विभिन्न भागातून मोठया प्रमाणात उद्योग येणे सुरू झाले आहे. मिहान जर पूर्ण क्षमतेने सुरू झाले तर या परिसराचा कायापालट झाल्याविना राहणार नाही. या उद्योगांना मोठ्या प्रमाणावर लागणारे अभियंते आज विदर्भातील



अभियांत्रिकी महाविद्यालयातून उपलब्ध झाले आहेत. आतापावेतो या अभियंत्यांना रोजगार मिळत नव्हता. इंजिनिअर होऊनही लाज वाटावी, अशा वेतनावर काम करावे लागत असे. आता त्यांना रोजगार संधी उपलब्ध होतील. त्यामुळे आजमितीला अभियांत्रिकी महाविद्यालयात भरपूर जागा रिक्त राहत होत्या. त्यामुळे त्या महाविद्यालयांचे अर्थकारण बिघडून जात असे. त्या परिस्थितीत मिहान नक्की परिवर्तन आणेल, हा या भागात विश्वास आहे.

## मेट्रो आली...

नागपूरला मेट्रोचे दोन प्रकल्प आले आहेत. त्यांचे भूमिपूजनही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले आहे. कामठी रोडवरील ऑटोमोटिव्ह चौक ते मिहान खापरी हा एक मार्ग आहे तर दुसरा मार्ग भंडारा रोडवरील पारडी ते हिंगणा असा राहणार आहे. त्या प्रकल्पांचे काम सुरू झाले आहे. मेट्रोभवन आता दीक्षाभूमीसमोर अस्तित्वात येत आहे. शिवाय प्रत्यक्ष मेट्रोच्या कामाला प्रारंभ झाला आहे.

हे सर्व प्रकल्प नागपुरात येऊ लागले. तेव्हा पुणे भागात अस्वस्थता सुरू झाली होती. माध्यमांनीही नागपूरलाच प्रकल्प जात आहेत, असा सूर लावला होता. पण काही काळातच पुणेकरांच्याही लक्षात आले की, आपल्यालाही भरभरून मिळते आहे. मेट्रो प्रकल्पही सुरू होत आहे. मग प्रादेशिकवादाची ही तक्रार हळूहळू विरत गेली. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी ३० हेक्टर जागा देण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर पूर्ण झाली आहे.

याशिवाय सुधाकरराव नाईक यांच्या कार्यकाळात कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ स्थापन झाले होते. त्यासाठी विद्याशाखीय विस्तारासाठी कालडोंगरी येथे ५० एकर जागा देण्यात आली. एनआयपीईआर व एकात्मिक आदिवासी प्रकल्पांतर्गत एकलव्य इंग्रजी माध्यमाचे पब्लिक स्कूलही कामठी तालुक्यातील मौजा चिंचोली येथे सुरू होत आहे.

## मुक्त पांदण रस्ते मोहीम

या सर्व बाबी जनतेला व माध्यमांनाही दिसत होत्या. पण सामान्य जनतेला यापेक्षा वेगळे काही तरी हवे असते. त्यांचे विशेषतः ग्रामीण भागातील जनतेचे प्रश्न वेगळे असतात. त्याची कल्पना शहरी भागात राहणाऱ्या जनतेला येत नाही. ग्रामीण जनतेच्या अनेक प्रश्नांपैकी एक प्रश्न आहे, पांदण रस्त्याचा अतिक्रमणमुक्त पांदण रस्त्यांची मोहीम राजस्व अभियानांतर्गत राबवली गेली. जनसहभागातून हे पांदण रस्ते मुक्त करण्याचा हेतू त्यामागे होता. नागपूर विभागात १३४९ कि.मी.अतिरिक्त पांदण रस्ते आहेत. त्यापैकी ५८१.७२ कि.मी लांबीचे रस्ते मोकळे करण्यात आले. हे काम जवळ-जवळ ५० टक्के आहे, असे ढोबळमानाने म्हणता येऊ शकते. ग्रामीण जीवनाचा अविभाज्य भाग असलेले पांदण रस्ते पुनर्जीवित झाले. या मोहिमेमध्ये पांदण रस्ते दर्शविलेले गाव नकाशे तयार करून ते दर्शनी भागात लावण्यात आलेत. असे अतिक्रमण झालेले पांदण रस्ते लोकांनी स्वत: मुक्त केले तर काही ठिकाणी मात्र कायदेशीर कारवाई सुरू करावी लागेल.

याशिवाय चावडी वाचन या योजनेच्या माध्यमातून गावखेड्यातील तक्रारींचे निवारण करण्यात आले. नागपूर विभागात चावडी वाचनाचे कार्यक्रम ६४ तालुक्यात ६०० च्या जवळपास आयोजित करण्यात आले. यात १४९७ गावे चंद्रपूर जिल्ह्यातील आहेत. या चावडी वाचनाचा हा उच्चांक चंद्रपूरने मिळवला आहे. याशिवाय ग्रामीण भागात फेरफार हा भागही महत्त्वाचा राहतो. प्रलंबित फेरफार नांदी निकालात काढण्यासाठी मंडळ स्तरावर फेरफार अदालत आयोजित करण्यात आल्या होत्या. नागपूर विभागातील ६४ तालुक्यात ६४ हजारावर फेरफार करण्यात येऊन सर्व खातेदारांना सुधारित जमीन अभिलेख पुरवण्यात आले.

आदिवासींचे हीत जपण्यासाठी अधिकार अभिलेखात कलम ३६ अन्वये हस्तांतरणावर निर्बंध घालण्यात आले आहेत. पण आतापावेतो ही कायदेशीर तरतूद फक्त कागदपत्रावर होती. पण युती शासनाने मोहीम राबवून ७८५१ गावांमधील नोंदी घेण्याचे काम पूर्ण केले. आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन गैरआदिवासी खातेदाराला जमिनीचे हस्तांतरण रोखण्याला या योजनेमुळे मोठा हातभार लागला.

## गोसीखुर्द प्रकल्प

वैनगंगेवर गोसीखुर्द प्रकल्प बांधला जात आहे. या प्रकल्पाचा प्रारंभ स्व.राजीव गांधी प्रधानमंत्री असताना झाला होता. त्यांनी या प्रकल्पाचे भूमिपूजन केले होते. पण नाना कारणांमुळे हा प्रकल्प खूप रखडला होता.



त्याच्या किमतीतही भरपूर वाढ झाली. शिवाय प्रकल्प मोठा पाटबंधारे म्हणून गाजण्याऐवजी भ्रष्टाचाराने अधिक गाजला. आता हा प्रकल्प राष्ट्रीय पाटबंधारे प्रकल्प झाला आहे. पण या ठिकाणी विस्थापितांचे खूप प्रश्न होते. ३० ऑक्टोबर १४ ला १४,९८४ कुटुंब व १७०८२ शेतकरी खातेदार अशा ३२,०६६ खातेदारांना ६८,११२.५० लाख रुपये देण्यात आले. आता ३० ऑक्टोबर १५ ला १४९११ कुटुंब व १८,३६७ शेतकरी खातेदार अशा ३३,२७८ खातेदारांना ८०,०१०.४४ लाख रुपये निकाली प्रकरणी देण्यात आले. त्यातील ७७,७६१.३५ लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात सरळ भरण्यात आले. या वर्षभरात १४,१०१.५२ लाख रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. मागील वर्षभरात २,१९६ कुटुंबांचे स्थलांतरण करण्यात आले. आज एकूण तीन टप्प्यात ५,४३० कुटुंबाचे स्थलांतरण व्हायचे राहिले आहे. ८५ बाधित गावांपैकी ३८ गांवे पुर्णत: स्थलांतरित झाली आहेत. स्थलांतरणाची ही टक्केवारी ६३.७६ एवढी आहे.

गोसीखुर्द राष्ट्रीय पाटबंधारे प्रकल्पासाठी शासनाने मागील वर्षभरात घेतलेले निर्णय बघणे महत्त्वाचे राहणार आहे. नागपूर जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांना गावठाणातील व्याजाची रक्कम म्हणून १३.६७ कोटी रुपये मंजूर झाले व त्याचे वाटप झाले. ७५२ लाखाच्या रकमेच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली. वादग्रस्त प्रकरणे निकाली काढण्यासाठी गाऱ्हाणे निराकरण समिती स्थापन करण्यात आली आहे. प्रकल्पग्रस्तांना पर्यायी गावठाण्यात वीज जोडणीकरिता सवलत देण्यात आली. २,९७३ वाढीव कुटुंबांना नोकरी ऐवजी २.९० लाख रुपये एकमुस्त देण्यात आले. या सगळ्याचा दृश्य

**नागपूर मेट्रोच्या कामाचा शुभारंभ. २०१८ पर्यंत प्रकल्प पूर्णत्वास जाणार मिहानमधील भूसंपादन आणि सवलतीच्या दरातील वीज पुरवठ्यातील अडचणी दूर**




## विदर्भासाठी घेतलेले महत्त्वाचे निर्णय

- **नागपूर येथे राष्ट्रीय विधी विद्यापीठास मान्यता (नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी)**
- **गोरेवाडा नागपूर-काटोल रस्ता दुतर्फा संरक्षक भिंत, इंडियन सफारी, वॉटर रिझर्व्हायर इत्यादींची कामे करण्यासाठी ६० कोटींची तरतूद, बायो पार्क, आफ्रिकन सफारी, नाईट सफारीसाठी खाजगी गुंतवणूकदारांच्या निवडीची प्रकिया सुरू**
- **ताडोबा पर्यटकांसाठी ४ ओपन बससेवा, चंद्रपूर-ताडोबा बससेवा सुरू, बफर क्षेत्रात पर्यटन सर्किट, सौर उर्जा यंत्रणा, विहिरींना कठडे, गावकऱ्यांना एलपीजी गॅस, स्वच्छतागृह, बांबू निष्कासन, प्राथमिक शाळांमध्ये ई-लर्निंग,सौर पंप.**
- **वर्धा, गडचिरोली पाठोपाठ चंद्रपूर जिल्हा दारूमुक्त.**
- **आदिवासी भागात कुपोषण टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना जाहीर, बालमृत्यू दर कमी होणार.**
- **ट्रिपल आय टी (नागपूर), महाराष्ट्र विधी विद्यापीठ (नागपूर), केंद्रीय विद्युत अनुसंसाधन संस्थांना (नागपूर) जमिनींचे वाटप.**
- **जलस्रोतांच्या संवर्धनार्थ राज्य सरोवर संवर्धन योजना. १६ तलावांच्या संवर्धनाचे काम हाती. बुलडाणा येथील तलावाचा समावेश**
- **कापूस पणन महासंघास रुपये ५० कोटी मार्जिन मनी. बँकेकडून नजरगहाण कर्ज घेण्यासाठी २०० कोटींची शासन हमी.**
- **विदर्भातील प्रकल्पांना कार्यारंभ आदेश देण्याचे अधिकारसुद्धा क्षेत्रीय स्तरावर बदल्यांच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण.**

परिणाम बघता आला तो म्हणजे या धरणातील पाणी आता १०० कि.मी. प्रवास करीत असोलामेंढा येथील तलावात पोहोचले आहे.

### जलयुक्त शिवार योजना

दुष्काळमुक्त महाराष्ट्र अंतर्गत जलयुक्त शिवार अभियान राबवण्यात आले. १०७७ गावात या अभियानांतर्गत कामे नागपूर विभागात घेण्यात आली. १२,०७२ कामे पूर्णत्वाला गेली असून १८२५ कामे प्रगतिपथावर आहेत. ही कामे पूर्ण झाल्यावर नागपूर विभागात १३,८९७ कामे पूर्ण होतील. सरकारी पातळीवरील ही कामे नेतृत्वामुळे होतच राहतात. पण यशस्वी सरकारची यशस्विता ही नेतृत्वाच्या वागण्यावर अवलंबून असते. विद्यमान मुख्यमंत्री मुंबईत मंत्रालयात राहत नाही अशीही टीका मध्यंतरी झाली होती. पण तरीही जवळजवळ दर शनिवार-रविवार मुख्यमंत्री नागपूर विदर्भात असतात. जनतेला भेटत असतात. निवेदने स्वीकारीत असतात. त्यांचे प्रश्न निकाली काढीत असतात. प्रश्नांची नेमकी स्थिती काय आहे, याची माहिती घेत असतात. पण या सगळ्यात नागपुरी वैशिष्ट्य व महाराष्ट्राची संस्कृती जपण्याचे काम मुख्यमंत्र्यांनी केले.

**(लेखक हे ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**
**संपर्क : ०८८८८३९७७२७**

# जलयुक्त शिवारला सोनेरी किनार

**राज्य सरकारच्या जलयुक्त शिवार योजनेस ग्रामीण भागात खूप मोठा प्रतिसाद मिळत आहे. शाश्वत शेतीसाठी शेतात पडणाऱ्या पाण्याचे जतन करून त्याचा योग्य वापर करण्यावर या योजनेत भर दिला आहे. या योजनेच्या यशस्वितेसाठी साठवलेले पाणी वाहून जाऊ नये आणि बंधाऱ्याची, मातीची धूप होऊ नये यासाठी बांबू लागवड खूप उपयुक्त ठरणार आहे.**

**अरुण पाटणकर**

आपले शासन शाश्वत स्वरूपात पिण्यासाठी आणि सिंचनासाठी पाणी उपलब्ध करण्याच्या उद्देशाने गावांच्या शिवारातील पाणी गावातच साठवून आणि जिरवून भूपृष्ठ आणि भूगर्भातील जलपातळी वाढविण्यासाठी जलयुक्त शिवार ही अभिनव योजना मोठ्या प्रमाणात राबवत आहे. या योजनेमध्ये शेततळी खणणे, तलाव, नद्या, नाले, ओढे यांच्यामधून गाळ काढून त्यांचे खोलीकरण आणि रुंदीकरण करणे, त्याद्वारे निघणाऱ्या गाळमातीतून या स्रोतांची बांधबंदिस्ती करणे, इ. उपायांचा समावेश आहे. अशा बांधबंधाऱ्यांवरील माती पुरापावसाने वाहून जाते. जमिनीचे असे धुपण रोखण्यासाठी सिमेंटचे बंधारे बांधणे हे अतिशय खर्चिक तर असतेच; परंतु ते पर्यावरणपोषकही (इको फ्रेंडली) नसते, तसेच जोराच्या पुरात तेही वाहून जातात. तेव्हा जलाशयाच्या पाळी मातीनेच बांधणे इष्ट असते. परंतु हे बंधारे पावसाने वाहून जाऊ नयेत म्हणून त्यावर प्रभावी उपाययोजना म्हणजे त्यावर झाडे लावणे. पण कोठलेही झाड लावण्यापेक्षा बंधाऱ्यांवर बांबूंचे रोपण, मातीचे धुपण रोखण्यासाठी उपयुक्त असते. मातीला घट्ट धरून ठेवून तिचे स्खलन रोखण्यासाठी बांबूच्या तीन उपजाती ज्ञात आहेत. त्यातील एक म्हणजे हेनॉन हा काळा बांबू. दुसरा म्हणजे जमीन आपल्या पानांनी आच्छादन टाकणारा सासा बांबू. ह्या दोन्ही उपजाती आपल्या राज्यात आढळत नाहीत. तसे तर आपल्या राज्यात तिसऱ्या जातीचा गोल्डन बांबू निसर्गत: आढळत



नव्हता, पण त्याच्या चित्तवेधक देखणेपणामुळे ह्या बांबूची लागवड आता येथेही अधिकाधिक प्रमाणात होत आहे. गोल्डन बांबू हे त्यांच्या शिंगाच्या आकाराच्या काटेरी मुळांनी आणि त्यावरील ऋषिमुनींचे केस आणि दाढी मिशासारख्या उपमुळांच्या दाट जाळ्यांच्या योगे बंधाऱ्यांची माती घट्ट धरून ठेवतात. त्यामुळे जलयुक्त शिवार बंधाऱ्यांवर ह्या सोनेरी बांबूची लागवड अत्यंत लाभदायक राहील. कारण एकदा ही बांबूची रोवणे जगली की, ती ६–७ वर्षांपासून ते ४०–५० वर्षांपर्यंत; दरवर्षी सरासरी १०–१५ बांबूंची निर्मिती करतील व त्यायोगे संबधित शेतकऱ्याचे उत्पन्न आणि गावातील बांबूंची उपलब्धी यांमध्ये सतत वाढ होत राहील.

अशा गोल्डन बांबूच्या लागवडीची मला ज्ञात असलेली उत्तम उदाहरणे म्हणजे नागपूर महानगरपालिकेच्या नवीन वास्तूचे उत्तरेकडील सीमेवरील कुंपणावर, राजभवनचे उत्तरेकडील पायथ्याशी कुंपणालगत, नागपुरातील मोठी पार्टी उद्याने आणि हैदराबाद अर्बन डेव्हलपमेंट ॲथॉरिटी (हुडा) ने प्रसिद्ध बंजारा हिल्सच्या बाजूच्या उतारावर प्रचंड प्रमाणात उभारलेली सोनेरी बांबूंची उद्याने. अर्थात हे प्रातिनिधिक दृष्टान्तच आहेत. राज्यात इतरत्रही असे उपक्रम साकारलेले असतीलच.

## सखोल संशोधन

बांबू या प्रजातीविषयी प्रथमत: थोडे सामान्यज्ञान जाणून घेणे उचित



राहील. साधारणत: दीडशे वर्षांपूर्वी डी. बँड्रिस, आर. एस. ट्रप आणि जे. एस. गॅम्बल या पाश्चात्य वनशास्त्रज्ञांनी भारतासह अखिल ब्रिटिश साम्राज्यातील सर्व वृक्ष प्रजातींवर सखोल संशोधन करून ते ग्रंथबध्द केले. गॅंबल यांनी बांबूवर एक मोठे पुस्तक लिहिले आहे. त्यात भारतातील बासाच्या ७४ उपजातींचे वर्णन आहे. त्यानुसार बांबू हा गवताचाच एक प्रकार असून त्याची लघुतम उंची ४–६ इंच एवढीच तर महत्तम उंची १३० फुटापर्यंत असते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे झाडाचे एकच रोप अंकुरापासून ते झाड, त्याची उंची ४०–५० वर्षात पार करीपर्यंत वाढून कापणीयोग्य होते. तसे बांबूचे नसते. बांबूचा अंकुर मात्र एकदा जमिनीत लावल्यापासून त्याच्या मुळातून दरवर्षी अधिकाधिक उंचीचे नवीन नवीन फुटवे उगवून बांबू निर्माण होतात. बांबूचा फुटवा जमिनीतून वर आल्यापासून तो त्याची निसर्गनियत संपूर्ण उंची केवळ ३ महिन्यात प्राप्त करतो. उदाहरणार्थ १५ वर्षांचे वर वय असलेल्या गोल्डन बांबूच्या प्रजातीतील नवीन फुटणारा एक अंकुर आपली ३० फूट / ३६० इंच इतकी नियत उंची अवघ्या ९० दिवसांत गाठतो, म्हणजे त्यांची उंची दररोज ४ इंचांनी वाढते.

महाराष्ट्रातील जंगलांत नदी–नाल्यांच्या काठावर वाढणारा, विदर्भात कटांग तर पश्चिम महाराष्ट्रात कळक नावाने ओळखला जाणारा हा काटेरी बांबू १०० दिवसात १०० फुटांहूनही अधिक उंच होऊ शकतो. म्हणजेच प्रतिदिन १ फूट एवढा वाढतो. या बांबूचे काठिण्य, मजबुती आणि मोडण्याचा बिंदू हा माईल्ड स्टील एवढा असतो. कितीही मोठे झाड एकदा कापले की साराच खेळ संपतो. परंतु सर्वात अधिक वेगाने वाढ होत असलेली ही वनजाती ४०–५० वर्षांपर्यंत दरवर्षी १० ते २० नवीन बांबूचेदेखील जनन करत असल्याने सतत पुनर्निर्माण (रीजनरेशन) होणारी वनसंपत्ती आहे. १०० दिवसात आपली पूर्ण नियत उंची क्रमित करणारा बांबू ३ ते ४ वर्षात आपले पूर्ण काठिण्यसुद्धा प्राप्त करून उपयोगाएवढा मजबूत होतो. म्हणून सतत पुनर्जनन होणारी ही वनप्रजाती, पर्यावरण संवर्धनासाठी पोषक आहे. अर्थात जमिनीचा पोत, पर्जन्यमान यावर अवलंबून ६ ते १२ वर्षात हे बांबू पूर्णत: पक्व होऊन कापणी आणि विक्रीयोग्य होतात. नागपुरातील एका घरमालकाने आपल्या घरासमोर लावलेल्या गोल्डन बांबूचे बेटातील ५–६ वर्षांचे १५ बांबू रु. १५० प्रतिबांबू या भावाने विकल्याचे उदाहरण आहे.

बांबूचे प्रजनन एकतर त्याच्या बीजांपासून होते. परंतु बांबूला फुलोरा फुटून बीज येण्यासाठी त्याच्या उपजातीनुसार ४० ते १०० वर्षे लागतात, ज्यानंतर संपूर्ण बांबूचे बेट अथवा रांजी मरून जाते.

## विलोभनीय दृश्य

पूर्णपणे फुलांनी बहरून जाणाऱ्या बांबूच्या रांजीचे दृश्य अतिशय विलोभनीय असते परंतु ती त्या संपूर्ण बेटाच्या मृत्यूची नांदी ठरते. परंतु मरताना हे बेट आपल्यामागे पुनर्जननासाठी सहस्त्रावधी बीजे निर्माण करून जाते. कित्येकदा तर जंगलातील सलग पट्ट्यातील लहान मोठे सर्व बांबू संगचारी (ग्रेगॅरिअस) रीतीने एकाच वेळी पुष्पबीजित होऊन जणू काही सामूहिक आत्मबलिदान करतात. पण त्याच्या मागे वंशवृद्धीसाठी कोट्यवधी बीजे सोडूनच! अशा प्रकारे शंभर वर्षातून फार तर दोनदा होणाऱ्या या चमत्कारांमुळे बांबूचे बी क्वचितच उपलब्ध होते. दुसरी पद्धत म्हणजे पावसाळ्यात रांजीला जमिनीतून फुटून वर येणारे कोंब मुळासकट उपटून नवीन जागी लावणे. पण असे कोंब पूर्णत: उपटले न गेल्यास किंवा दुखावले गेल्यास त्याचे रोपण अयशस्वी होते. तिसरी रीती म्हणजे बासाच्या छोट्या फांदीतील पेराचे गाठीचे वर कापून ती भुसभुशीत माती भरलेल्या खड्ड्यात



लावून तेथे सतत पाणी देणे, पण बांबूच्या अतिशय थोड्या उपजातींची अशी कलमे जगतात. सुदैवाने गोल्डन बांबूची अशा प्रकारे लावलेली कलमे मोठ्या प्रमाणात जगतात आणि त्यामुळे ह्या बांबूचे रोपण अधिकाधिक विस्तारात करणे सुलभ होते. कलमांद्वारा त्याची रोपे मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणे सहज शक्य असल्यामुळे हा गोल्डन बांबू सामाजिक नागरी आणि वैयक्तिक वनीकरणासाठी देखील अत्यंत सुयोग्य आहे.

## अनेकविध उपयोग

बांबूचे अनेकविध उपयोग आहेत. प्रामुख्याने उंच इमारतींचे बांधकाम व दुरुस्तीसाठी त्याभोवती अनादी काळापासून उभारण्यात येणारे बांबूच्या स्तंभांच्या किंवा शिड्याच्या जाळ्याला (स्कॅफ्रफोल्डिंग) आजही पर्याय नाही. गणपती दुर्गापूजा उत्सवांसाठी उभारण्यात येणाऱ्या सुशोभित देखाव्यांच्या मंडपाच्या उभारणीसाठी सुद्धा बांबूच्या उंच स्तंभांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होतो. विशेषत: पूरपरिस्थितीत नावेसारख्या वहनउपयोगाचे तराफेदेखील बांबू घट्ट बांधून तयार करतात. वाऱ्यानुकूल चालणाऱ्या जहाजाच्या शिडाचे उंच खांबदेखील जाड गोल्डन बांबूचे असतात. शेकडो वर्षांपूर्वी उभारलेल्या जमीनदारांच्या वाड्यांच्या भिंती बांबू आणि चिखल (बाँबू अँड मड) यांनी बांधलेल्या असत. बांबूपासून चटया, उन्हापासून संरक्षण देणाऱ्या खिडकीचे चिकाचे पडदे, विभाजक (पार्टिशन) तसेच बुरुड कामाच्याअनेक प्रकारच्या टोपल्या बनविल्या जात. बांबुकाम करणाऱ्या बुरुड लोकांचे संपूर्ण जीवन आजही यावरच अवलंबून आहे. वृद्धांना चालण्यासाठी आधार देणाऱ्या काठ्या तसेच सुरेल बासऱ्या या बांबूच्याच असतात.

जपान, चीन, व्हिएतनाम, कंबोडिया कोरिया, ब्रम्हदेश, इंडोनेशिया, तैवान या अतिपूर्वेकडील देशांमध्ये तर बांबू हा जनजीवनाचा अनिवार्य भाग आहे. या देशातील भूकंपप्रवण भागात बांबूच्या पायांवर उभारलेली बांबूची घरे, त्यावरची छपरे, दारे आणि टेबल खुर्च्या, फर्निचर इत्यादी हे सर्व अद्यापही बांबूंचे असते. कारण त्यामुळे या भागात होणाऱ्या भूकंपांमुळे नुकसानीचे प्रमाण अत्यल्प असते. आपल्या देशात आसाम, मिझोराम, नागालँड, मेघालय, त्रिपुरा इत्यादी राज्यात ग्रामीण भागात अशाच बांबूमय झोपड्या बांधण्यात येतात. चीनमधील ज्या प्राण्याचे अस्तित्व आता संकटात आहे ते पांडा हे प्राणी केवळ बांबूची पाने आणि कोंब यावर जगतात. पूर्व भारतापासून इंडोनशियापर्यंत होणाऱ्या बांबूच्या या उपयोगामध्ये गोल्डन बांबूचे मोठे योगदान आहे. बांबूचा चोथा (पल्प) उत्तम प्रकारच्या कागदाचा प्रमुख स्रोत आहे. बांबूचे कोवळे कोंब हे भाज्या, सूप, चटण्या इ.साठी उपयोगात येतात. अशाच कोवळ्या कोंबापासून मणिपूरसारख्या राज्यात उत्तेजक पेये बनवितात. गोल्डन बांबूच्या पेरांच्या मध्ये आढळणारा टणक डोळा म्हणजेच (वंश = बांबू : लोचन = डोळा) = वंश लोचन हे पाचक आणि कफहारक आयुर्वेदिक औषध मानले जाते. सीतोपल-ादी चूर्ण या प्रसिद्ध औषधाचा वंश लोचन हा महत्त्वाचा घटक आहे. घराच्या आवारासभोवताल दाटीवाटीने बांबूची रोपे / कलमे लावून त्यांचे २ वर्षे संरक्षण करून आठवड्यातून २/३ दा पाणी दिल्यास असे बांबूचे कुंपण ८-१० फूट वाढून ते जनावरांच्या पोहोचेबाहेर जाते. अशा प्रकारचे कुंपण वाहत्या रस्त्यांवर वाहनांची उडणारी धूळ व इंधनाचा उत्सर्ग आणि त्यांचा मोठा आवाज याद्वारे होणारे तिहेरी प्रदूषण कमी करते. ७-८ वर्षांनी १५-२० फूट वाढलेले पक्के बांबू कापून त्यांची विक्री करता येते. त्याच्या बाजूला नवे बास फुटत राहतात. उंच सरळ वाढणारा कठीण बांबू हा इमारती व फर्निचरच्या कामाला तर येतोच परंतु वाढताना वक्र होणारा बास (ज्याला गोंडी भाषेत वक्ती असे संस्कृतोद्भव नाव आहे) तर अनेक काष्ठ कलाकृतींचे मूळ आहे. जंगलात आढळणाऱ्या या वक्तीचे अनुकरण करून फुटून सरळ वाढत असलेल्या कोवळ्या बांबूच्या मार्गात अडथळा निर्माण केल्यास बांबू तेथे अडून वळतो. असा वळून वाढत असलेला बांबू त्या वाटेत परत अडवला तर तो तेथेदेखील पुनश्च: वळतो.

**बांबूचे नामकरण मोठे मजेदार आहे. बँबूसा निग्रा म्हणजे काळा बांबू हे नाव लॅटिन भाषेतील निग्रा म्हणजे काळा या अर्थावरून पडले आहे. तर ज्याची सर्व पेरे वरती अरुंद तर खाली फुगीर आकाराची असतात, त्याला भगवान बुद्धांच्या उदराशी असलेल्या साम्यावरुन बुद्ध बेली बॅम्बू असे संबोधतात.**

गोल्डन बांबूची एक उपजात म्हणजे हिरव्यागर्द बांबूवर फिक्के पांढुरके पट्टे असणारा बॅम्बूसा व्हल्गॅरिस ग्रीन, ही कृत्रिम वक्रीकरणास अधिक अनुकूल असते. ही प्रक्रिया बांबूची वाढ होताना पुन:पुन: करता येते. असा वक्रांगी बांबू ३-४ वर्षात पक्व झाल्यानंतर तो कापून त्याद्वारे विविध आकाराचे टेबल लँप, दिवाणखान्याचे उंच लँप असे फर्निचर बनवता येते. बांबूच्या उलट्या शिंगासारख्या आकाराच्या मुळांची (रायझोम) जोडणी करून त्यावर वेगवेगळ्या रंगांचे छोटे बल्ब बनवून आगळीवेगळी अशी आकर्षक झुंबरे (शँडलर) अशा अनेक शिल्पाकृती कल्पून निर्माण करता येतात. गोल्डन बांबू म्हणजे बॅम्बूसा व्हल्गॅरिस या नामाची उत्पत्ती व्हलगर या विशेषणापासून झाली आहे.

आज ह्या व्हलगर शब्दाचा अर्थ अश्लील असा असला तरी पूर्वी त्यातून दिमाखदार दिखाऊ चित्तवेधक असा आशय ध्वनित होत असे, जे ह्या चित्रविचित्र बांबू साठी अगदी सार्थ आहे. तर मग लावा हा सुंदर, पर्यावरण पूरक आणि वाढते उत्पन्न देणारा गोल्डन बांबू.

**(लेखक हे निवृत्त सनदी अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९३२४४०११५०**




# समर्थ शहरांची सक्षम यंत्रणा

**जगभरातील मोठ्या शहरांना सध्या दहशतवादी संघटनांचा धोका संभवतो. मुंबई शहराने तर अशा हल्ल्याचे दुःख भोगले आहे. त्यामुळे जगभरातील मोठ्या शहरांना संभाव्य हल्ल्यांपासून बचाव करण्यासाठी तयार असावे, यासाठी जागतिक स्तरावर नुकतीच एक बैठक झाली. संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने आयोजित सशक्त शहरांच्या (स्ट्राँग सिटी नेटवर्क) या बैठकीच्या अध्यक्षस्थानी अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा होते. मुंबई महानगराचे प्रतिनिधित्व गृहराज्य मंत्री डॉ. रणजित पाटील यांनी केले. या बैठकीचा हा वृत्तांत...**

न्यूयार्क येथे झालेल्या स्ट्राँग सिटी नेटवर्क या बैठकीत मुंबई शहराचे प्रतिनिधित्व करताना गृहराज्य मंत्री डॉ. रणजित पाटील यांनी मुंबई पोलीस दल आणि त्यांच्या दिमतीला मुंबईवरील २६ नोव्हेंबरच्या हल्ल्यानंतर गठित करण्यात आलेल्या फोर्स वन दलाच्या तत्पर प्रतिसादाची माहिती दिली. देशाची आर्थिक राजधानी असणारे मुंबई शहर जगातील पहिल्या २५ सशक्त शहरांच्या यादीमध्ये प्रमुख महानगर आहे. त्यामुळे या शहराच्या सुरक्षेविषयी जागतिक पातळीवर विश्वास निर्माण करण्याची ही संधी होती. या संधीचा फायदा घेत डॉ. रणजित पाटील यांनी गेल्या काही दिवसात मुंबई आणि महाराष्ट्रात पोलीस दलामध्ये मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात उपलब्ध केलेल्या अद्ययावत सोयीसुविधा यांची माहिती दिली. दहशतवाद आणि हिंसक अतिरेकी कारवाया थोपवण्यासाठी मुंबई पोलीस आणि दहशतवाद विरोधी पथक तसेच जनतेकडून नियमित प्रतिसाद मिळण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या मोहल्ला कमिट्या यांच्यामार्फत सुरू असलेल्या कार्याची त्यांनी माहिती दिली. अशा कारवायांचा बीमोड करण्यासाठी मुंबई पोलीस विभागाचे 'फोर्स वन' पथक सतत कार्यरत असून कोणत्याही प्रकारच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देणे आणि सामान्य नागरिकांच्या जीविताचे रक्षण करणे यासाठी त्यांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण देण्यात आले असल्याचे आणि नव्या प्रगत तंत्रज्ञानाने हे दल परिपूर्ण असल्याची ग्वाही त्यांनी या वेळी दिली. अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांनीही यावेळी या सभेला संबोधित केले. ते म्हणाले, हा दहशतवाद एका रात्रीत मिटवता येण्यासारखा नाही. त्यासाठी आपणा सर्वांना अहोरात्र मेहनत करणे आवश्यक आहे. या वेळी त्यांनी इसिस (आयएसआयएस) सारख्या संघटना कितीही दहशतवाद माजवित असल्या तरी काळाच्या ओघात त्या संपुष्टात येतील. कारण त्यांच्याकडे मृत्यू आणि दुःख याशिवाय देण्यासारखे काहीच नाही. त्यामुळे आपला विजय निश्चित असल्याची खात्री त्यांनी व्यक्त केली. यावेळी अध्यक्ष बराक ओबामा यांनी जगातील सशक्त शहराच्या संघटनांची सुकाणू समिती घोषित केली. या समितीच्या सदस्यपदी गृहराज्यमंत्री डॉ. रणजित पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. आंतरराष्ट्रीय सुकाणू समिती सदस्य या नात्याने, सामुदायिकपणे स्थानिक पातळीवर दहशतवाद आणि हिंसक अतिरेकी कारवायांना रोखण्यासाठी मुंबई समर्थपणे कार्यरत राहील; असे आश्वासन त्यांनी या नियुक्तीनंतर दिले.







**– प्रवीण टाके**

**संपर्क: ०९७०२८५८७७७**

## आंतरराष्ट्रीय सहकार्य

**राज्याच्या गृह विभागाने सध्या कात टाकली असून पोलीस दलाच्या सक्षमीकरणाचे विविध उपाय सुरू आहेत. आरोपींच्या शिक्षेचे प्रमाण वाढावे यासाठी एकीकडे गृहखाते परिश्रम घेत असताना आंतरराष्ट्रीय मापदंडातून पोलीस दल सक्षम करण्याकडेही कल आहे. नुकतीच मुंबई पोलीस मुख्यालयात महाराष्ट्र पोलीस आणि सिंगापूरच्या इंटरनॅशनल सेंटर फॉर पॉलिटिकल व्हॉयोलन्स अँड टेरेरिझम रिसर्च (आयसीपीव्हीटीआर) यांच्या संयुक्त विद्यमाने 'डी-रॅडिकलायझेशन अँड कम्युनिटी एंगेजमेंट' या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळा झाली. जगातील २५ सशक्त शहरांच्या यादीमध्ये मुंबई सहभागी झाल्यानंतर अशाप्रकारच्या आंतरराष्ट्रीय समन्वयात वाढ होणार असल्याचे डॉ. रणजित पाटील यांनी स्पष्ट केले आहे.**



अटल सौर कृषिपंप योजना

# शाश्वत शेती आणि सौर पंप

**शाश्वत शेतीसाठी राज्य शासनाकडून महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय घेतले जात आहेत. शेती, गावे जलसमृद्ध करण्यासाठी जलयुक्त शिवार योजना यशस्वीपणे राबवली जात आहे. त्यासोबतच भारनियमन अथवा कृषिपंपाअभावी सिंचनासाठी अडचण निर्माण होऊ नये याचीही काळजी शासनाने घेतली आहे. यासाठी 'अटल सौर कृषिपंप योजना' राबवण्यात येत असून या योजनेंतर्गत राज्यातील पाच लाख शेतकऱ्यांना सौर कृषिपंप देण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात दहा हजार सौर कृषिपंपांचे वाटप करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.**


'अटल सौर कृषिपंप योजने'मधून १० हजार सौर कृषिपंपांचे वाटपाची अंमलबजावणी अंतिम टप्प्यात आहे. उर्वरित शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत सौर कृषिपंपाचे वाटप लवकरात लवकर करावे, ही योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी तसेच सौर पंपांची उपयुक्तता शेतकऱ्यांना पटवून देण्यासाठी जिल्हास्तरावर प्रचार व प्रसार मोहीम राबवावी. तसेच राज्यातील एक लाखाहून अधिक शेतकऱ्यांच्या कृषिपंपांना वीजजोडणी अद्याप मिळालेली नाही. या कृषिपंपांना वीजजोडणी देण्यासाठी विशेष मोहीम राबवून ३१ मार्चपर्यंत सर्वांना जोडणी द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयात नुकत्याच झालेल्या ऊर्जा विभागाच्या आढावा बैठकीत दिले.

निलेश तायडे

विदर्भातील ३४२० फीडरपैकी १०४३ फीडरचे सेपरेशन (वाहिनी विलगीकरण) झाले आहे. तर मराठवाड्यातील जवळपास सर्वच फीडरचे सेपरेशनचे काम पूर्ण होत आले आहे. राज्यातील उर्वरित ग्रामीण भागातील वीज वितरणासाठी फीडर सेपरेशन (वाहिनी विलगीकरण) तातडीने पूर्ण करण्यात यावे, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी बैठकीत दिले. तर अटल सौर कृषी योजनेतील दहा हजार सौर कृषिपंपांच्या वाटपाची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात येत असल्याचे ऊर्जा मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. तसेच ग्रामीण भागातील फीडर सेपरेशनचेही काम तातडीने पूर्ण करावे. तसेच ज्या भागात कृषिपंपांचे फीडर सेपरेशन करण्यात येणार आहे, त्या कामात पारदर्शकता राहावी, यासाठी त्या भागातील शेतकऱ्यांना याची माहिती देण्यात यावी, असे निर्देश श्री. बावनकुळे यांनी दिले आहेत.

### भारनियमनाची चिंता नाही...

केवळ रात्रीलाच वीज असल्यामुळे शेतामध्ये रात्री सिंचन करावे लागते. दिवसा वीज नसते. केवळ आठच तास वीज... पाणी असूनही सिंचन करता येत नाही. महावितरणची वीज अपुरी पडत असल्यामुळे नेहमीच आम्हाला भारनियमनाला सामोरे जावे लागते, अशी तक्रारवजा ओरड आतापर्यंत



शेतकऱ्यांकडून होत आली आहे. मात्र आता शेतकऱ्यांनी भारनियमनाची चिंता करण्याची गरज नाही, कारण राज्य शासन राबवत असलेल्या 'अटल सौर कृषिपंप' योजनेंतर्गत पाच लाख शेतकऱ्यांच्या हाती सौर कृषिपंप पडणार आहेत. या पंपाचा डेमो बघण्यासाठी संबंधित कंपन्यांनी काही ठिकाणी डेमो पंपही लावले आहेत.

केंद्र शासनाचे ३० टक्के अनुदान, राज्य शासनाचे ५ टक्के अनुदान व ५ टक्के लाभार्थी हिस्सा आणि ६० टक्के महावितरण कर्ज स्वरूपामध्ये भरणार आहे. अशाप्रकारे सौर ऊर्जेवर आधारित कृषिपंपांचे वितरण होणार आहे. लाभार्थ्याला केवळ एकूण रक्कमेच्या पाच टक्के हिस्सा द्यावा लागणार आहे. कर्जाची परतफेड महावितरण कंपनी टप्प्याटप्प्याने करणार आहे. यामध्ये लाभार्थ्यांना ३ एच.पी, ५ एच.पी आणि ७.५ एच.पी क्षमता असलेले सौर उर्जेवर आधारित पंप देण्यात येणार आहेत. लाभार्थ्याला ३ एच.पी एसी पंपासाठी १६ हजार २०० रुपये, ३ एच.पी डीसी पंपासाठी २० हजार २५०, ५ एच.पी एसी पंपासाठी २७ हजार, ५ एच.पी डीसी पंपासाठी ३३ हजार ७५० आणि ७.५ एच.पी एसी पंपासाठी ३६ हजार रुपये भरावे लागणार आहेत. या कार्यक्रमातंर्गत बुलडाणा जिल्ह्याला १६६० लाभार्थ्यांचे पहिल्या टप्प्यामध्ये उद्दिष्ट मिळाले आहे.

## योजना दृष्टिक्षेपात

- **पाच लाख शेतकऱ्यांना सौर कृषिपंप वाटपाचे उद्दिष्ट**
- **पहिल्या टप्प्यात १० हजार सौर कृषिपंपांचे होणार वाटप**
- **पाच एकरपेक्षा कमी जमीन आणि सिंचनासाठी वीजपंप नसलेले शेतकरी पात्र**
- **केंद्र शासनाचे ३०, राज्य शासनाचे ५ टक्के अनुदान व लाभार्थ्याचा ५ टक्के हिस्सा आणि ६० टक्के रक्कम महावितरण कर्जस्वरूपात भरणार**
- **लाभार्थ्यांना ३ एच.पी, ५ एच.पी आणि ७.५ एच.पी क्षमता असलेले सौर ऊर्जेवरील पंप मिळणार**
- **३ एच.पी एसी पंपासाठी १६ हजार २०० रूपये, ३ एच.पी डीसी पंपासाठी २० हजार २५०, ५ एच.पी एसी पंपासाठी २७ हजार, ५ एच.पी डीसी पंपासाठी ३३ हजार ७५० आणि ७.५ एच.पी एसी पंपासाठी ३६ हजार रूपये एवढी रक्कम भरावी लागणार आहे.**

### लाभार्थी पात्रता

लाभार्थ्याकडे ५ एकरपेक्षा कमी जमिनीचे क्षेत्र असावे. राज्य शासनाच्या धडक सिंचन योजनेंतर्गत विहिरींचा लाभ घेतलेला असावा किंवा सिंचनासाठी पुरेसे पाणी असलेली विहीर असावी, तसेच महावितरण कंपनीकडे पैसे भरून प्रलंबित असलेल्या ग्राहकांपैकी ज्यांना तांत्रिक अडचणींमुळे नजीकच्या काळात वीजपुरवठा शक्य नाही असा शेतकरी या योजनेच्या लाभासाठी पात्र आहे. शासनाने ठरवून दिलेल्या निकषांनुसार लाभार्थ्यांची निवड जिल्हास्तरीय समिती करणार आहे. लाभार्थ्यांची यादी आणि प्राधान्यक्रमानुसार योजनेची अंमलबजावणी महावितरणमार्फत करण्यात येणार आहे. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या मूलाधार संस्थेकडून तांत्रिक साहाय्य करण्यात येईल.

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. तसेच धडक सिंचन योजनेंतर्गत विहिरीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल. ज्यांच्या शेतामध्ये विहिरीवर सध्या चालू वीज पंप आहे, असे शेतकरी या योजनेस पात्र नाहीत. या योजनेचा लाभ घेऊन ज्या गटांमध्ये/विहिरीवर सौरपंप दिला आहे, तेथे वीज पंपाची नवीन जोडणी महावितरणतर्फे दिली जाणार आहे. वैयक्तिक किंवा सामुदायिक शेततळी/विहिरी यासाठी ३ एच.पी क्षमतेपर्यंतचे सौरपंप गरजेप्रमाणे आस्थापित करता येणार आहेत. या योजनेंतर्गत लावलेल्या सौर ऊर्जा आधारित पंपाची देखभाल व दुरुस्ती पाच वर्षासाठी संबंधित कंपनी करणार आहे. विहीर / कूपनलिका व पाण्याची पातळी तसेच पीक प्रकार यानुसार तांत्रिक सर्वेक्षण करून वास्तविक सौर कृषिपंप क्षमता ठरवण्यासाठी अधीक्षक अभियंता महावितरण, जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी तसेच महाऊर्जा यांनी निर्देशित केलेले अधिकारी यांची उपसमिती जिल्ह्यात स्थापन करण्यात येईल. या उपसमितीकडून तांत्रिक सर्वेक्षणाचे व सौर कृषिपंप क्षमता ठरवण्याचे काम करून घेतले जाईल. योजनेचा लाभार्थी अर्ज तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तलाठी कार्यालय, महावितरण कार्यालयात आहेत. छापील अर्जावर तलाठी, कृषी साहाय्यक, महावितरणचे कर्मचारी व भूवैज्ञानिक कार्यालयाची स्वाक्षरी आवश्यक आहे.

**(लेखक हे बुलडाणा येथे माहिती साहाय्यक म्हणून कार्यरत आहेत.)**
**संपर्क : ०८८८८८९९१९३**



# वर्ष आशेचे...विकासाचे...गुंतवणुकीचे...

**२०१५ हे वर्ष महाराष्ट्रासाठी अनेक बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण ठरले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकासात्मक निर्णय झाले तर दुसऱ्या बाजूला निसर्गाच्या वक्रदृष्टीमुळे राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली, त्यावर मात करण्यासाठी सरकारने तत्कालिक उपाययोजनांबरोबरच या भागातील दुष्काळ निवारण्यासाठी दीर्घकालीन उपाय म्हणून जलयुक्त शिवार योजना आखली. स्वच्छ महाराष्ट्र अभियानाबरोबरच, मेक इन महाराष्ट्र अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हे वर्ष नव्या आशेचे, विकासाचे आणि गुंतवणुकीचे ठरले असेच म्हणावे लागेल. या वर्षाचे हे सिंहावलोकन...**

## जानेवारी २०१५



- तब्बल ५४ वर्षांनंतर मुंबईत भारतीय विज्ञान परिषदेचे मुंबई विद्यापीठाकडून यशस्वी आयोजन. १०२ व्या विज्ञान परिषदेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे. अब्दूल कलाम यांच्यासह देशविदेशातील शास्त्रज्ञांची उपस्थिती.

- स्वित्झर्लंडमधील दाव्होस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचा समावेश. 'मेक इन महाराष्ट्र' संकल्पनेची पायाभरणी.





- शाश्वत सिंचन आणि दुष्काळमुक्तीसाठी दीर्घकालीन उपाययोजनांसाठी राज्य सरकारकडून जलयुक्त शिवार योजनेस प्रारंभ.

- वाढत्या सायबर गुन्ह्याला प्रतिबंध करण्यासाठी राज्यात स्वतंत्र यंत्रणा उभी करण्याचा निर्णय.

- राज्य सरकारने 'आपले सरकार' वेबपोर्टल सुरू केले.



- प्रजासत्ताक दिनी राजपथावरील पथसंचलन महाराष्ट्राचा 'पंढरीची वारी' हा चित्ररथ सर्वोत्तम ठरला.

## फेब्रुवारी २०१५




- राज्यातील आर्थिक विकासाच्या विविध क्षेत्रांचा साकल्याने विचार व्हावा, यासाठी मुंबई नेक्स्ट चर्चासत्राचे आयोजन.

- राज्य शासनाला १०० दिवस पूर्ण.

- डॉ. प्रभा अत्रे यांना राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे दिला जाणारा भारतरत्न भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार प्रदान.





- लोकमान्य टिळक जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मणराव जोशी, दिनकर रायकर, विजय कुवळेकर यांना प्रदान.

- महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांचे निधन.



## मार्च २०१५



- राज्यात १३वी विधानसभा अस्तित्वात आल्यानंतरचा पहिला अर्थसंकल्प अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मांडला. प्रादेशिक असमतोल दूर करणारा अर्थसंकल्प असे त्याचे वैशिष्ट्य ठरले.

- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी इंदू मिलचे हस्तांतरण.



# सिंहावलोकन २०१५

- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्यावर ज्या गिरगाव चौपाटीवर 'अत्यंसंस्कार' झाले त्या गिरगाव चौपाटीचे स्वराज्यभूमी असे नामांतर.





- मुंबईच्या चर्नी रोडवरील जुन्या तारापोरवाला मत्स्यालयाचे नूतनीकरणानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण.

- राज्य शासनातर्फे माझी कन्या भाग्यश्री योजनेस प्रारंभ.

## एप्रिल २०१५

- ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.रघुनाथ माशेलकर यांच्यासह महाराष्ट्रातील अकरा मान्यवरांना राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्याहस्ते पद्मपुरस्कार प्रदान.

- ८८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे पंजाब राज्यातील घुमान येथे यशस्वी आयोजन. डॉ. सदानंद मोरे संमेलनाध्यक्ष.

- डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रतिष्ठेचा ज्ञानपीठ पुरस्कार स्वीकारला.



- शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर.



- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योगमंत्री सुभाष देसाई यांचा जर्मन दौरा. जर्मनीच्या हॅनोव्हर येथे झालेल्या व्यापार मेळाव्यात गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास उद्युक्त करण्यात यश.

- नेपाळ भूकंपावेळी महाराष्ट्र मदतीला धावला. राज्यातील १००० पर्यटकांना परतण्यासाठी सर्वतोपरी मदत.

- महाराष्ट्र लोकसेवा हमी अध्यादेश लागू.

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील 'लोकराज्य' आणि 'महाराष्ट्र अहेड' या विशेषांकाचे गेट वे ऑफ इंडिया येथे सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांच्या हस्ते प्रकाशन.



## मे २०१५



- महाराष्ट्र राज्य स्थापनेला ५५ वर्षे पूर्ण.

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबर चीन दौऱ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सहभाग, फॉक्सकॉन कंपनीची महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याची तयारी.

- पहिल्या ऑनलाइन लोकशाही दिनास सुरुवात. मुख्यमंत्र्यांनी राज्यभरातील प्रश्न व्हिडिओ कॉन्फरंसिंगद्वारे समजून घेतले.



स्वच्छ महाराष्ट्र अभियान
सप्तपदी स्वच्छतेची

- स्वच्छ भारत मिशनच्या धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियानास सुरुवात. लोकप्रतिनिधींसह अधिकारी कर्मचाऱ्यांना मुख्यमंत्र्यांनी दिली स्वच्छतेची शपथ.

- अमरावती येथील नांदगाव पेठ येथे टेक्सटाइल पार्कचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन.

- मुंबई येथे जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री जनधन योजना आणि अटल पेन्शन योजनेचा केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांच्या हस्ते शुभारंभ.





- नागपूर येथे पहिल्या समाधान शिबीराचे आयोजन. नागपूर आणि पुणे येथे आयआयआयटी स्थापन करण्याचा निर्णय.

## जून २०१५

- राज्याचे फुलपाखरू म्हणून ब्ल्यू मॉरमॉन या फुलपाखरास मान्यता. राज्य फुलपाखरू जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.





■ राज्यभरात आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात साजरा. राज्यपाल, मुख्यमंत्र्यांसह विविध नेत्यांचा उत्स्फूर्त सहभाग.



■ मुंबईतील किनारपट्टी रस्ता अर्थात कोस्टल रोडला केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाची मंजुरी



■ मराठी विश्वकोशाचा २०वा खंड प्रकाशित

## जुलै २०१५



■ नाशिक त्र्यंबकेश्वर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत सिंहस्थ कुंभमेळ्याचे ध्वजारोहण.



■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योगमंत्री सुभाष देसाई यांचा अमेरिका दौरा. अमेरिकेत महाराष्ट्र परिचय केंद्र स्थापन करण्याचा निर्णय.

■ नागपूर आयआयएमच्या पहिल्या सत्रास सुरुवात.

■ केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी योजनेंतर्गत महाराष्ट्रातील मुंबई, नागपूर, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, सोलापूर आणि पुणे शहराचा समावेश.

Smart City
MISSION TRANSFORM NATION
स्मार्ट सिटी मिशन
पुढील पाच वर्षात
१०० स्मार्ट सिटी साकारणार



■ माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे निधन.

■ मुंबई-नागपूर दरम्यान द्रुतगती मार्ग बांधण्याचा निर्णय, यामुळे मुंबई-नागपूर प्रवास १० तासांवर आणणे शक्य होणार.



## ऑगस्ट २०१५



■ महाराष्ट्राचे व्याघ्रवैभव दर्शन घडविणाऱ्या प्रदर्शनाचे मंत्रालयात आयोजन. ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांचा व्याघ्रदूत होण्यास होकार.



■ वनसंवर्धनासाठी योगदान देण्यास माजी क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर यांचा होकार.

■ नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्यात पहिले शाही स्नान उत्साहात.

■ महाराष्ट्राची गौरवशाली शिवकालीन परंपरा जनसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याचे काम करणाऱ्या शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान





■ मुंबईतील मेट्रो प्रकल्प विस्ताराचा राज्य शासनाचा निर्णय.

■ निवृत्त न्यायधीश मदनलाल लक्ष्मणदास टहालियानी यांनी राज्याचे नवे लोकायुक्त म्हणून शपथ घेतली.





■ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे काही काळ वास्तव्य असलेल्या लंडनमधील वास्तूच्या खरेदीबाबत प्राथमिक करार.

# सिंहावलोकन २०१५



■ राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्यांतर्गत राज्यातील १४ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना अन्नसुरक्षा देण्याचा निर्णय.

■ राज्यात एलबीटी अंशत: रद्द.

## सप्टेंबर २०१५


■ नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे दुसरे आणि तिसरे शाही स्नान उत्साहात.

सिंहस्थ कुंभमेळा २०१५ - २०१६




■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जपान दौरा. ट्रान्स हार्बर लिंकसाठी 'जायका' अर्थसाहाय्य करणार.

■ कोयना-मुंबई जोड प्रकल्पास तत्त्वत: मंजुरी



■ प्रतिष्ठेच्या लता मंगेशकर पुरस्काराने ज्येष्ठ संगीतकार प्रभाकर जोग यांचा सन्मान

अमृत
Atal Mission for Rejuvenation and Urban Transformation
अटल मिशन
पुढील पाच वर्षांत ५०० शहरांतील पायाभूत सुविधांचा दर्जा उंचवणार

■ राज्यातील शहरांच्या विकासासाठी 'अमृत' योजनेस मंजुरी.

■ स्मार्ट व्हिलेज पायलट प्रकल्पासाठी विदर्भातील मेळघाटची निवड



■ राज्यातील आदिवासी मुलांसाठी अन्नपूर्णा योजना सुरू.

■ राज्याचा क्रीडा नकाशा जाहीर.

## ऑक्टोबर २०१५



■ राज्यातील १९ नगरपालिका उघड्यावर शौचमुक्त म्हणून घोषित. त्यांचा नगरविकास विभागातर्फे सत्कार. चैताली राठोड, सुवर्णा लोखंडे, संगीता आव्हाळे या स्वच्छतादूत म्हणून घोषित.

■ ज्येष्ठ अभिनेते व राज्याचे व्याघ्रदूत अमिताभ बच्चन यांच्या हस्ते व्याघ्र बचाव मोटारसायकल फेरीला हिरवा झेंडा.



## नोव्हेंबर २०१५

■ अटल सौर कृषिपंप योजनेंतर्गत पाच लाख शेतकऱ्यांना लाभ मिळणार. त्यातील १० हजार पंपाचे वाटप.

■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील निवासस्थान असलेले घर राज्य शासनाने विकत घेऊन त्याचे स्मारकात रूपांतर. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण



■ दिवंगत ज्येष्ठ नेते गोपीनाथ मुंडे यांच्या नावे गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सुरू.

■ राज्यभरात संविधान दिन उत्साहात साजरा.

## डिसेंबर २०१५


■ ज्येष्ठ पत्रकार मुजफ्फर हुसेन यांना २०१४चा लोकमान्य टिळक जीवनगौरव पुरस्कार प्रदान.

■ महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ स्थापन करण्याचा निर्णय

## स्व. गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात विमा योजना

शेतकऱ्यांच्या मदतीसाठी स्व. गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात विमा योजना २०१५-१६ या वर्षापासून राबवण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. विमा कंपन्यांना विमा हप्त्याची रक्कम दिल्यापासून १२ महिने कालावधीसाठी शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळणार आहे. या योजनेसाठी आवश्यक असणारा निधी वितरित करण्यासही मान्यता देण्यात आली.

या योजनेचा लाभ सातबारावरील नोंदीप्रमाणे १० ते ७५ वर्षे वयोगटातील राज्यातील एक कोटी ३७ लाख शेतकऱ्यांना होणार आहे. राज्यात सध्या राबवण्यात येत असलेल्या शेतकरी जनता अपघात विमा योजनेची मुदत ३० नोव्हेंबर २०१५ रोजी समाप्त होत असल्याने ही नवीन योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. दोन लाख रुपयांच्या विमा संरक्षणासाठी २७ कोटी २४ लाख ९३ हजार रुपयांचा विमा हप्ता भरण्यात येणार आहे. या योजनेसाठी शेतकऱ्यांना विहित कागदपत्रांशिवाय इतर कागदपत्रे सादर करावी लागणार नाहीत.



योजना कालावधीत संपूर्ण दिवसासाठी म्हणजेच विहित कालावधीतील प्रत्येक दिवसाच्या चोवीस तासासाठी ही योजना लागू राहणार असून शेतकऱ्यांना केव्हाही अपघात झाले तरीही या योजनेचा लाभ मिळणार आहे. विमाधारक शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू, अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन अवयव निकामी तसेच अपघातामुळे एक डोळा व एक अवयव निकामी अशा तिन्ही प्रकारच्या हानीसाठी दोन लाख तर अपघातामुळे एक डोळा अथवा एक अवयव निकामी झाल्यास एक लाख रुपयांची नुकसानभरपाई मिळणार आहे.

या योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी किंवा त्यांच्या वतीने अन्य कोणत्याही संस्थेने विमा कंपन्याकडे स्वतंत्ररीत्या विमा हप्त्याची रक्कम भरण्याची गरज नाही. सर्व खातेदार शेतकऱ्यांचा हप्ता राज्य शासनाद्वारे भरण्यात येणार आहे. तसेच यापूर्वी शेतकऱ्यांनी अथवा त्यांच्यावतीने अन्य कोणत्याही संस्थेने कोणतीही वेगळी विमा योजना लागू केली असल्यास अथवा विमा उतरविला असल्यास त्याचा या योजनेशी काहीही संबंध नसेल. या योजनेचा लाभ स्वतंत्ररीत्या मिळेल.

मृत्यू पावलेल्या शेतकऱ्याची पत्नी, शेतकरी स्त्रीचा पती, अविवाहित मुलगी, आई, मुले, नातवंडे, विवाहित मुलगी या योजनेचा लाभ घेण्यासाठी वारसदार ठरणार आहेत. विम्याचा दावा प्राप्त करण्यासाठी अपघातग्रस्ताच्या नावाचा समावेश असलेला सातबारा, फेरफार नोंद, वारसाची नोंद, अपघाताच्या स्वरूपानुसार विहित केलेली इतर कागदपत्रे यांची आवश्यकता आहे. शेती करताना होणारे अपघात, रेल्वे, रस्त्यावरील अपघात, पाण्यात बुडून मृत्यू, कीटकनाशके हाताळताना किंवा अन्य कारणांमुळे विषबाधा, विजेचा धक्का आदीमुळे शेतकऱ्यांचा मृत्यू होतो किंवा अपंगत्व आल्यास त्याच्या कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. या शेतकऱ्यांना आर्थिक लाभ देण्यासाठी ही योजना राबवण्यात येईल.

## सचिव करणार गावात मुक्काम

शासकीय योजनांची अंमलबजावणी क्षेत्रीय स्तरावर अधिक प्रभावी होण्यासाठी मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि सचिव आठवड्यातून दोन दिवसांचा दौरा करणार आहेत. सचिवांनी ग्रामीण भागात मुक्काम करून सामान्यांशी संवाद साधावा व त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करावी असे निर्देश, सर्व सचिवांना मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय यांनी दिले आहेत.


मुख्य सचिव श्री. क्षत्रियदेखील राज्याचा दौरा करणार असून लोकोपयोगी योजनांचा आढावा ते या भेटीत घेणार आहेत. सचिवांच्या समन्वय बैठकीत अन्य प्रशासकीय बाबींसोबतच गावपातळीपर्यंत योजनांच्या अधिक प्रभावी अंमलबजावणीसाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली.

## तारांकित

### शिवशाहिरांची रुग्णसेवा

महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी पुरस्काराच्या दहा लाख रुपयांसह स्वत: जवळचे १५ लाख रुपये घालून एकूण २५ लाख रुपयांची रक्कम दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलला नुकतीच देणगी स्वरूपात दिली.

गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या प्रभु कुंज या निवासस्थानी पार पडलेल्या एका अनौपचारिक सोहळ्यात शिवशाहीरांनी २५ लाख रुपयांचा धनादेश दीनानाथ मंगेशकर रुग्णालयासाठी लता मंगेशकर यांच्याकडे



सुपुर्द केला. या वेळी सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे, उषा मंगेशकर व डॉ. धनंजय केळकर उपस्थित होते. महाराष्ट्राच्या १२ कोटी जनतेच्या वतीने देण्यात येणाऱ्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराची रक्कम देऊन शिवशाहिरांनी मोठे सामाजिक कार्य केले आहे. ही रक्कम म्हणजे महाराष्ट्राच्या जनतेचा या सामाजिक कार्यासाठी अप्रत्यक्ष असा सहभागच आहे, अशा भावना यावेळी श्री. तावडे यांनी व्यक्त केल्या. 'दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाकडून रुग्णांची सेवा होत आहे. या चांगल्या सामाजिक कार्यात माझा-ही हातभार लागावा अशी माझी इच्छा होती, असे श्री. पुरंदरे म्हणाले.

## ग्रामीण भागासाठी 'मुख्यमंत्री पाणी पुरवठा योजना'



राज्यातील सध्याची पेयजलाची समस्या सोडविण्यासाठी 'मुख्यमंत्री पाणी पुरवठा योजना' लवकरच अमलात येईल, असे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर यांनी सांगितले. वीजबिलाअभावी बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजना सुरू करण्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर हे सातत्याने प्रयत्नशील आहेत. राज्यात सध्या १४७०८ गावांची पैसेवारी ५०% पेक्षा कमी आहे. या गावात दुष्काळसदृश उपाययोजना करण्यात येणार आहेत. या गावांमधील पाणी टंचाईची परिस्थिती ध्यानात घेता विजबिलाअभावी बंद असणाऱ्या सर्व पाणी पुरवठा योजनांची वीज बिले पूर्णपणे शासनाकडून अदा करण्यात येणार आहेत. थकीत वीज बिलांपैकी ५० टक्के रक्कम शासन अनुदान देणार असून, उर्वरित ५० टक्के रक्कम टंचाई निधीमधून देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे टंचाईग्रस्त गावांच्या पिण्याचा पाणीप्रश्न मार्गी लागणार आहे. यासाठी स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी यांनी आढावा घेऊन विभागीय आयुक्तांमार्फत निधीची मागणी करावयाची आहे.

राज्यात केंद्रशासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना कार्यान्वित आहे. तथापि, निधी अपुरा पडत असल्यामुळे नवीन पाणी पुरवठा योजना मंजूर होण्यास अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे राज्य शासनाकडून ग्रामीण भागासाठी ही नवीन पाणीपुरवठा योजना राज्यात सुरू करण्यात येत असल्याची माहिती श्री. लोणीकर यांनी दिली आहे.

## अंगणवाड्यांच्या परिसरात परसबागा

बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करणे तसेच महिला आणि बालकांचे आरोग्य, पोषण आहार सुधारण्याच्या उद्देशाने राज्यातील अंगणवाड्यांच्या परिसरात परसबागा निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनेला गती देण्यासाठी राज्य शासनाचा महिला-बालविकास विभाग आणि रिलायन्स फाउंडेशन यांच्यामध्ये महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला.



मुलांमधील कुपोषण कमी करण्यासाठी तसेच महिला आणि बालकांना चांगले पोषण उपलब्ध करून देऊन त्यांच्या आरोग्यात सुधारणा करण्यासाठी महिला-बालविकास विभागामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. याअंतर्गत अंगणवाड्यांच्या परिसरात परसबागा विकसित करून त्या माध्यमातून भाजीपाला, फळे, डाळी आदी प्रकारचे पोषक अन्न बालकांच्या त्याचबरोबर महिलांच्या आहारात उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न तथा जनजागृती करण्यात येत आहे. रिलायन्स फाउंडेशनमार्फत सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर) पहिल्या टप्प्यात राज्यातील पुणे, ठाणे, पालघर, यवतमाळ, परभणी आणि नाशिक या सहा जिल्ह्यांमधील अंगणवाड्यांमध्ये परसबागा निर्मितीसाठी काम केले जाणार आहे. यासाठी अंगणवाडी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, कार्यशाळांचे आयोजन करणे, तालुक्यात काही ठिकाणी प्रत्यक्ष आदर्श परसबागांची निर्मिती करून त्यामार्फत जनजागृती करणे आदी कार्यवाही केली जाणार आहे.

# तारांकित

## महिला सबलीकरणासाठी मिशेल धावली ६ हजार किमी

महिला सबलीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी मॅरेथॉनपटू मिशेल काकडे ह्या गोल्डन क्वाड्रीलॅटरल (मुंबई-चेन्नई-कोलकता-दिल्ली-मुंबई) हे ६०१६ किमीचे अंतर धावत पार करणार आहेत. त्यांना राज्याच्या महिला व बालविकास मंत्री पंकजा मुंडे यांनी, त्यांच्या मॅरेथॉनला २१ ऑक्टोबर रोजी सकाळी गेट वे ऑफ इंडिया येथे फ्लॅग दाखवून प्रोत्साहन दिले.




सहा हजार कि.मी. ची ही मॅरेथॉन मिशेल यांनी महिला सबलीकरणासाठी समर्पित केली आहे. मिशेल यांनी यापूर्वी जगभरातील अनेक मोठ्या मॅरेथॉन स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण केल्या आहेत. त्यांच्या नावे ३ लिम्का रेकॉर्ड आहेत. अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या अटाकामा कॉर्सिंग (चिली), द गोबी मार्च (चीन), द सहारा रेस (इजिप्त), द लास्ट डेझर्ट इन अंटार्टिका या वाळवंटी प्रदेशातील मॅरेथॉन त्यांनी पूर्ण केल्या आहेत. त्यामुळे मिशेल यांचा समावेश 'फोर डेझर्ट क्लब' मध्ये झाला आहे. आता त्यांनी सुरू केलेली 'द ग्रेट इंडिया क्वाड्रीलॅटरल रन' ही मॅरेथॉन २१ ऑक्टोबर २०१५ रोजी सुरू होऊन १६ एप्रिल २०१६ रोजी संपणार आहे. ही मॅरेथॉन मिशेल यांनी देशातील संघर्ष करणाऱ्या महिलांसाठी समर्पित केली आहे.

## २०१६ पर्यंत ५० गावे 'डिजीटल व्हिलेज'



राज्यातील मेळघाटमधील हरिसाल हे गाव मायक्रोसॉफ्टच्या सहकार्यातून पहिले 'डिजिटल व्हिलेज' ठरले आहे. टेलीमेडिसिन सुविधांसह कुपोषणावर मात करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अशाच प्रकारे २०१६ पर्यंत राज्यातील ५० गावे 'डिजिटल व्हिलेज' करण्याचे उद्दिष्ट असून मायक्रोसॉफ्टने त्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

भारतात मायक्रोसॉफ्टच्या सुरू झाल्याच्या २५ व्या वर्षानिमित्त गोरेगाव येथील नेस्को सेंटरमध्ये फ्यूचर अनलिश्ड ॲक्सलरेटिंग इंडिया ही परिषद घेण्यात आली. मायक्रोसॉफ्ट इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी भास्कर प्रामाणिक यांनी यावेळी मुख्यमंत्र्यांची मुलाखत घेतली. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. या परिषदेसाठी मायक्रोसॉफ्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नाडेला यांच्यासह देश-विदेशातील उद्योजक, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, स्मार्ट सिटी योजनेंर्गत शहरांचा कायापालट केला जाणार आहे. शहरांसोबतच गावांच्या सक्षमीकरणावर भर दिला आहे. त्यासाठी मायक्रोसॉफ्टच्या तंत्रज्ञानाचे सहकार्य घेण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत मेळघाटमधील हरिसाल हे गाव राज्यातील पहिले स्मार्ट व्हिलेज म्हणून समोर आले आहे. स्मार्ट व्हिलेजबरोबर स्मार्ट एमआयडीसी अंतर्गत राज्यातील उद्योग परिसरही स्मार्ट करण्यात येतील. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने राज्य सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

## नगरसेवक होण्यासाठी शौचालय बंधनकारक

महापालिका, नगरपालिका यासारख्या नागरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य होण्यासाठी स्वत:च्या निवासस्थानी शौचालय असणे आणि त्याचा वापर करणे अनिवार्य करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. याआधी ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी संबंधित उमेदवाराच्या निवासस्थानी शौचालयाची सुविधा उपलब्ध असणे आणि त्या सुविधेचा ते नियमितपणे वापर करीत असणे आवश्यक करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर, राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी सुरू आहे. या अभियानात शहरांमधील, उघड्यावर शौचास जात असलेल्या कुटुंबांना; शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देणे हा एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे. २०११ च्या जनगणनेनुसार राज्याची नागरी लोकसंख्या ५ कोटी ८ लाख २७ हजार ५३१ एवढी असून एक कोटी आठ लाख १३ हजार ९२८ कुटुंबसंख्या आहे. या कुटुंबांपैकी आठ टक्के कुटुंबांकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही. त्यानुसार राज्यातील नागरी भागातील ८ लाख ३२ हजार कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून द्यावयाची आहे. शहरांना २ ऑक्टोबर २०१७ पर्यंत हागणदारीमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे.

## तारांकित

### 'फोर्स'च्या कामगारांना मिळाला न्याय

पुणे येथील फोर्स मोटर्स लिमिटेड कंपनीच्या कामगारांचा व्यवस्थापनाशी ११ वर्षांपासून सुरू असलेला वाद संपुष्टात आला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने या कामगारांच्या वेतनात १४ हजार रुपयांची वाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. याचा लाभ कंपनीतील ४४० कामगारांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. आकुर्डी (पुणे) येथील फोर्स कंपनीच्या कामगारांच्या प्रश्नांबाबत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक घेण्यात आली. यावेळी कामगार मंत्री प्रकाश महेता, पुण्याचे पालकमंत्री गिरीश बापट, माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार शरद पवार, फोर्स




कंपनीचे चेअरमन अभय फिरोदिया, कामगार संघटनांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

फोर्स कंपनीतील दोन युनियनच्या मान्यतेबाबतचा वाद न्यायालयामध्ये प्रलंबित असल्यामुळे, २००४ पासून कंपनी व्यवस्थापनाशी, कामगारांची वेतनवाढ व इतर सेवा शर्तीबाबतचा कोणताही करार झाला नाही. त्यामुळे त्यांच्या वेतनात इतर कंपन्यांच्या तुलनेत वाढ झालेली नव्हती. या प्रश्नी कामगार संघटनांनी गेल्या महिन्यापासून आंदोलनाची भूमिका घेतली होती. त्याची दखल घेऊन मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. कामगारांच्या पगारात १४ हजार रुपयांची वाढ देण्याबाबत व्यवस्थापनाने प्रतिनिधींशी करार करावा, असा निर्णय घेण्यात आला. गेल्या ११ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नाची सोडवणूक केल्याबाबत कामगारांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

## महापौर निवासस्थानी बाळासाहेबांचे भव्य स्मारक



शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे कार्य व त्यांचे स्वाभिमानी विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी मुंबई येथे महापौर निवासस्थानी त्यांचे भव्य स्मारक उभारणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

मुख्यमंत्री म्हणाले, महापौर निवासस्थानी बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्यासाठी शासनाच्या अखत्यारीत असणारी पब्लिक ट्रस्ट स्थापन करण्यात येणार असून या ट्रस्टच्या माध्यमातून हे स्मारक उभारण्यात येणार आहे. या ट्रस्टचे प्रमुख उद्धव ठाकरे राहतील. यामध्ये मुख्य सचिव व शासकीय वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असेल. या ट्रस्टमध्ये सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी राज्य सरकार उध्दव ठाकरे यांच्याशी चर्चा करणार आहे. ट्रस्टच्या माध्यमातून स्मारकाचा आराखडा तयार करण्यात येणार आहे. तसेच या स्मारकाबाबतचा पुढील एक ते दोन महिन्यात आराखडा निश्चित करण्यात येईल, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

या स्मारकाच्या माध्यमातून बाळासाहेबांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडविण्यासाठी व विकासाची गंगा शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी शासन प्रयत्न करेन. पुढच्या वर्षीच्या स्मृतीदिनी नवीन स्मारकाच्या ठिकाणी बाळासाहेबांच्या आठवणींना उजाळा देता येईल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

महापौर निवासस्थानी स्मारक तयार करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. ते म्हणाले, शिवाजी पार्क आणि महापौर निवासस्थान या वास्तूंवर बाळासाहेबांचे विशेष प्रेम होते. त्यामुळे महापौर निवासस्थानी स्मारक उभारणे उचित ठरेल. बाळासाहेबांचे व्यक्तिमत्त्व चौकटीत बंदिस्त करणे अवघड आहे. त्यांचे विचार जगापर्यंत पोहोचवण्यासाठी हे स्मारक उपयुक्त ठरेल. त्यादृष्टीनेच त्याची रचना करण्यात येईल, असे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले.

## मातांच्या चौरस आहारासाठी 'डॉ. अब्दुल कलाम अमृत योजना'

अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांच्या आहारातील उष्मांक आणि प्रथिनांमध्ये वाढ करणे, जन्माला येणाऱ्या सुदृढ बालकांचे प्रमाण वाढवणे; सहा महिने कालावधीसाठी एक वेळचा चौरस आहार देणे, यासाठी 'भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत योजना' सुरू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

मुलांमध्ये चेतना निर्माण करण्याच्या डॉ. कलाम यांच्या कार्याचा गौरव करण्याच्या दृष्टिकोनातून या योजनेला 'भारतरत्न डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम अमृत योजना' असे नाव देण्यात आले आहे. ही योजना राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यांतील ८५ एकात्मिक बाल विकास प्रकल्पांच्या कार्यक्षेत्रात राबवण्यात येणार आहे.

अनुसूचित क्षेत्रातील अंगणवाडी कक्षेत येणाऱ्या सर्व गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांना या योजनेनुसार एकूण सहा महिन्याच्या कालावधीसाठी एक वेळचा चौरस आहार मिळणार आहे. उष्मांक व प्रथिनांच्या कमतरतेमुळे कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण या योजनेमुळे कमी होण्यास मदत होणार आहे. अनुसूचित क्षेत्रामधील सुमारे १ लाख ८९ हजार एवढ्या गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना या योजनेचा दरवर्षी लाभ मिळेल.

# तारांकित

## बालकामगाराची सुटका

पवई येथील शिपिंग कॉर्पोरेशनच्या वसाहतीतील एका घरात काम करणाऱ्या बालकामगाराची सुटका आदिवासी विकास राज्यमंत्री राजे अम्ब्रीशराव अत्राम यांच्या प्रयत्नामुळे नुकतीच करण्यात आली.

बिहारमधील किरई या गावातील बबलुकुमार सिताराम चौरसिया हा चौदा वर्षांचा मुलगा गत एका वर्षापासून पवई येथील शिपिंग कॉर्पोरेशनच्या वसाहतीत राहणाऱ्या कॅप्टन सुशांतकुमार चौरसिया यांच्या घरात लहान मुलांना सांभाळण्याचे काम करत असे. ही बाब नागरिकांच्या



तक्रारीवरुन आदिवासी विकास राज्यमंत्री राजे अम्ब्रीशराव अत्राम यांच्या निदर्शनास येताच त्यांनी तत्काळ कॅप्टन सुशांतकुमार यांच्या गैरकृत्याची माहिती संबंधित पोलीस ठाण्यात दिली व बालकामगार बबलुकुमार याच्या सुटकेसाठी कायदेशीर पाठपुरावा करून त्याची सुटका केली.

याप्रकरणी श्री. चौरसिया यांच्याविरुद्ध पोलिसांनी दाखल केलेल्या खटल्याचा पाठपुरावा श्री. राजे अम्ब्रीशराव यांनी केला. बालकामगारास अखेर न्याय मिळाल्याबद्दल नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



# एकोपा जपणाऱ्या जत्रा

**कीर्ती पांडे**

मी मेळघाटात कसल्याशा कामानिमित्त निघाले होते. दिवाळी नुकतीच आटोपली असली तरी निगुतीने सारवलेल्या अंगणातून आणि मोठमोठ्या रांगोळ्यातून ती अजूनही गावात रेंगाळल्याचे जाणवत होते. मेळघाटाच्या एका गावात पोहोचलो. तेथे तर सगळेच वातावरण वेगळे होते. रंगीबेरंगी पोशाख केलेल्या कोरकू तरुण-तरुणी घुंगरू बासरी, ढोलकीच्या तालावर नजाकतीने फिरकत होत्या. संपूर्ण वातावरणच रंगीबेरंगी होते. जत्राच होती ती. पण त्याला कोरकूमध्ये म्हणतात घुंगरू बाजार. एखाद्या हिंदी चित्रपटात शोभावे असे जत्रेचे 'थ्रिल' या घुंगरू बाजारात असते. विवाहोत्सुक तरुण-तरुणी या जत्रेतच आपला जोडीदार निवडतात आणि नंतर घरच्यांच्या संमतीने लग्न करतात. गावच्या जत्रेचा असाही उपयोग होतो हे मला तेव्हा कळले.

गावची जत्रा हा विषयच तसा आहे. प्रत्येकाला ओढ लावणारा. सण उत्सवाच्या परंपरा जपणाऱ्या महाराष्ट्रातील गावागावांनी जत्रांची परंपराही वर्षानुवर्षे जपली आहे. महाराष्ट्रातील जवळपास प्रत्येक गावांमध्ये वर्षातून एकदा तरी जत्रोत्सव असतोच असतो. ही जत्रा कधी ग्रामदेवताचा वार्षिक उत्सव म्हणून असते तर कधी संत, महात्म्यांच्या स्मरणार्थ, जयंतीनिमित्त असते. विश्वकोशाने जत्रेच्या केलेल्या व्याख्येनुसार एखाद्या देवतेच्या उत्सवासाठी अथवा एखाद्या सत्पुरुषाच्या पुण्यतिथी वा जयंतीनिमित्त किंवा एखाद्या तीर्थक्षेत्री ठरावीक दिवशी, ठरावीक कालावधीमध्ये गावोगावच्या लोकांचा जो धार्मिक मेळावा असतो त्यास जत्रा वा यात्रा असे म्हणतात.

गावोगावच्या वेगवेगळ्या प्रथेनुसार या जत्रांचे दोन प्रकार पडतात. ते म्हणजे खारी जत्रा आणि गोडी जत्रा. खारी जत्रा म्हणजे उत्सव देवतेला रेडा, बोकड, कोंबडे यांचे बळी दिले जातात शिवाय नैवद्यही मांसाहाराचा असतो. गोड्या जत्रेमध्ये नैवद्य पुरणपोळी, वडा असा असतो. उत्सवी देवतेच्या प्रकृतीनुसार म्हणजे (तामसी किंवा सात्त्विक) हे जत्रांचे प्रकार सर्वत्र बघायला मिळतात. जत्रेच्या काळामध्ये ज्या देवतेची जत्रा असेल त्या देवाला अभिषेक, हवन, पालखीतून किंवा रथातून मिरवणूक, भजन, कीर्तन अशी परंपरेनुसार आराधना केली जाते. उत्सवानिमित्त लागणारा मेळा

**हिंदूच्या जत्रांसोबतच इस्लामधर्मीय सत्पुरुषांच्या पुण्यतिथीलाही महाराष्ट्रात काही ठिकाणी जत्रा भरवतात. त्यांना उरुस, उर्स किंवा जुलुस म्हणतात. हे जुलूस म्हणजे सामाजिक ऐक्याचे उत्तम उदाहरण होत. गावातील प्रत्येक जण या जुलुसात भक्तिभावाने सहभागी होतो. नागपूरच्या ताजुद्दिन बाबांचा उत्सव मोहरमच्या २६ व्या दिवशी येतो. वाडी येथील हाजी मलंग उरुस, भिवंडीचा बाबा दिवाणसाहेब आणि हजरत मरब्दुम फकीर अलीसाहेब यांचा ऊरुस प्रसिद्ध आहे.**

लोकांच्या आकर्षणाचा विषय असतो. जत्रा शब्द उच्चारला की डोळ्यासमोर येतो तो वरखाली गरगर फिरणारा लाकडी आकाशपाळणा, रंगीत काचेच्या बांगड्यांची दुकाने, रस्त्याच्या कडेला बरोबर जाण्यायेण्याच्या मार्गावर उभा असलेला फुगे-चक्री विकणारा आणि या साऱ्यामध्ये उदबत्ती धुपाच्या वासामध्ये मधूनच दरवळणारा गरमागरम भजी, बटाटेवड्यांचा सुगंध. साधारणपणे श्रावणात महादेवाचे मंदिर असलेल्या परिसरात मोठ्या जत्रा भरतात. त्यानंतर दिवाळी झाली की, कार्तिकी पोर्णिमेपासून मोठ्या प्रमाणावर जत्रांना सुरुवात होते. नद्यांचे संगम, उत्तर वाहिनी नदी, दक्षिण वाहिनी नदी जिथे असेल अशा नदीकाठी भरणाऱ्या जत्रा या साधारणपणे संक्रमणपर्वात म्हणजे मकर संक्रांतीच्या कालावधीत भरतात. कार्तिकी पोर्णिमेनंतर जत्रोत्सव सुरू होण्यामागे चातुर्मासाची समाप्ती झालेली असते. हे जसे एक कारण आहे तसे यामागे सामाजिक कारणही असावे, असे मला वाटते. कार्तिकी महिना उजाडेपर्यंत शेतीची कामे जवळपास संपलेली असतात. पुढील दोन-तीन महिने म्हणावे तसे काम नसते. या काळात छोटा व्यापार केला तर रोजगाराचा प्रश्न सुटतो आणि ही व्यापाराची संधी या जत्रांमधून मिळते. जत्रेच्या कालावधीत आजूबाजूच्या गावांमध्ये बनणाऱ्या वस्तूंची दुकाने लागतात. याशिवाय गावकऱ्यांच्या गरजेच्या वस्तू सहज उपलब्ध असतात. त्यासाठी वर्षभर पैशाची जमवाजमव करायची आणि या वस्तू निगुतीने वापरायच्या ही पद्धत होती. आजही सुगीचा हंगाम आटोपला की, शेतकऱ्यांच्या गाठीला चार पैसे येतात तेव्हा आवश्यक खरेदी केली जाते. याशिवाय जत्रांचे महत्त्व होते ते म्हणजे आजूबाजूच्या गावांमध्ये राहणाऱ्या नातेवाइकांची भेट होणे. ज्यांची भेट झाली नाही असे नातेवाइक जत्रेनिमित्त नक्की एकमेकांना भेटत. लग्न सोयरीक जमवणे या गोष्टीही जत्रेच्या काळात होत. आजही कोकणी माणूस धयकाल्याला गावी जातो ते याचमुळे. आदिवासी भागात जिथे होळीदरम्यान जत्रा असतात या जत्रांना गावी आलेच पाहिजे असा या समाजाचा अलिखित नियम असतो. आज काळ बदलला आहे. त्यामुळे जत्रांची आणि त्यानिमित्त भरणाऱ्या बाजारांची गरज गावांनाही फारशी उरली नाही. पण जत्रांचे हे संदर्भ आणि त्यानिमित्ताने जपली जाणारी परंपरा, लोककला आणि स्थानिक रोजगार हे आपण लक्षात घ्यायला हवे.

याचे उत्तम उदाहरण होळीनंतर होणाऱ्या मेळघाटातील गावांच्या जत्रात बघायला मिळते. कोरकू स्त्रियांना कलाकुसर केलेल्या चांदीच्या दागिन्यांचे अतिशय वेड आहे. त्यामुळे दरवर्षी या बाजारामध्ये चांदीच्या दागिन्यांची खूप दुकाने असतात. काचेच्या बांगडीवाल्याने खाली रस्त्यावर दुकान थाटावे तसे चांदीच्या दागिन्यांचे व्यापारी रस्त्यावर दुकाने थाटून बसतात. मराठवाड्यातील काही जत्रांमध्ये रेडिमेड चुली मिळतात तर विदर्भातील बहिरममध्ये प्रसिद्ध आहेत ती मातीची भांडी. मांसाहार पदार्थ या भांड्यांमध्ये शिजवले जातात. लाकडी, खेळणी, विळ्या, सुऱ्या, तवे, बिडाच्या वस्तू, कपडे, जनावरे, बैलगाड्या, दमण्या अशा एक ना अनेक वस्तूंसाठी कित्येक जत्रा नावाजलेल्या आहेत. मालेगावमधील खंडोबाची जत्रा घोड्यांच्या बाजारासाठी प्रसिद्ध आहे. इथले लोक आता या खंडोबाच्या जत्रेला घोड्यांची जत्रा म्हणतात. या जत्रेनिमित्त लागणारी खाऊची दुकाने हा पूर्वी लहानथोरांचा आकर्षणाचा विषय होतो. आजही काही विशिष्ट ठिकाणचे विशिष्ट पदार्थ प्रसिद्ध आहेत. जसे कोकणातल्या जत्रांमधले खाजा, शेवेचा लाडू, कोल्हापूरकडल्या जत्रांमध्ये मासांहारी पदार्थ तर विदर्भातल्या जत्रांमध्ये मिळाणारा तिखट कच्चा चिवडा, बोरकूट, बोरवड्या. याशिवाय काही जत्रा पेढे, मिठाई यासाठीही प्रसिद्ध आहेत. खरे म्हणजे या जत्रांनी महाराष्ट्राच्या

**जत्रांची व्यवस्था गाव पातळीवर उत्तम सांभाळली जाते. प्रत्येकाची जबाबदारी निश्चित केलेली असते. गावातील या बलुतेदारांचा मान जत्रेच्या निमित्त राखला जातो. प्रत्येकाने ग्रामदेवतेच्या पालखी पुजोपचारामध्ये काय जबाबदारी सांभाळायची त परंपरेने ठरलेले असते. ती जबाबदारी म्हणजे त्यांचा मान पालखीचा मान, काठीचा मान असे याबद्दल बोलण्याची पद्धत आहे.**

पारंपरिक लोककलांना आश्रय दिला आहे त्यांची जपणूक केली आहे. जत्रांच्या निमित्ताने रंगणारे कुस्त्यांचे फड, नाटके, दशावतारी नाटक, तमाशा, लावण्या यांनी वर्षानुवर्ष लोकांचे मनोरंजन केले आहे. या कलावंताना हक्काचा रोजगार या जत्रांनी मिळवून दिला.


आज काळ बदलला आहे. त्यामुळे जत्रांची आणि त्यानिमित्त भरणाऱ्या बाजारांची गरज गावांनाही फारशी उरली नाही. पण जत्रांचे हे संदर्भ आणि त्यानिमित्ताने जपली जाणारी परंपरा, लोककला आणि स्थानिक रोजगार हे आपण लक्षात घ्यायला हवे. आणि या जत्रांना पूर्वीचा तजेला कसा देता येईल हेही बघितले पाहिजे.

**(लेखिका या संस्कृती विषयाच्या अभ्यासक आणि महाराष्ट्र अहेडच्या संपादिका आहेत.)**
**संपर्क : ०९५९४९४४८००**




अचलपूर


असदगड



# विदर्भातील किल्ले

भौगोलिकदृष्ट्या विदर्भाची दोन भागात विभागणी झालेली आपल्याला दिसून येते. एक म्हणजे पूर्व विभाग यात (नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर) इत्यादी जिल्ह्यांचा समावेश तर पश्चिम विभागात (वर्धा, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम) इत्यादी जिल्ह्यांचा समावेश होतो. विदर्भातील पूर्व भाग हा जंगल, झाडी, झुडूप इत्यादींनी व्यापलेला आपणास पाहावयास मिळतो, तर उत्तरेकडील म्हणजेच अमरावती या भागात सातपुडा रांगा पसरलेल्या आपल्याला दिसतात.

**विदर्भ हा महाराष्ट्राचा नैऋत्येकडील भाग असून यातील काही भाग सातपुडा रांगेच्या जवळ आहे. भौगोलिकदृष्ट्या सातपुडा पर्वतरांग ही विदर्भाच्या उत्तरेला पसरलेली आहे. अमरावती जवळील मेळघाट परिसर हा सातपुडा रांगेचा दक्षिणेकडील एक फाटा आहे असे म्हणता येईल. अमरावतीजवळ याच रांगेमध्ये गाविलगड आणि नरनाळा हे दोन मोठे आणि विदर्भाच्या दृष्टीने महत्त्वाचे किल्ले वसलेले आहेत. सातपुडा हा महाराष्ट्राला मध्यप्रदेशशी जोडतो आणि तोडतो देखील. सातपुडा हा भिल्ल आणि गोंडांचा प्रदेश असे म्हटले जाते. सातपुडा पर्वतरांग ही तापी नदी समुद्राला जेथे मिळते तेथपासून सुरू झाली आहे. सातपुडा रांग ही सह्याद्रीच्या रांगेला काटकोनात जाते. या रांगेतदेखील किल्ले बांधले गेले आहेत.**

विदर्भामध्ये मुख्यतः दोनच प्रकारचे किल्ले दिसतात ते म्हणजे गिरिदुर्ग आणि भुईकोट. अंबागड, टिपागढ, भिवगड, रामटेक, महदागड, सानगडी, प्रतापगड, माणिकगड, सुरजागड, राजोलीचा किल्ला, माहूरगड, पितरांचा किल्ला, गाविलगड, नरनाळा, देवगड, हे डोंगरी किल्ले म्हणजे गिरिदुर्ग विदर्भात आहेत. तसेच उमरेडचा किल्ला, नगरधन, आमनेर, देवलापार, पवनी, बल्लारपूर, बाळापूर, ई. भुईकोट किल्लेदेखील विदर्भाच्या पूर्व आणि पश्चिम भागात पाहायला मिळतात. या सर्व किल्ल्यांमध्ये देवगड हा गोंड राजांनी बांधलेला किल्ला असून ती त्यांची राजधानी होती. गडावरील अवशेष पाहून गोंड राजांच्या वैभवाचा अंदाज येऊ शकतो. गडावर आजही प्रवेशद्वार, नगारखाना, महाल, धार्मिक स्थळे इ. मोठ्या वास्तू दिमाखात उभ्या असलेल्या दिसतात. गडावरील वास्तूंची बांधकामे दगड, विटा आणि चुना याचा वापर करून केलेली आहेत.

**डॉ. सचिन जोशी**


### भोसल्यांचा किल्ला

नागपूर हे विदर्भाचे मुख्य केंद्र असून या शहरामध्ये आज एका किल्ल्याचे अवशेष काही भागात दिसून येतात. हे अवशेष आपल्याला नागपूरकर भोसल्यांच्या कर्तृत्वाची आठवण करून देतात. नागपूरकर भोसले यांचे वंशज मुधोजी भोसले (दुसरे) यांनी सीताबर्डी या नागपूर येथील भागात १९ व्या शतकात भुईकोट किल्ला बांधला होता. या किल्ल्याला ४६ बुरुज आणि ८ दरवाजे बांधलेले होते आणि प्रत्येक दरवाज्याला वेगवेगळी नवे दिलेली होती. इ.स. १८१८ च्या आसपास इंग्रजांनी जेव्हा किल्ल्यावर हल्ला केला त्या सुमारास ब्लाकर्स या इंग्रज अधिकाऱ्यांनी एक नकाशा तयार करून ठेवला होता. या नकाशाच्या आधारे सीताबर्डीचा किल्ला किती मोठा होता हे आपल्याला आज सांगता येऊ शकते. या किल्ल्यात जुना महाल, नवीन महाल, राजवाडा, विहिरी, इ. वास्तू होत्या. शहरीकरणाच्या ओघात हा किल्ला जवळजवळ नामशेष झालेला आहे. आता फक्त २-३ बुरुज लष्करच्या परिसरात आपले अस्तित्व टिकवून आहेत.

### चंद्रपूर आणि गडचिरोली परिसरातील किल्ले

चंद्रपूर आणि गडचिरोली परिसरात वैरागड, सूरजागड, राजोली, टिपागड, इ. महत्त्वाचे किल्ले आहेत. या भागात मोठ्या प्रमाणावर घनदाट जंगल तर आहेच पण नक्षलग्रस्त भाग असल्यामुळे हे किल्ले पाहता येणे सहज शक्य होत नाही. चंद्रपूर, बल्लारशहा, वैरागड, चांदणखेडा ही तटबंदीयुक्त गावे आहेत, तर सूरजागड, राजोली हे गिरिदुर्ग आहेत. सूरजागडाचा माथा सपाट असून तेथे ठाकूरदेवाचे देवस्थान आहे. सूरजागड हा किल्ला सूरजन बलावायिक या सरदाराने बांधला त्यामुळे त्याचे नाव सूरजागड पडले असे अभ्यासक


नरनाळा गड





गाविलगड

मानतात. गडावर आज तटबंदी, दरवाजे, धार्मिक स्थळे, वाडे यांचे अवशेष उरले असून ते सर्व घनदाट झाडीमध्ये आहेत. टिपागड हा किल्ला गडचिरोली या गावापासून अंदाजे ८० कि.मी अंतरावर घनदाट जंगलात वसलेला आहे. सर्व बाजूनी छोटे डोंगर आणि मधोमध हा किल्ला असे याचे स्वरूप आहे. टिपा या शब्दाचा अर्थ गोधन भाषेत द्वीप असा होतो. पूरमशहा नावाचा गोंड राजा येथे राज्य करीत होता असे म्हणतात. त्याने छत्तीसगडचा काही भाग जिंकलेला होता. टिपागडवर तळी बांधून पाण्याची पुरेपूर व्यवस्था केलेली दिसून येते. पुढे कर्णशहा या गोंड राजाने टिपागड जिंकून घेतला.

## पवनी किल्ला

विदर्भातील अजून एक महत्त्वाचा भुईकोट किल्ला म्हणजे पवनी होय. पवनी हे मध्यम वस्तीचे गाव असले तरीही या गावाला २००० वर्षांचा इतिहास आहे. पुरातत्त्व विभागातर्फे या किल्ल्याच्या परिसरात उत्खनन करण्यात आले होते. यामध्ये २२०० ते २००० वर्षापूर्वीच्या वसाहतीचे पुरावे मिळालेले आहेत. याच पवनी गावात मजबूत तटबंदी असलेला भुईकोट किल्ला आहे. किल्ल्याचा दरवाजा आजही पूर्णावस्थेत असून त्यावर द्वारशिल्प कोरलेली आहेत. तटबंदीच्या बाहेरील भागात खंदक आहे. तटबंदीमध्ये ठिकठिकाणी जंग्या आणि तोफांचा मारा करण्याच्या जागा आहेत. कोटाच्या तटबंदीमध्ये ठिकठिकाणी बुरूज बांधले असून तटावरून चालण्यासाठी प्रशस्त अशी फांजी (चालण्याची जागा) आहे. किल्ल्यामध्ये सध्या अनेक वसाहती झाल्या आहेत.

## गाविलगड व नरनाळा

विदर्भातील सर्व किल्ल्यांमध्ये प्रसिद्ध असलेले दोन महत्त्वाचे किल्ले म्हणजे गाविलगड आणि नरनाळा. हे दोन्ही गिरिदुर्ग किंवा वनदुर्ग प्रकारात मोडणारे किल्ले असून, दोन्ही किल्ले आकाराने प्रचंड मोठा विस्तार असलेले आहेत. नरनाळा हा किल्ला अकोट या गावाजवळ असून गडावर वाहन जाण्यासाठी रस्ता केला आहे. गडाच्या पायथ्याला शहानूर नावाचे गाव असल्याने त्याला शहानूरचा किल्ला असेही म्हणतात. सातपुडा रांगेतील हा किल्ला पायथ्यापासून अंदाजे ५०० मी. उंचीवर बांधलेला आहे. नैऋत्य आणि ईशान्य या दोन दिशेने गडावर प्रवेश करता येऊ शकतो. पाच दरवाजे पार केल्यानंतर गडामध्ये प्रवेश करता येतो. यामध्ये सर्वप्रथम शहानूर दरवाजा, त्यानंतर मेंढा दरवाजा, आणि सुबक आणि भक्कम बांधणीचा महाकाली दरवाजा असे तीन महत्त्वाचे दरवाजे आहेत सक्कर तलाव नावाचा एक मोठा तलाव आणि त्याव्यतिरिक्त इतर तीन तलाव गडावर पाहता येऊ शकतात. गडावरील सर्वात महत्त्वाची आणि प्रेक्षणीय  जागा म्हणजे नौगजी तोफ. बांगडी प्रकारात तयार केलेली एक अजस्त्र तोफ या किल्ल्यावर असून ती गडावरच तयार केली असावी. मोठे चार तलाव वगळता गडावर छोटे १० तलाव आहेत. विस्तीर्ण पसरलेली तटबंदी आणि बुरूज आजही चांगल्या स्थितीत असल्याचे दिसून येते. किल्ल्याची बांधणी बहामनी साम्राज्याच्या कालखंडात झाली असावी. गाविलगड हादेखील सातपुडा रांगेतील नरनाळाएवढाच उंच आणि विस्तीर्ण पसरलेला किल्ला आहे. किल्ल्यांच्या जोडगोळीमध्ये गाविलगड आणि नरनाळा असेच नाव घेतले जाते. गाविलगड किल्ला चिखलदरा जवळील मेळघाटाच्या जंगलात वसलेला आहे. बहामनी साम्राज्यातील अहमदशाह बहमनी याने सातपुड्याच्या रांगेवर हा भक्कम किल्ला बांधून उत्तरेकडून येणारे आक्रमण रोखण्याचा प्रयत्न केला. पुढे काही वर्षांनी हा किल्ला औरंगजेबाने जिंकून घेतला आणि त्यानंतर १९ व्या शतकात तो नागपूरकर भोसले यांच्याकडे होता. गडावर आजही दहा तोफा असून त्यापैकी काही तोफांवर फारसी लिपीमध्ये लेख कोरलेले आहेत. सक्कर तलाव, कालापानी तलाव असे दोन मोठे तलाव गडावर आहेत. गडाला एकूण पाच दरवाजे असून त्यावर हत्ती, शरभ, सिंह अशा प्राण्यांच्या प्रतिमा कोरलेल्या दिसतात. कालभैरव आणि बिल्ली नावाच्या दोन बांगडी पद्धतीने बनविलेल्या तोफा हे गडावरील लक्षवेधी स्थळ आहे. गडावर बांधकामाची अनेक जोती व अवशेष विखुरलेले आहेत. तटबंदी काही ठिकाणी ढासळलेली असली तरी आज त्या तटबंदीमध्ये अंदाजे २०-२५ बुरूज उभे असल्याचे दिसते. विदर्भातील किल्ले हे कायमच उपेक्षित राहिले असल्याचे चित्र आपणा सर्वांना दिसते.

महाराष्ट्रात गडकिल्ल्यांचा इतिहास म्हटले की, फक्त छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे सह्याद्रीतील दुर्ग डोळ्यांसमोर येतात. पण विदर्भात बहामनी साम्राज्यांनी, गोंड राजांनी तसेच नागपूरकर भोसले यांनी बांधलेले किल्ले यांच्यामुळे विदर्भाचा इतिहास आजही वास्तुरूपात जिवंत आहे. पर्यटनाच्या दृष्टीने हे किल्ले खूप महत्त्वाचे आहेत. कारण पर्यटक सध्या कान्हा, ताडोबा, मेळघाट येथे निसर्ग पर्यटनासाठी येतच असतात. त्या पर्यटकांना किल्ल्यांकडे वळवले तर विदर्भातील दुर्ग पर्यटनाला चालना मिळू शकते.

**(लेखक पुणे येथील डेक्कन महाविद्यालयात पुरातत्व विभागात संशोधक आहेत.)**
**संपर्क : ०९८२२१०९३६२**


रामटेक गड


सानगडी किल्ला

# लठ्ठपणा टाळण्यासाठी...

**आपण नेहमी आपल्या आजूबाजूला अनेक लठ्ठ लोक बघत असतो. दर दहा लोकांमध्ये एक लठ्ठ व्यक्ती आपल्याला पाहायला मिळते. इतरांच्या दृष्टीने लठ्ठपणा हा चेष्टेचा, विनोदाचा विषय असतो, आणि यामुळे लठ्ठ माणसाचा न्यूनगंड अधिक वाढत जातो. लठ्ठ असल्याने खरोखरीच काही बिघडते का? लठ्ठपणा म्हणजे काय? तो कमी कसा करता येईल, याविषयी सांगताहेत डॉ. मनीषा महाजन**

लठ्ठपणा म्हणजे शरीरातील चरबीयुक्त मेद असलेल्या पेशीची वाढ व अशा पेशींची संख्या वाढत जाणे. लठ्ठपणा हा पूर्ण शरीराचा असू शकतो किंवा चरबीयुक्त मेद असेलल्या पेशी या पोटावर, मांड्यावर जास्त असू शकतात, लठ्ठपणा हा शरीर वस्तुमान निर्देशांक याद्वारे मोजता येतो. यांना BMI (Body Mass Index) म्हणतात.

BMI = Wt (Kg)
Ht (m)2

जेव्हा शरीरातील आहाराचे प्रमाण जास्त होते तेव्हा शरीरातील ऊर्जा वाढत जाते, व तिचा फारसा वापर न झाल्याने शरीरात चरबीयुक्त मेद तयार होते.

**वयानुसार :-**

१) लठ्ठपणा हा कोणत्याही वयात दिसून येतो.

२) अर्भकामध्ये असलेले जास्तीचे वजन हे त्यांच्या पुढील आयुष्यातील लठ्ठपणाचा प्रादुर्भाव ठरू शकतो.

३) जवळ जवळ १/३ प्रौढ (लठ्ठ) हे त्याच्या लहानपणापासूनच लठ्ठ भासतात.

**लिंग :**

स्त्रियांमध्ये लठ्ठ होण्याचे प्रमाण हे पुरुषांपेक्षा जास्त असते, तसेच पुरुषांमध्ये जादा वजन होण्याचे प्रमाण जास्त असते.

संशोधनात असे आढळून येते की, पुरुषांमध्ये २९ ते ३५ वयोगटात वजन वाढीला लागते, तर स्त्रियांमध्ये ३० नंतर वजन वाढायला सुरुवात होते व ४५ ते ४९ मध्ये सर्वात जास्त वजन वाढते. थोडक्यात शरीर गुटगुटीत दिसू लागते की, जे दिसावयास बरे दिसत नाही आणि त्यामुळे मानसिक व शारीरिक तणाव निर्माण होते. स्त्रियांचा लठ्ठपणा हा सामान्यत: बाळंतपणानंतर दिसू लागतो आणि बाळंतपणाची संख्या जशी वाढत जाते तसा लठ्ठपणा वाढत



जातो. स्त्रियांची हार्मोन्स व स्थुलता याचा निकटचा संबंध आहे. अशी हार्मोन्स जास्त प्रमाणात देण्यात आल्यास लठ्ठपणा वाढतो.

**अनुवंशिकता :** अतिलठ्ठपणा हे बहुधा अनुवंशिक असते आणि पालक लठ्ठ असताना मुलेही लठ्ठ होण्याची शक्यता असते.

**शारीरिक निष्क्रियता** (Physical inactivity) **:** नियमित व्यायाम हे वाढणाऱ्या वजनाला मर्यादा घालतात. परंतु वाढत जाणारी आरामदायी जीवनशैली, शारीरिक श्रमाचा अभाव, बदलत राहणारा आहार, पुस्तकवाचन, संगणक, दूरचित्रवाणीसमोर तासनतास घालवणे, व्हिडिओ गेम्स, शारीरिक क्रीडांचा अभाव, यामुळे स्थूलता वाढीस लागते व वजन वाढण्यास सुरुवात होते.

**खाण्याच्या सवयी :** दोन जेवणाच्या मध्ये खाणे, गोड जास्त खाणे, तूप, लोणी, चीज, तळलेले व मसालेदार पदार्थ, तसेच फास्ट फूड, पिज्जा, बर्गर, पावभाजी, शीतपेये, चायनीज, जास्त प्रमाणात मांस खाणे, आईसक्रीम, केक, चॉकलेट्स या सर्वांमुळे वजन वाढीला लागते.

**मानसिक कारणे :** भावनिक समस्या म्हणजे उदासीनता, चिंता, निराशा, एकाकीपणा याचा परिणाम वजनवाढीवर होतो म्हणजे व्यक्ती उदासीन असताना जास्त खाते.

**इतर कारणे :** कुटुंबातील लठ्ठ होण्याची प्रवृत्ती म्हणजे आईवडलांचे वजन जास्त असेल तर त्यांच्या पाल्यांचे वजन जास्त असते, हार्मोन्सचा असंतुलितपणा, मद्यपान, उच्चशिक्षित, धूम्रपान, वांशिक व काही औषधे या सर्व बाबींमुळे वजन वाढीस लागते.

**लठ्ठपणामुळे आरोग्याला होणारा धोका :** मधुमेह, श्वासोच्छवास समस्या,

## असे वजन असा लठ्ठपणा

| अ.क्र. | तपशील | शरीर वस्तुमान निर्देशांक | इतर रोग होण्याचा धोका |
|---|---|---|---|
| १ | कमी वजनाचा (Under Weight) | १८.५० | कमी |
| २ | सामान्य वजन (Normal Weight) | १८.५० ते २४.९९ | सरासरी, मध्यमान |
| ३ | जादा वजन (Over Weight) | २५.०० | |
| | पूर्व लठ्ठ (Pre Obese) | २५ ते २९.९९ | वाढ (Increased) |
| | लठ्ठ श्रेणी (Obese Class I) | ३० ते ३४.९९ | मध्यम (Moderate) |
| | लठ्ठ श्रेणी (Obese Class II) | ३५ ते ३९.९९ | तीव्र (Severe) |
| | लठ्ठ श्रेणी (Obese Class III) | ७४० | फारच तीव्र (Very Severe) |



पित्ताचे प्रमाण, कर्करोग, उच्च रक्तदाब, वंध्यत्व, स्ट्रोक, डोळ्यांचे विकार, संधिवात, हृदयाचे आजार, नैराश्य/न्यूनगंड

### आहारात नियमितता :

सकाळी भरपूर नाष्टा करावा. जेवण हे एकावेळी भरपूर न करता थोडे थोडे खावे.

दर तीन तासानी, असे दिवसातून ५ वेळा खावे, परंतु लक्षात ठेवावे की कॅलेरिज या रोज दिवसाला ५०० Cal. कमी असाव्या.

साधारणत: दररोज शहरी भागात २१०० Cal., ग्रामीण भागात २४०० Cal., एका व्यक्तीला लागतात. याचा विचार करून आपला BMI काढून त्यानुसार आपण आपल्या कॅलेरिज ठरवाव्यात.

फळांचा ज्यूस, ताजी फळे, अर्धवट कच्च्या भाज्या, सॅलड तसेच प्रोटिन शरीराच्या स्नायूंसाठी आवश्यक आहेत, म्हणून जमले तर सकाळी नाष्ट्याबरोबर २ उकडलेली अंडी खावीत. दूध व दही यांचा समावेश असावा व तसेच राजमा, बदाम, मोड आलेली कडधान्य व मूग खावेत.

कर्बोदके, प्रथिने यांचा आहारात समावेश असावा. भाताचे प्रमाण, बटाटे, तेलकट व तुपकट पदार्थ खाऊ नयेत. यामुळे आपण आपले आरोग्य शरीर व मन प्रसन्न ठेवू शकतो.

## अशी घ्या काळजी

- सर्वात प्रथम आत्मनिर्धार पक्का व मनोबल दृढ असावे लागते. इच्छाशक्ती प्रबळ असली पाहिजे. जर असे असेल तर नक्कीच वजन कमी करू शकता व तुमचा आत्मविश्वास वाढायला लागेल व तुम्ही पूर्वीप्रमाणे सुडौल व सुंदर शरीर मिळवू शकता, फक्त गरज आहे नियमितपणाची.
- डाएटिंग, आहार नियंत्रण सुरू केल्यानंतर वजन कमी होण्याची गती अपेक्षेप्रमाणे जलद असते, मात्र नंतर ही गती मंदावते.
- स्त्रियांना गर्भारपणात व बाळंतपणानंतर जे अधिक खाऊ घातले जाते ते टाळले पाहिजे. तसेच गर्भारपणी फिरायला चालत जाणे व बाळंतपणानंतर थोडे चालणे व घरच्या घरी पोटाचे व्यायाम जरुरी आहेत.
- ज्या स्त्रियांमध्ये लठ्ठ होण्याची प्रवृत्ती दिसून येते, त्यांनी कुटुंब नियोजनाच्या गोळ्या सोडून इतर साधने वापरावयास हवीत.

(लेखिका या गोकुळदास तेजपाल रुग्णालयात निवासी वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.)
संपर्क : ०९८५०५२१६००



## उपाय

- सकाळी एक चमचा मधाबरोबर लिंबाचा रस आणि एक ग्लास कोमट पाणी प्यावे.
- रोजच्या आहारात सॅलड, ज्यूस, कांदा, टमाटे, मुळा, गाजर, काकडी, पत्ता कोबी असावी. यात कमी कॅलरी असतात व आवश्यक जीवनसत्त्वे असतात.
- आहारात तळलेले चटकदार गोड पदार्थ नसावेत.
- रात्री हलका आहार घ्यावा, जेवल्यानंतर लगेच झोपू नये.
- व्यायाम व आहार नियंत्रणामुळे वजन कमी होऊ शकेल.
- तसेच बाजारामध्ये वजन कमी करण्यासाठी वेगवेगळी औषधे उपलब्ध आहेत, त्यांना बळी न पडता डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार करावा.
- काय खायचे, किती खायचे, या बाबतीत जागरूक असले पाहिजे, तसेच प्रोटिन्स व सेल्युलोज जास्त प्रमाणात घ्यावेत.
- रोज किमान ८-१० ग्लास पाणी पिले पाहिजे, पाणी प्याल्याने भूक कमी लागून पोट साफ राहते.













# प्राण्यांचे नंदनवन

मिलिंद उमरे

ताडोबा राष्ट्रीय उद्यान आणि अंधारी अभयारण्य मिळून ६२५.४० चौ. कि.मी. परिसरात ताडोबा - अंधारी व्याघ्रप्रकल्प आहे. आदिवासींच्या 'तारू' या देवाच्या नावावरून ताडोबा राष्ट्रीय उद्यान नाव देण्यात आले. ताडोबा तलावाच्या काठावर या देवाचे मंदिर आहे. अंधारी नदी या जंगलातून वाहते म्हणून अभयारण्याला अंधारी अभयारण्य असे नाव देण्यात आले. या जंगलात सरळसोट वाढणारे सागवान आणि बांबू मोठ्या प्रमाणात दिसत असले तरी जवळपास १४१ प्रकारचे वृक्ष, वनस्पती प्रजाती आहेत. या जंगलातून फिरताना तळे, डबकी, ओहळ, पाणझरीच्या ठिकाणी ध्यानस्थ उभे भव्य अर्जुन वृक्ष तुम्हाला दिसतील. अनेक वृक्षांवर मधमाशांची पोळी दिसतात आणि त्यातला मध खाण्यासाठी चढलेल्या अस्वलाच्या तीक्ष्ण नख्यांनी या वृक्षांच्या कोमल बुंध्यावर रेखलेली नक्षीही दिसते. शिवाय बिजा, बेहडा, बिबा, भेरा, बेल, कुसुम्बी पानांचा कुसूम, पिवळीजर्द सोनवर्खी फुले आणि लांबलचक शेंगांनी नटणारा बहावा, अमृतकुंभाप्रमाणे दिसणाऱ्या पिवळसर, मोतीया रंगाची मदहोश फुले मिरविणारा आदिवासींचा कल्पवृक्ष मोह, नाजूक अंगाची मोवई, रोहन, पळस, सावर, शिसम, शिसू, तेजस्वी आणि पौष्टिक डिंक देणारा धावडा, वर्षभरात तीन रंग बदलणारा करू, मगरीच्या पाठीसारखी साल असणारा ऐन, असे कित्येक वृक्ष इथे दिसतील. प्राणी बघायचे असतील तर तुमची नजर आधी वाघच शोधू लागेल. वाघ तुम्हाला दिसेलच. पण सोनेरी रंगांचे पांढरे ठिबके असलेले कांचनमृग (चितळ), काजळमाखल्या निरागस नजरेचे सांबर,

भ्रमंती

कुत्र्यासारखे भुंकणारे भेकर, धावताना नजर ठरू न देणारा चौशिंगा, भव्यता आणि शक्तीचे मूर्तिमंत प्रतीक असलेले धिप्पाड रानगवे, काळसर शेपटीची टोके उडवत चालणारे मजेशीर रानकुत्रे, आपल्याच धुंदीत फिरणारी अस्वले, एखादी ज्वालांनी रसरसलेली उल्का नजरेपुढून निघून जावी तसा क्षणात परागंदा होणारा बिबट, ताडंगतुडंग चालत कुठेही धडकेल असं वाटणारं तडस, रात्री भटकणारे उदमांजर, ताडमांजर, खवल्यामांजर, साळिंदर असे कित्येक प्राणी आपला रानभ्रमंतीचा आनंद वाढवतात. या परिसरात जवळपास २८० पक्षी प्रजातींची नोंद झाली आहे. ताडोबा, कोळसा आणि मोहर्लीतील मोठ्या तलावांवर तुम्हाला या हिवाळ्याच्या काळात युरोप, सायबेरिया, बलुचिस्तान अशा परदेशातून येणारे पक्षी बघता येतील. या शिवाय ताडोबा तलावातील मगरी, चितळ किंवा अन्य प्राण्यांच्या हालचाली टिपता येतील. तसेच ७० प्रजातींची रंगीबेरंगी फुलपाखरे, कीटक व कोळ्यांच्या प्रजातीही दिसतील.

**कसा बघावा प्रकल्प :–** ताडोबा – अंधारी व्याघ्रप्रकल्प बघणे म्हणजे वाघ बघणे असाच अनेकांचा समज झाला आहे. ताडोबा फिरताना डोक्यात फक्त वाघ ठेवू नका. तुम्ही जर चंद्रपूरमार्गे ताडोबाला येत असाल तर पद्मापूर पार करताच सावध चित्ताने जंगल निरीक्षण सुरू करा. तुम्हाला मोहर्लीपर्यंत खूप प्राणी बघता येतील. काय सांगावं आगरझरी आधी किंवा नवरगाव चौकीजवळ वाघोबाच येतील तुमचं स्वागत करायला. ताडोबा – अंधारी व्याघ्रप्रकल्पात एकूण तीन परिक्षेत्र आहेत. ताडोबा, मोहर्ली आणि कोळसा. या भागात काटेझरी, काळाआंबा , वसंत बंधारा, सांब–यापाट, पुरानी विहीर, ९७,९८ टाके, हिलटाप , पांढरपौनी, पंचधारा, जामुनबोडी, कोसेकणार, तेलीया, जामुनझोरा, वाघडोह , आंबेउतारा, ससारोड, आंबेगड, वानरचुवा, काकडघाट, रानतळोधी रोड, शिवनझरी,अशी वन्यजीव बघण्यासाठी उत्तम स्थळे आहेत. ज्यांना अधिक शांतता व निसर्गाच्या अधिक जवळ जायचे असेल त्यांनी कोळसाची वाट धरावी. या भागात पाण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे रान अधिक घनदाट आहे. प्राणी लगेच दिसत नाहीत. या भागात रानगवे खूप आहेत. इतरही प्राणी आहेतच.

**सुलतान ते शिवाजी :–** आता महत्त्वाचा विषय राहिला. तो म्हणजे ताडोबातील वाघांचा. पूर्वी इथे वाघांना नाव देण्याची पद्धत फारशी प्रचलित नव्हती. आम्ही फिरायचो तेव्हा एका वाघाला नाव दिले होते सुलतान. हा वाघ खरच ‘ यथा नाम तथा गुण ’ असाच होता. याच्या पावलाचा ठसा आपल्या दोन्ही हातांच्या ओंजळीत मावणार नाही इतका मोठा होता. अनेकांना याच्या पाऊलखुणा बघूनच घाम फुटायचा. आता तो नाही. पण त्याच्याच तोडीचा भरभक्कम वाघ फिरतोय सध्या कोळसाच्या रानात. याचे नाव आहे शिवाजी द बॉस. शिवाय जमूनझोरा, एनबोडी, तेलीया भागात सोनम नावाची वाघीण दिसत आहे. हिला साडेचार ते पाच महिन्याचे तीन छावे आहेत. पांढरपौनी, ताडोबा तलाव परिसरात माया वाघिणीचा वावर आहे. हिलासुद्धा तीन ते साडेतीन महिन्यांची पिल्ले आहेत. वसंतबंधारा, जामूनबोडी भागात गब्बरचे राज्य आहे. जामनी तलाव, हिलटाप, जामुनबोडी परिसरात तारा आहे. हिचा छावा मोठा होऊन तिच्यापासून वेगळा झाला आहे. कोलारा गेट परिसरात पांडू तर मोहर्ली ते खातोडा परिसरात बजरंग आहे. वाघडोह परिसरात दिसणाऱ्या माधुरीला तब्बल चार छावे आहेत. याच भागात काटेझरी मेल हा वाघ फिरताना दिसतो. पूर्वी ताडोबात शेपूट तुटलेली वाघीण दिसायची. तिला पुंछकटी किंवा कतरी म्हणायचे. हिने ताडोबात खूप माहोल केला होता. असो. सुलतान ते शिवाजी दरम्यान वाघांच्या अनेक पिढ्या ताडोबात जन्मल्या. पुढेही जन्मतील आणि इथे येणाऱ्या पर्यटकांच्या डोळ्यां चे पारण फेडत राहतील.

**पोहचायचे कसे :–** विमानाने येत असाल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर विमानतळ, नागपूरपासून ताडोबा – अंधारी व्याघ्रप्रकल्प १५५ किमी आहे. रेल्वेने येत असाल तर चंद्रपूर रेल्वेस्टेशनपासून ताडोबा – अंधारी व्याघ्रप्रकल्प ४५ किमी आहे. बसमार्गे येत असाल तर चंद्रपूरपासून ४५ आणि चिमूरपासून ३५ किमी अंतरावर आहे.

**राहणार कुठे :–** महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, महाराष्ट्र वनविकास महामंडळ यांच्याकडे उत्तम निवास व्यवस्था आहे. अनेक खासगी रिसोर्ट आहेत. शिवाय गावातल्या घरात राहण्याचा अनुभव घ्यायचा असल्यास होम स्टेची सुविधाही आहे.

**फिरणार कसे :–** ताडोबा – अंधारी व्याघ्रप्रकल्प फिरण्यासाठी जिप्सी हा उत्तम पर्याय आहे. पण हा पर्याय महागडाही आहे. म्हणून सर्वसामान्य’ नागरिकांनाही प्रकल्प बघता यावा यासाठी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नातून ४ कॅन्टर बसेस व १ मिनी बसची सोय करण्यात आली आहे. कॅन्टर बसेसपैकी १ बस कोलारा गेटवर असून अन्य ३ बसेस मोहर्ली गेटवर असतात. १९ आसनांची व्यवस्था असलेली ही मिनीबस मुल रोडवरील मुख्य वनसंरक्षक व क्षेत्र संचालक कार्यालयापासून सुटते. ताडोबा – अंधारी व्याघ्रप्रकल्पाच्या कोअर भागात फिरण्यासोबतच आता मोहर्ली आणि कोलारा बफर क्षेत्रातही फिरण्याची सोय आहे.

**(लेखक हे वन्यजीव व जैवविविधता विषयाचे अभ्यासक आहेत.)**
**संपर्क : ०९४२३४२२३४८**



# इच्छाशक्तीला प्रयत्नांचे बळ

**तीव्र इच्छाशक्तीला प्रयत्नांचे बळ मिळाले की यश नजरेच्या टप्प्यात येते. अवघ्या तीन गुणांनी एमबीबीएसची संधी हुकलेल्या हुशार विद्यार्थ्याला हलाखीच्या परिस्थितीमुळे डी.एड कडे वळावे लागते. मात्र मुलाने मोठा अधिकारी व्हावे हे आईचे स्वप्न कायम मन:चक्षूंसमोर ठेवून शिक्षक, विकास अधिकारी असा यशस्वी आलेख उंचावत आयएएसपर्यंत झेप घेणारा हा विद्यार्थी म्हणजे लातूरचे नरसिंग संभाजी पवार. ते सध्या नवी दिल्ली येथे कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाचे साहाय्यक सचिव म्हणून कार्यरत आहेत. त्यांची वाटचाल त्यांच्याच शब्दात...**



**नरसिंग संभाजी पवार**
आय. ए. एस. (२०१३)
साहाय्यक सचिव, कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग, नवी दिल्ली.

यूपीएससी नागरी सेवा परीक्षा ही देशातील सर्व पदवीधरांसाठी आयएएस/आयपीएस/आयएफएस/आयआरएस बनून स्वत:चे करिअर बनवणे तसेच देशातील प्रशासकीय व्यवस्थेत उच्चपदस्थ अधिकारी बनून तळागाळातील लोकांसाठी, वंचितासाठी काम करण्याची व त्यांच्या जीवनात बदल घडवण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देते.

यूपीएससी नागरी सेवा परीक्षेंतर्गत तीन अखिल भारतीय सेवा (आयएएस, आयपीएस आणि आयएफएस), सतरा ग्रुप 'ए' सेवा आणि पाच ग्रुप 'बी' सेवा अशा २५ सेवांसाठी अधिकारी निवडले जातात. त्यामुळे जिद्द आणि चिकाटी असेल तर ही परीक्षा यशाचा राजमार्ग ठरणारी आहे.

## विजयपथ

बारावीला असताना विविध कामांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क आला तेव्हा जिल्हाधिकारी या पदाला असलेला मानसन्मान, प्रतिष्ठा व त्यांच्या कामाची व्याप्ती लक्षात आली. तेव्हा आयएएस/आयपीएस होण्यासाठी काय करावे लागते? कोणती परीक्षा द्यावी लागते? अभ्यास कसा करावा? कोणती पुस्तके वाचावीत? असे अनेक प्रश्न मनात यायचे. याच दरम्यान अविनाश धर्माधिकारी यांचे '१, विजयपथ' हे पुस्तक वाचण्यात आले. त्याद्वारे यूपीएससी अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगाची व आयोगाद्वारे घेतल्या जाणाऱ्या नागरी सेवा परीक्षांची माहिती मिळाली.

## परिस्थितीने वळण दिले

माझे शालेय शिक्षण लातूर जिल्ह्यातील हडोळती (ता. अहमदपूर) येथील दयानंद विद्यालयात झाले. वडलांचे छत्र बालपणीच हरवले. बारावीनंतर एमबीबीएस फ्री सीट तीन गुणांनी हुकली. घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे मेडिकल व इंजिनियरिंग करणे शक्य नव्हते. त्यामुळे डी. एड् करण्याचा निर्णय घेतला.

डी.एड्. करून लवकर शिक्षकाची नोकरी पत्करावी व नंतर पदवी घेऊन स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करण्याचे ठरवले. त्यानुसार डी.एड.ला प्रवेश घेतला. तेथेच हरेश्वर स्वामी आणि इतर स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यास उत्सुक मित्रांचा ग्रुप बनवून अभ्यास करण्याचे ठरवले. यूपीएससीची तयारी करणाऱ्या एक-दोन मुख्य परीक्षा किंवा मुलाखती झालेल्या ज्येष्ठ मित्र मंडळींना भेटून त्यांचे मार्गदर्शन घेतले.

## स्वयंअध्ययानाने सुरुवात

डी.एड. पूर्ण झाल्यानंतर उदगीर येथील श्यामलाल मेमोरियल हायस्कूलमध्ये गुणवत्तेवर आधारित प्राथमिक शिक्षक (शिक्षणसेवक) म्हणून निवड झाली. त्यानंतर स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड येथून बहिस्थ विद्यार्थी म्हणून इंग्रजी या विषयात पदवी घेतली आणि स्पर्धा परीक्षेच्या प्रवासाला सुरूवात झाली. त्यासाठी पुणे व दिल्ली येथून दर्जेदार पुस्तके आणि संदर्भसाहित्य गोळा केले आणि स्वयंअध्ययनावर भर देत ८ वी ते १२ एनसीइआरटीच्या पुस्तकांपासून अभ्यासाचा श्रीगणेशा केला.

## शिक्षक ते आयएएस

माझा डी. एड्चा मित्र हरेश्वर स्वामी (आयपीएस - २०१३) दोघांचीही पुन्हा श्यामलाल हायस्कूल उदगीर येथे निवड झाल्यामुळे दोघांचीही एकत्र स्पर्धा परीक्षेच्या प्रवासाला सुरुवात झाली. आमचे ज्येष्ठ मित्र डॉ. शांतेश्वर स्वामी (शांतुदादा)ची आयआरएस पदी निवड झाली आणि आमच्या तयारीला आणखीनच हुरूप आला. दरम्यानच्या काळात भारतीय आयुर्विमा महामंडळात (एलआयसी) विकास अधिकारी म्हणून निवड झाली. उस्मानाबाद शाखेत रुजू झालो. दरम्यानच्या काळात इतिहास विषय घेऊन बहिस्थ विद्यार्थी म्हणून एम.ए. पूर्ण केले आणि नोकरी करत अभ्यासासाठी वेळ काढण्याची कसरत सुरू झाली. नोकरीमुळे पूर्णवेळ क्लास लावून तयारी करणे शक्य नव्हते. त्यामुळे बदलेला अभ्यासक्रम व परीक्षा पॅटर्नप्रमाणे पुस्तके, संदर्भ साहित्य, नोट्स यांची जमवाजमव करून स्वयंअध्ययनावर भर दिला. एखाद्या विषयावर अधिकाधिक पुस्तके वाचण्यापेक्षा निवडक पुस्तके अधिकवेळा वाचली. स्वत:च्या नोट्स तयार करण्यावर भर दिला. २००९ मध्ये यूपीएससी मुख्य परीक्षा दिली, पण थोडक्यात मुलाखत हुकली. त्यानंतर २००९ मध्ये झालेल्या चुका टाळत मुख्य परीक्षेतील घटकांवर अधिक लक्ष केंद्रित करून अभ्यास केला. याचेच फलित २०१२ च्या परीक्षेत आय.ए.एस. म्हणून निवड झाली. आनंदाची बाब म्हणजे हरेश्वरचीदेखील आय.पी.एस. म्हणून निवड झाली. यूपीएससीची तयारी करणाऱ्या मित्रमंडळीसोबत केलेली गटचर्चा उपयोगी पडली.

## आईची प्रेरणा

वडलांच्या अकाली निधनानंतर आई सगुनाबाईने कुटुंबाचा सर्व डोलारा सांभाळला. आयुष्यात कठीण प्रसंगांना धैर्याने कसे तोंड द्यायचे हे मी तिच्याकडूनच शिकलो. आई स्वत: निरक्षर असूनही आपल्या मुलाने खूप

शिकावे, मोठा अधिकारी व्हावं असे तिला नेहमी वाटायचे. तयारीदरम्यानच्या यशापयशाच्या, ताणतणावाच्या वेळी सर्व कुटुंबीयांनी विशेषत: ताईने सतत प्रोत्साहन दिले.

## प्रयत्नांपुढे नशीबसुद्धा हरते...

परीक्षेदरम्यान, तयारी दरम्यान अनेकवेळा अपयशाला पचवावे लागते. अशावेळी खचून न जाता उपलब्ध परिस्थितीमध्ये उत्तमोत्तम कसे करता/साधता येईल याचाच विचार करायला हवा. प्रत्येक काळोख्या रात्रीनंतर एक सोनेरी पहाट आपली वाट पाहत असते हे लक्षात ठेवा.



Rise, awake, stop not until your goal is achieved हे स्वामी विवेकानंदांचे वाक्य नेहमी लक्षात ठेवा. सतत सकारात्मक विचार करून आपले मार्गक्रमण ध्येयाच्या/आपल्या गंतव्य स्थानाच्या दिशेने अथक चालू ठेवा. प्रामाणिक आणि अथक प्रयत्न करणाऱ्यांसमोर नशीबसुद्धा हरते.

## वेळेचे नियोजन

वेळेच्या नियोनासाठी प्रत्येकाने आपला अभ्यासाचा प्राइम टाइम (महत्त्वाची वेळ) ओळखून त्याप्रमाणे अभ्यासाचे नियोजन करावे, काहींना पहाटेचा अभ्यास जास्त लक्षात राहतो. त्याप्रमाणे आपण कीर्तन करायचे की पहाटेची काकडाआरती हे व्यक्तिपरत्वे वेगवेगळे असते. त्यामुळे ज्याचे त्याने ठरवावे आणि त्याप्रमाणे नियोजन करावे.

नोकरी करत स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी वेळेच्या नियोजनाची मोठी समस्या असते. आपण रजा घेऊन शक्यतो पूर्णवेळ तयारी करण्याचा प्रयत्न करावा. शक्य असल्यास शिकवणी वर्गाची मदत घ्यावी. युपीएससीचा अभ्यासक्रम, त्याचा आवाका व व्याप्ती लक्षात घेता आपण प्रत्येक घटकाची स्वत: तयारी करणे व तो आत्मसात करून घेणे याला वेळ लागतो. त्यासाठी सर्वस्व झोकून देऊन प्रयत्न करावेत. मुळात नोकरी करत यूपीएससी सारख्या परीक्षेचा अभ्यास करणे हीच तारेवरची कसरत आहे. मग यावेळी मुख्य परीक्षेच्या टप्प्यावर चार/पाच महिन्यांची रजा घ्यायची की पूर्ण परीक्षा काळापुरती रजा घ्यायची, हे आपल्या अभ्यासाच्या तयारीवर अवलंबून आहे. पूर्णवेळ देऊन तसेच आपले सर्वस्व झोकून देऊन प्रयत्न करणे हाच यशाचा मुलमंत्र ठरतो.

एखाद्या टप्प्यावर अपयश आल्यास निराश होणे साहजिक आहे. परंतु स्वत:ला अशा स्थितीतही सकारात्मक विचारांनी प्रेरित करणे, प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. कधीही अशा स्थितीत थोडा वेळ जाऊ देणे आवश्यक असते. आपल्या काय चुका झाल्या याचे चिंतन करून मोठी झेप घेण्यासाठी तयार व्हावे. प्लॅन बी देखील तयार ठेवावा.

## लेखनशैली व भाषाप्रभुत्वासाठी

लेखनशैली सहज व ओघवती असावी. आपल्याला जे सांगायचे आहे ते साध्या, सोप्या व सहज भाषेत सांगण्याचा प्रयत्न करावा. सध्याच्या परीक्षा पॅटर्नप्रमाणे मुख्य परीक्षेत सामान्य अध्ययनाचे चारही पेपर वेळेच्या आत व्यवस्थित सोडवणे ही एक महत्त्वाची बाब ठरते. त्यामुळे उत्तराची मुद्देसूद मांडणी हेच मुख्य परीक्षेतील यशाचे गमक आहे.

मुख्य परीक्षेतील प्रश्नांमध्ये काही शब्द जसे Explain, Elaborate, Discuss, Critically Examine, Differentiate हे आपल्या उत्तराची दिशा निश्चित करतात. त्यामुळे प्रश्न व्यवस्थित वाचावा, उत्तरात काय लिहिणे अपेक्षित आहे, याचा विचार करून मनातल्या मनात उत्तराची मांडणी करावी आणि नेमक्या/मोजक्या शब्दात ते उत्तरपत्रिकेत उतरवण्याचा प्रयत्न करावा. संदर्भ पुस्तके, मासिके किंवा वर्तमानपत्रातील एखाद्या घटक विषयाबद्दलचे मुद्दे Synopsis प्रमाणे आपल्या नोट्सच्या वहीत नमूद करावेत. अशा पद्धतीने सराव करण्याचा फायदा आपल्याला मुख्य परीक्षेत आणि निबंधाच्या पेपरला होतो. आपली उत्तरपत्रिका हाच आपला आरसा असतो. त्यामुळे वर्ष/दोन वर्ष/चार वर्ष केलेल्या अभ्यासाला आपल्या उत्तरलेखनाद्वारे व्यवस्थित न्याय मिळेल, याचा आटोकाट प्रयत्न करावा. भाषाप्रभुत्वासाठी अवांतर वाचण्याची सवय असल्यास फायदा होतो. शक्य असल्यास शालेय/महाविद्यालयीन काळातच अवांतर वाचन, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा याच्या सवयी लावाव्यात.

**शब्दांकन : राजाराम देवकर**

### यशाची सूत्रे

- **पूर्व परीक्षेसाठी जास्तीत जास्ते पुस्तके वाचावी, तर मुख्यसाठी मोजकी दर्जेदार पुस्तके अधिक वेळा वाचावी.**
- **स्वत:च्या नोट्स काढाव्या. महिन्याभरापूर्वी उजळणी करावी, उत्तरे लिहण्याचा सराव करावा**
- **संदर्भ, माहिती लक्षात ठेवण्यासाठी व्हिज्युअलाइज करावे.**
- **ज्येष्ठ मित्र, शक्य असल्यास स्पर्धा परीक्षा केंद्राचे मार्गदर्शन घ्यावे.**
- **लेखनशैली मुद्देसूद, सहज व ओघवती असावे.**
- **भावनिक होउन तयारी करू नका, ॲनॅलिटिकल राहा.**
- **परिस्थितीचा बाऊ न करता प्रयत्नांवर विश्वास ठेवा**
- **निबंधलेखनात विषय आणि त्या अनुषंगाने मांडावयाचे सर्व मुद्दे आधी कच्च्या कागदावर लिहावे व त्यांचा योग्य क्रम लावून निबंध लिहावा.**
- **मुलाखतीसाठी आपल्या जीवन परिचय (बायोडाटा)संबंधी येणाऱ्या प्रश्नांचा सराव करा.**

# मेट्रो ते रेल्वे, अनेक प्रश्न 'मार्गी'

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाच्या वर्षपूर्तीनंतरच्या मुख्यमंत्र्यांच्या पहिल्याच दिल्ली भेटीत राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचे निर्णय झाले. केंद्र सरकारकडून पुणे मेट्रो प्रकल्पास अंतिम मंजुरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडून मुंबई सागरी रस्ते मार्गाचा अंतिम अध्यादेश प्रकाशित करण्याचा निर्णय झाला. राज्यातील सर्व रेल्वे प्रकल्पांच्या कामांना गती देण्यासाठी लवकरच स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याचा निर्णय रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांच्यासोबत झालेल्या बैठकीत घेण्यात आला. मुंबईत 'आर्थिक सेवा केंद्र' उभारण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांची भेट घेतली. यासोबतच ३ हजार ८३९ किलोमीटर लांबीच्या राज्य महामार्गाचे रूपांतर राष्ट्रीय महामार्गात करण्याच्या शासनाच्या प्रस्तावास केंद्रीय परिवहन मंत्रालयाकडून तत्त्वत: मंजुरी देण्याचा निर्णय राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला.**

पुणे शहरात मेट्रो सुरू करण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्र सरकारकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. या महिन्यातील दिल्ली भेटीत त्यांनी पुणे मेट्रो प्रकल्पासंदर्भात केंद्रीय नगर विकास मंत्री वेकैंया नायडू यांची भेट घेतली. श्री. नायडू यांनी पुणे मेट्रो प्रकल्पाचा सुधारित प्रकल्प अहवाल सादर करण्याचे निर्देश राज्याला दिले. अहवाल प्राप्त झाल्यानंतर तत्काळ मंजुरी देण्यात येईल, असेही त्यांनी या बैठकीत सांगितले. पुणे मेट्रोच्या सुधारित प्रकल्प अहवालात प्रकल्पाची सुधारित किंमत देण्यात यावी, असे निर्देश श्री. नायडू यांनी दिले. दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनद्वारे पुणे मेट्रोचा सुधारित प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. राज्यशासन हा अहवाल केंद्र शासनास सादर करेल, अशी माहिती नगर विकास विभागाचे प्रधान सचिव नितीन करीर यांनी या बैठकीत दिली. याबैठकीत अमृत योजना, सर्वांसाठी घरे या विषयांवर चर्चा झाली.




## मुंबई सागरी रस्ते मार्ग

मुंबईतील सागरी रस्ते, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, पश्चिम घाट आदी विषयांवर मुख्यमंत्री फडणवीस यांची केंद्रीय पर्यावरण राज्यमंत्री प्रकाश जावडेकर यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत चर्चा झाली. मुंबई सागरी रस्ते मार्गाचा अंतिम अध्यादेश लवकरच प्रकाशित करण्यात येईल, अशी माहिती प्रकाश जावडेकर यांनी या बैठकीत दिली.

## मुंबईत आर्थिक सेवा केंद्र

मुंबईत 'आर्थिक सेवा केंद्र' उभारण्यासाठी राज्यशासनाच्या वतीने अनौपचारिक प्रस्ताव केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांच्यापुढे मुख्यमंत्र्यांनी मांडला. न्यूयॉर्क, टोकियो, लंडन या शहरांमध्ये उद्योग व शासनामधे समन्वयासाठी व पर्यायाने आर्थिक विकासासाठी 'आर्थिक सेवा केंद्र' स्थापन करण्यात आले आहेत. लवकरच याबाबतचा औपचारिक प्रस्ताव केंद्राला सादर करण्यात येणार आहे.

## शासन सेवा ऑनलाइन उपलब्ध

केंद्रीय अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक कार्य विभागाच्या वतीने आयोजित 'दिल्ली आर्थिक परिषदेच्या' समारोप सत्रात मुख्यमंत्र्यांनी सहभाग घेतला. 'जैम (जनधन-आधार-मोबाइल) दृष्टिकोन, आव्हान आणि मार्ग' या विषयावर बोलताना, त्यांनी कोणत्याही सेवांसाठी नागरिकांना शासकीय कार्यालयात यावे लागू नये अशी व्यवस्था जैमच्या माध्यमातून निर्माण होऊ शकते, असा विश्वास व्यक्त केला.

**दयानंद कांबळे**

## आंतरराष्ट्रीय व्यापारमेळ्यात महाराष्ट्र दालन

येत्या चार वर्षात महाराष्ट्रात ५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होईल व २० लाख नवे रोजगार उपलब्ध होतील, असा विश्वास राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी व्यक्त केला. येथील

### राज्य महामार्गाचे होणार राष्ट्रीय महामार्गात रूपांतर

महाराष्ट्रातील ३ हजार ८३९ किलोमीटर लांबीच्या राज्य महामार्गाचे रूपांतर राष्ट्रीय महामार्गात करण्याच्या राज्य शासनाच्या प्रस्तावास केंद्रीय परिवहन मंत्रालयाने तत्त्वत: मंजुरी दिली. यामुळे राज्यातील आदिवासी भाग व धार्मिक पर्यटन स्थळांच्या विकासाला चालना मिळणार आहे.

केंद्रीय भूपृष्ठ व परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली परिवहन भवनात झालेल्या बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री चंद्रकांत पाटील, ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, बांधकाम विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आनंद कुलकर्णी, सचिव पी.जी. गणवीर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक आर.एल. मोपलवार आदी उपस्थित होते.

### केंद्रीय मार्ग निधीतून रुपये ४ हजार कोटींची कामे

केंद्रीय मार्ग निधींतर्गत राज्यातील ४ हजार ३२ कोटी रुपयांच्या रस्ते विकास कामांना केंद्र शासनाने यापूर्वी तत्त्वत: मान्यता दिली होती. त्यास उच्चस्तरीय समितीच्या बैठकीत प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. या निधीतून राज्यातील २०८ रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे करण्यात येणार आहेत. 'मुंबई–गोवा सागरी मार्गाचे' सर्वेक्षण करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

'मुंबई–नागपूर सहा पदरी महामार्गाचा' सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करून निविदा काढण्याच्या सूचना देण्यात आल्या. 'मुंबई–गोवा महामार्गाबाबतही' चर्चा झाली. सध्या या महामार्गाच्या 'पनवेल–इंदापूर' या टप्प्याचे काम शासनाकडून सुरू झाले आहे.



प्रगती मैदानात आयोजित भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्यातील महाराष्ट्र दालनाचे उद्घाटन उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या हस्ते झाले. राज्याचे उद्योग राज्यमंत्री प्रवीण पोटे–पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

### कौन बनेगा उद्योगपती

कौन बनेगा उद्योगपती या सेटने प्रदर्शनात सर्वांचे लक्ष वेधून घेतले. 'कौन बनेगा करोडपतीच्या' धर्तीवर हा सेट उभारण्यात आला. हॉट सीटवर उद्योगमंत्री सुभाष देसाई व राज्यमंत्री प्रवीण पोटे–पाटील विराजमान झाले व त्यांनी संगणकावरील प्रत्येक पर्यायांची माहिती घेतली. उद्योग विभागाने राबवलेल्या या संकल्पनेचे मंत्रिमहोदयांनी कौतुक केले. या प्रदर्शनात राज्यातील महिला बचतगटाचे स्टॉल्सही मोठ्या संख्येने लावण्यात आले. बॉलीवूडच्या माध्यमातून उद्योग प्रवास दर्शवणाऱ्या महाराष्ट्राच्या दालनाने सर्वांना आकर्षित केले.

**(लेखक नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्राचे उपसंचालक आहेत.)**
**संपर्क : ०९८२२१०९३६२**

### रेल्वे प्रकल्पांसाठी स्वतंत्र कंपनी

राज्यातील रेल्वे मार्ग अधिक बळकट करणे, मंजुर मार्ग व कामांना गती देण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्र्यांनी रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या बैठकीत राज्यातील सर्व रेल्वे प्रकल्पांच्या कामांना गती देण्यासाठी लवकरच स्वतंत्र कंपनीची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. कराड–चिपळूण, वैभववाडी–कोल्हापूर, अहमदनगर–बीड–परळी, लोणार–फलटण–बारामती या रेल्वे प्रकल्पांच्या कामांबाबत या बैठकीत चर्चा झाली.



नक्षलग्रस्त भागांतील रेल्वे प्रकल्पांच्या कामास तत्काळ सुरुवात व्हावी, यासाठी राज्य शासनाने जमीन अधिग्रहणाचे काम युद्ध पातळीवर हाती घेतले आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत दिली. वडसा–देसाईगंज ते गडचिरोली या रेल्वे प्रकल्पाचे काम मार्च २०१६ पर्यंत सुरू करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील असे रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांनी सांगितले. केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांचा प्रत्येकी एक अधिकारी महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांच्या कामाच्या पाठपुराव्यासाठी नियुक्त करण्यात यावा, अशी सूचना रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी यावेळी केली.



लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार पद्मश्री डॉ. मुजफ्फर हुसेन यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# आनंद सोहळा

**गच्च भरलेल्या सह्याद्री सभागृहात उत्कृष्ट पत्रकारिता २०१४ पुरस्कार प्रदानाचा कार्यक्रम झाला. पुरस्कार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांची उपस्थिती आणि त्यांच्यातील उत्साहाने हा केवळ शासकीय पुरस्कार प्रदानाचा औपचारिक कार्यक्रम न राहाता तो एक आनंद सोहळा झाला. उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रदानाबरोबरच लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार पद्मश्री डॉ. मुजफ्फर हुसेन यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते प्रदान केला. पत्रकारांवरील हल्ले रोखण्यासाठी प्रतिबंध कायदा सरकार लवकरच आणेल, अशी ग्वाही देताना मुख्यमंत्र्यांनी या कायद्याचा मसुदा अंतिम टप्प्यात आल्याचे सांगितले.**

आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना असोत वा जगभरातील घटनांचे परिणाम यावर आपल्या लेखणीने आणि कॅमेऱ्याने भाष्य करणाऱ्या राज्यातील पत्रकारांचा गौरव करण्याचा कार्यक्रम सह्याद्री अतिथिगृहात नुकताच झाला. निमित्त होते लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्कार व उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०१४ वितरण सोहळ्याचे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी होते. यावेळी लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्काराने ज्येष्ठ पत्रकार पद्मश्री डॉ. मुजफ्फर हुसेन यांना गौरवण्यात आले. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि एक लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. त्याचप्रमाणे, राज्यभरातील १७ पत्रकारांना विविध पुरस्कारांनी यावेळी गौरवण्यात आले. यावेळी व्यासपीठावर माहिती आणि जनसंपर्क विभागाच्या सचिव श्रीमती मनीषा पाटणकर-म्हैसकर, महासंचालक चंद्रशेखर ओक, संचालक (वृत्त व जनसंपर्क) शिवाजी मानकर यावेळी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,'पत्रकारांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी पत्रकार हल्ला प्रतिबंधक कायद्याचा मसुदा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून विविध पत्रकार संघटनांशी चर्चा करून या मसुद्याला लवकरच अंतिम रूप देण्यात येईल.

मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांकडे बातमीची मालकी अर्थात जबाबदारी असते. तशाच प्रकारची जबाबदारी सोशल मीडियामध्ये यावी व जबाबदारीची जाणीव ठेवून सकारात्मक दृष्टिकोनातून सोशल मीडियाचा वापर व्हावा, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

लोकमान्य टिळक यांच्यासारख्या महापुरुषाच्या नावाने पुरस्कार मिळणे हा माझा मोठा गौरव आहे, अशी भावना श्री. हुसेन यांनी व्यक्त केली. ते म्हणाले की, महाराष्ट्र हे राज्य विविध बोलींनी समृद्ध आहे. शासनाच्या वतीने मिळालेला हा पुरस्कार सरस्वतीमातेचा प्रसाद आहे, असे मी मानतो.

श्रीमती मनीषा पाटणकर-म्हैसकर म्हणाल्या की, समाजातील विशेषत: प्रशासनातील चुकीच्या गोष्टींवर टीका करून त्यांना प्रतिबंध घालण्याचे महत्त्वाचे कार्य माध्यमांकडून होत असते. समाजात, तसेच प्रशासनात अनेक चांगल्या व्यक्ती कार्यरत असतात. त्यामुळे विविध विधायक कार्ये घडत असतात. या कामांची दखल माध्यमांनी आवर्जून घेतली पाहिजे. पत्रकारिता पुरस्कार वितरणाचा सोहळा वेळेवर व्हावा, म्हणून गतवर्षीचे

पुरस्कार देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्याचप्रमाणे, २०१५ चे पुरस्कारही १ मे २०१६ पूर्वी वितरित करण्यात येतील, असेही श्रीमती म्हैसकर यांनी सांगितले.

विधायक पत्रकारितेतून समाजाला विकासाची दिशा देणाऱ्या पत्रकारितेचा सन्मान करण्यासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आला असल्याचे महासंचालनालयाचे महासंचालक चंद्रशेखर ओक यांनी प्रास्ताविकात सांगितले.

## स्वच्छतेविषयी विशेष पुरस्कार

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान**

**जनजागृतीशिवाय पूर्णत्वास जाऊ शकत नाही, त्यामुळे स्वच्छतेविषयी आणि स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या जनजागृतीसाठी लिखाण करणाऱ्या पत्रकारांसाठी यावर्षीपासून विशेष पुरस्कार देण्यात येतील, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान
सप्तपदी स्वच्छतेची

उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०१४ साठी गठित केलेल्या परीक्षक समितीचे सदस्य सर्वश्री चंदन शिरवाळे, अनुराग त्रिपाठी, सुरेंद्र गांगण, दीपक भातुसे यांचा या वेळी सत्कार करण्यात आला. संचालक (वृत्त व जनसंपर्क) शिवाजी मानकर यांनी आभार मानले. ज्येष्ठ निवेदक प्रदीप भिडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी आमदार राज पुरोहित, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (प्रशासन) देवेंद्र भुजबळ यांच्यासह ज्येष्ठ पत्रकार व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यात खालील पत्रकारांना विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आले.

### राज्यस्तरीय पुरस्कार

आचार्य बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार (मराठी) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र) श्रीमती जान्हवी विनोद पाटील, दै.तरुण भारत, रत्नागिरी; अनंत गोपाळ शेवडे पुरस्कार (इंग्रजी) (राज्यस्तर) ४१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र) श्रीमती अनन्या दत्ता, दै. टाइम्स ऑफ इंडिया, पुणे; बाबूराव विष्णू पराडकर पुरस्कार (हिंदी) (राज्यस्तर) ४१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र) श्री.मुकेश रामकिशोर शर्मा, दै.लोकमत समाचार, गोंदिया; मौलाना अबुल कलाम आझाद पुरस्कार (उर्दू) (राज्यस्तर) ४१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र) श्री.शेख प्यार मोहम्मद सायं दै.नांदेड रहेबर, नांदेड; यशवंतराव चव्हाण पुरस्कार, शासकीय गट (मराठी) (मा. व ज.) (राज्यस्तर) ४१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र) श्री.प्रशांत आनंदराव सातपुते, माहिती अधिकारी, सातारा; पु.ल.देशपांडे उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा पुरस्कार (राज्यस्तर) ४१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र) श्री.संतोष मधुकर लोखंडे, झी २४ तास, बुलडाणा; तोलाराम कुकरेजा उत्कृष्ट वृत्तपत्र छायाचित्रकार पुरस्कार (राज्यस्तर) ४१ हजार रुपये, (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र) श्री.विद्याधर रघुनाथ राणे दै.सकाळ, मुंबई; केकी मूस उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार शासकीय गट (मा.व ज.) (राज्यस्तर) ४१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र) श्री.विजय वैजनाथ अप्पा होकर्णे, छायाचित्रकार, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड; सोशल मीडिया पुरस्कार (राज्यस्तर) ४१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र) श्री. आशिष अरविंद चांदोरकर, मुख्य उपसंपादक, महाराष्ट्र टाइम्स, (ऑनलाइन) पुणे.


### विभागीय स्तरावरील पुरस्कार

दादासाहेब पोतनीस पुरस्कार, नाशिक विभाग ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र, यापैकी रुपये १० हजार दै.गावकरीने पुरस्कृत केले आहेत.) श्रीमती चारुशीला सुभाष कुलकर्णी, वरिष्ठ वार्ताहर, दै. लोकसत्ता, नाशिक; अनंतराव भालेराव पुरस्कार, औरंगाबाद विभाग (लातूरसह) ४१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र) श्री.हरी रामकृष्ण तुगांवकर, दै. सकाळ, लातूर; आचार्य अत्रे पुरस्कार, मुंबई विभाग ४१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र) श्री. संजय कृष्णा बापट, विशेष प्रतिनिधी, दै.लोकसत्ता, मुंबई; नानासाहेब परुळेकर पुरस्कार, पुणे विभाग ४१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र) श्री.योगेश सोपान बोराटे, बातमीदार, दै.महाराष्ट्र टाइम्स, पुणे; शि.म.परांजपे पुरस्कार, कोकण विभाग ४१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र) श्री.दिलीप शांताराम शिंदे, दै.सकाळ, दै.पुढारी, ठाणे; ग.गो.जाधव पुरस्कार, कोल्हापूर विभाग ४१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र) इंदुमती गणेश (सूर्यवंशी), वार्ताहर–उपसंपादक, दै.लोकमत, कोल्हापूर; लोकनायक बापूजी अणे पुरस्कार, अमरावती विभाग ४१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र) श्री.हर्षनंदन सुरेश वाघ, प्रतिनिधी, दै.लोकमत, बुलडाणा; ग.त्र्यं.माडखोलकर पुरस्कार, नागपूर विभाग ४१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तिपत्र) श्री. प्रवीण श्रीराम लोणकर, दै. महाराष्ट्र टाइम्स, नागपूर.

**– टीम लोकराज्य**




**राज्यस्तरीय यशवंतराव चव्हाण पुरस्कार (शासकीय गट) प्रशांत सातपुते यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.**




# वर्षपूर्ती विशेषांकाचे प्रकाशन

शासनाच्या वर्षपूर्तीनिमित्त 'लोकराज्य' नोव्हेंबरच्या विशेषांकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते सह्याद्री अतिथिगृहात झाले. यावेळी 'लोकराज्य' ची भावंडे असलेल्या उर्दू लोकराज्य आणि महाराष्ट्र अहेडच्या विशेषाकांचेही प्रकाशन मुख्यमंत्र्यांनी केले. मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाने आयोजित मुख्यमंत्र्यांशी वार्तालाप या कार्यक्रमात हे प्रकाशन करण्यात आले.

सरकारच्या वर्षपूर्तीनिमित्त या तिन्ही अंकात सर्व विभागांनी वर्षभरात केलेल्या कामगिरीवर आधारित विशेष लेखांचा समावेश आहे आपल्या विभागांनी घेतलेल्या विविध निर्णयांची माहिती संबंधित मंत्रिमहोदयांनी दिली आहे. यावेळी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक श्री चंद्रशेखर ओक व मुख्यमंत्र्यांचे माध्यम सल्लागार रवीकिरण देशमुख, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष चंदन शिरवाळे व कार्यवाह चंद्रकांत शिंदे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## विकास चित्ररथ

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर-अमरावती विभागाने शासनाला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्त विकास कामांवर आधारित तयार केलेल्या चित्ररथाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवी झेंडी दाखविली.

कालिदास समारोहाच्या पार्श्वभूमीवर देशपांडे सभागृहाच्या परिसरात भव्य चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. नागपूर विभागातील सहाही जिल्ह्यातील पर्यटन, ऐतिहासिक वास्तू, विविध कलाकुसर यावर आधारित हे प्रदर्शन असून त्याचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांनी केले. या प्रदर्शनाला जोडूनच नागपूर जिल्हा माहिती अधिकारी अनिल ठाकरे यांनी सचित्र माहिती देणारा चित्ररथ तयार केला आहे. 'एलईडी'च्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांची माहिती दाखविली जाणार आहे. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार अनिल सोले, विभागीय आयुक्त अनूप कुमार, जिल्हाधिकारी सचिन कुर्वे, संचालक मोहन राठोड, जिल्हा माहिती अधिकारी अनिल ठाकरे, अनिल गडेकर, मनीषा सावळे, विवेक खडसे आदी उपस्थित होते.




### उर्दू लोकराज्यचे असलम परवेज यांना गालीब पुरस्कार



ऊर्दू साहित्यामध्ये विशेष योगदान देणाऱ्या लेखकांना दिला जाणारा गालीब इन्स्टिट्यूट पुरस्कार यावर्षी उर्दू लोकराज्यचे उपसंपादक मोहम्मद असलम परवेज यांना जाहीर झाला आहे. प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि ७५ हजार रोख, असे पुरस्काराचे स्वरूप आहे. श्री. परवेज यांनी उर्दू नाट्यलेखनात दिलेल्या विशेष योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. नवी दिल्ली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय गालीब सोहळ्याच्या उद्घाटन कार्यक्रमात दिल्लीचे नायब राज्यपाल नजीब जंग यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

# सर्वत्र लोकराज्य

सिंधुदुर्ग जिल्ह्यात लोकराज्य या मासिकास ग्रामस्तरावरून उत्कृष्ट प्रतिसाद मिळत आहे. सन २०१५-१६ या वर्षात जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील २४ गावे लोकराज्य ग्राम होऊन ३३९८ कुटुंबे लोकराज्य वर्गणीदार झाले होते तर आता याच पावलावर पाऊल ठेवत कणकवली तालुक्यातील ऑक्टोबर २०१५ मध्ये ३९ गावे लोकराज्य ग्राम झाली असून ३९ गावांतील ८८१५ कुटुंबे एकाचवेळी लोकराज्य मासिकाचे वर्गणीदार झाले आहेत. जिल्हा माहिती कार्यालयातर्फे लोकराज्य मासिकाचे वर्गणीदार करण्याबाबत जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व ग्रामपंचायत बैठका यामध्ये मार्गदर्शन करण्यात येते. या मार्गदर्शनामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात लोकराज्य ग्राम ही संकल्पना रुजत असून ग्रामपंचायतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. कणकवली पंचायत समितीने याच दृष्टिकोनातून अभिनव उपक्रम राबवून महाराष्ट्र शासनाचे मुखपत्र गावोगावी पोहोचवण्याचे काम केले आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष संदेश सावंत यांनी ३९ धनादेश सुपुर्द केले.

कणकवली पंचायत समितीच्या सभापती आस्था कर्पे, उपसभापती बाबासाहेब वर्देकर, गटविकास अधिकारी चंद्रसेन मकेश्वर, साहाय्यक गटविकास अधिकारी मुश्ताक गवंडी, विस्तार अधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत वारंग, विस्तार अधिकारी ग्रामपंचायत अरुण चव्हाण, पंचायत समिती कणकवलीचे ग्रामविकास अधिकारी प्रकाश राणे, कळसुली ग्रामविकास अधिकारी सुनील पांगम, हरकुळ खुर्दचे ग्रामविकास अधिकारी एस.एस.कवटकर, तालुका शाखेचे अध्यक्ष आर.डी.सावंत, सचिव मंगेश राणे, जिल्हा माहिती कार्यालयाच्या माहिती साहाय्यक संध्या गरवारे यांनी लोकराज्य मासिकाचे वर्गणीदार करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. एकाच वेळी ३९ ग्रामपंचायती लोकराज्य ग्राम होण्याचा मान कणकवली तालुक्याला मिळाला आहे. कणकवली तालुक्यातील असलदे, आयनल, आशिये, बेळणेखुर्द, भरणी, भिरंवडे, चिंचवली, दारूम, दारिस्ते, दिगवळे, डांबरे, गांधीनगर, कसवण-तळवडे, करंजे, करुळ, कासरल, कुंभवडे, कोळोशी, कोंडये, माईण, ओटव, ओझरम, पियाळी, पिसेकामते, शेर्पे, शिडवणे, शिरवल, साकेडी, साळिस्ते, सातरल, तिवरे, तोंडवल-बावशी, वारगाव, वायंगणी, वाघेरी, वरवडे, सावडाव, वागदे, कुरंगवणे या ३९ गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक व लोकांच्या पाठिंब्यामुळे ही सर्व गावे लोकराज्य ग्राम झाली आहेत. लोकराज्य ग्राममध्ये कणकवली तालुका राज्यात क्रमांक एक वर आला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात २०११-१२ ते ऑगस्ट २०१५ पर्यंत एकूण ७० गावे लोकराज्य ग्राम झाली आहेत. यापूर्वी सर्वाधिक २४ लोकराज्य ग्राम एकाचवेळी होण्याचा मान देवगड तालुक्याला मिळाला होता. आता हा मान कणकवली तालुक्याला जात आहे. कणकवली तालुक्यातील ३९ गावात ८८१५ कुटुंबे लोकराज्य मासिकाचे वार्षिक वर्गणीदार झाली आहेत.

**३९ गावांतील ८८१५ कुटुंबे एकाचवेळी लोकराज्य मासिकाचे वर्गणीदार**

**- संध्या गरवारे**
**(लेखिका सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या माहिती साहाय्यक आहेत.)**
**संपर्क: ०९४२२९६१६४९**



**लोकराज्य ग्राम ग्रामपंचायती समवेत जिल्हा परिषद अध्यक्ष संदेश सावंत, उपाध्यक्ष रणजित देसाई, जिल्हा बँकेचे अध्यक्ष सतीश सावंत, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सिंधुदुर्ग शेखर सिंह, जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती अंकुश जाधव, जिल्हा परिषद आरोग्य व शिक्षण सभापती गुरूनाथ पेडणेकर, पंचायत समिती सभापती आस्था कर्पे, उपसभापती बाबासाहेब वर्देकर, उपसंचालक माहिती वर्षा शेडगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत सुनील रेडकर, जिल्हा माहिती अधिकारी सखाराम माने, माहिती साहाय्यक संध्या गरवारे, गटविकास अधिकारी देवगड विजय चव्हाण, गटविकास अधिकारी कणकवली चंद्रसेन मकेश्वर, विस्तारअधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत वारंग, अरुण चव्हाण, कणकवलीचे ग्रामविकास अधिकारी प्रकाश राणे आदींसह सरपंच व ग्रामसेवक.**




**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे निर्णय गेल्या महिन्यात घेतले आहेत. या निर्णयांची माहिती ते तत्काळ ट्विटरद्वारे प्रसृत करतात. गतिमान आणि पारदर्शक विकासासाठी त्यांची आत्यंतिक तळमळ या ट्विटसमधून दिसून येते. गेल्या महिनाभरातील त्यांच्या काही ट्विटसचा हा आढावा.**

संविधान दिनानिमित्त घटनेची प्रस्तावना सव्वा लाख विद्यार्थ्यांसमोर वाचल्यानंतर

Reading the Preamble of Our Constitution,with 1.25 lakh students who are the nation builders,was a memorable moment!

मुंबईतील पहिल्या सीसीटिव्ही नेटवर्क प्रकल्पाचे उद्घाटन केल्यानंतर

Proud to announce that our Govt will launch 'Go live' of Phase 1 of Mumbai CCTV network on 30th Nov 2015.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना स्मृतिदिनी आदरांजली वाहिल्यानंतर

Paid tributes to the First CM of Maharashtra Shri Yashwantrao ji Chavan on his Smruti Din, at Karad.

गुरुनानक जयंतीनिमित्त शुभेच्छा देताना

Heartiest Greetings to all on #GuruNanakJayanti ! Let us follow teachings of brotherhood, unity, harmony & peace given by #GuruNanakDevJi .

पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने मुख्यमंत्री सहायता निधीला एक कोटी रुपयांचा धनादेश दिल्यानंतर

Grateful to Shri Vitthal Rukmini Mandir Samiti for the contribution of ₹1 crore to CM Relief Fund !

मंत्रालय सहकारी बँकेतर्फे मुख्यमंत्री सहायता निधीस पाच लाख रुपयांचा धनादेश दिल्यानंतर

Thanks to Maharashtra Mantralaya & allied offices Cooperative Bank Ltd for contribution of ₹5 lakh to CM relief fund.

It was very good to meet Shri Lakshmi Mittal in London.Invited @ArcelorMittal to Maharashtra for steel manufacturing

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील स्मारकाचे लोकार्पण झाल्यानंतर

**शहिदांना भावपूर्ण श्रद्धांजली**

**Tributes and Salutes to the brave heroes who laid down their lives to protect several lives on 26/11 in Mumbai.**



दहशतवाद्यांशी लढताना शहीद झालेल्या कर्नल संतोष महाडिक यांना आदरांजली वाहताना

Tributes & Salute to brave son of Bharat Mata Colonel Santosh Mahadik from Satara, Maharashtra, who got martyred inJ&K

State Govt firmly stands with Mahadik family in such tough times. Met the family and conveyed our deepest condolences.

लंडन दौऱ्यात उद्योगपती लक्ष्मी मित्तल यांची भेट घेतल्यानंतर

It was a Historic moment in London. Thank you Hon @ narendramodi Ji for inaugurating Dr Babasaheb Ambedkar memorial.

केंद्र सरकारने एक रँक एक पेन्शन सुरू केल्यानंतर प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी आणि संरक्षण मंत्री मनोहर पर्रिकर यांचे अभिनंदन करताना..

Yet another promise fulfilled by Hon @narendramodi ji&Hon @ manoharparrikar ji. #OROPDelivered -real salute to the brave sons of Bharat Mata!


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित
शासन आणि जनता
यांच्यात संवाद दृढ करणारे...
सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप ४० लाख वाचक
ऑनलाईन वर्गणीदार होण्यासाठी :
http://dgipr.maharashtra.gov.in
रोखीने वर्गणीदार होण्यासाठी :
जिल्ह्यातील जिल्हा माहिती कार्यालयाशी संपर्क साधा
لوک راجیہ
उर्दु लोकराज्य
ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@२४४७
राज्यातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून सोमवार ते शनिवार,
सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणारा कार्यक्रम
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
जय महाराष्ट्र
नाबाद...८१० भाग
दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून
मंगळवार व शुक्रवार, रात्रौ ७.१५ ते ८ या वेळेत
प्रसारित होणारा कार्यक्रम
बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महान्यूज
@१ कोटी ७० लाख
www.mahanews.gov.in
MAHARASHTRA
Ahead
English Magazine
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
http://dgipr.maharashtra.gov.in
माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th December 2015
Date of Publication : 10th of every Month

# लोकमान्य : लोकराज्य



सर्वाधिक खपाचे मासिक

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक चंद्रशेखर ओक, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक